**( सभापतीस्थानी : माननीय सभापती )**

**अमरावती जिल्हयातील भातकुली तालुक्यातील पेढी धरणाच्या प्रकल्पांतर्गत विस्थापित होणा-या शेतक-यांच्या पुनर्वसनाबाबत तेथील महिलांनी केलेले आमरण उपोषण**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री.दिवाकर रावते,मधुकर सरपोतदार डॉ.नीलम गो-हे यांनी नियम 289 अन्वये एक प्रस्ताव आज या ठिकाणी दिलेला आहे. याच पध्दतीचा एक प्रस्ताव नियम 93 अन्वयेही देण्यात आलेला आहे. या बाबतीमध्ये नियम 93 खाली दिलेल्या प्रस्तावाखालील विषय एक अत्यंत महत्वाचा विषय असल्यामुळे याबाबत शासनाने निवेदन करावे, अशी सूचना देणार आहे. नियम 289 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आला आहे, तो मी आता या ठिकाणी वाचतो.

" अमरावती जिल्हयातील भातकुली तालुक्यातील पेढी धरण प्रकल्पांचे काम तेथम्ल शेकडो शेतक-यांच्या जमिनी जाणे ते विस्तापित होत असून प्रथम पुनर्वसन व मग धरण या शासनाच्या घोषणेनुसार पुनर्वसनाचा पत्ता नसल्याने धरणाचे काम 12.7.2007 रोजी पासून कित्येक महिलांनी सुरु केलेले आमरण उपोषण"

मी शासनाला अशी सूचना करतो की, आजचे सभागृहाचे दिवसाचे कामकाज संपण्यापूर्वी या विषयी शासनाने निवेदन करावे.

श्री.नारायण राणे : होय. यासंदर्भात शासनाकडून निवेदन केले जाईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

A - 2

**पृ.शी./मु.शी** : **तोंडी उत्तरे**

**मिरज येथील शासनाच्या मालकीच्या सि.स.नं.३०१३ मधील क्षेत्रफळात बदल केलेबाबतची तक्रार**

**(१) * २९३०८ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज जि.सांगली येथील शिवाजी रोडला असलेल्या कुंभार खणीतील शासनाच्या मालकीच्या सि.स.नं.३०१३ या मिळकती क्षेत्रफळात बदल करुन शासकीय मालकीची १४०.६ चौ.मी. क्षेत्र सि.स.नं.३०१३/२ या मिळकतीत बेकायदेशीररित्या सामिल केल्याबद्दल नगर भूमापन अधिकारी मिरज या विरुध्द श्री. सहदेव रामचंद्र झेंडे यांनी जमाबंदी आयुक्त पुणे यांचेकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा निष्कर्ष काय आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री. नारायण राणे यांच्याकरिता** : (१) व (२) तक्रार केली होती व तक्रारीची चौकशी करण्यात आली आहे हे खरे आहे,

(३) न.भू.क्र.३०१३/२ च्या मिळकतधारकाने सदर मिळकतीच्या क्षेत्रफळात दुरुस्ती करण्याबाबत अधिक्षक भूमि अभिलेख, सांगली यांचेकडे अर्ज केला. त्यानुसार अधिक्षक भूमि अभिलेख, सांगली यांचे आदेशानुसार पुर्नर्विलोकन करुन, नगर भूमापन अधिकारी, मिरज यांनी न.भू.क्र.३०१३/२ या मिळकतीच्या क्षेत्राबाबत नियमानुसार योग्य तो निर्णय घेतला असून, तक्रारदारास त्याप्रमाणे कळविण्यात आले आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय,प्रश्न भाग 3 मध्ये दिलेल्या उत्तरामध्ये अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांचे आदेशानुसार पुर्नर्विलोकन करुन,नगर भूमापन अधिकारी,मिरज यांनी न.भू.क्र.3013 / 2 या मिळकतीच्या क्षेत्राबाबत नियमानुसार योग्य तो निर्णय घेतला असून,तक्रारदारास त्याप्रमाणे कळविण्यात आलेले आहे, असे नमूद केले आहे. या प्रकरणी जी तक्रार होती, ती योग्य होती की नाही आणि त्यासंदर्भात नियमानुसार नेमका कोणता निर्णय घेण्यात आलेला आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मिरज गावामधील हा प्रश्न सन्माननीय सदस्य



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.शरद पाटील यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला आहे,या प्रकरणी नियमानुसार निर्णय घेत असतांना न.भू.क्र.3013 / 2 हयापैकी खाजगी मिळकतीनुसार 301.1 चौरस मीटर हे क्षेत्र या ठिकाणी कायम ठेवलेले आहे,हे क्षेत्र कायम ठेवत असतांना 3013 / 2 सर्व्हे नंबरमधील 1871 चौरस मीटरमधून 140.6 चौरस मीटर जमीन त्या ठिकाणी दिलेली आहे, अशाप्रकारचा नियमानुसार निर्णय त्या ठिकाणी घेतलेला आहे.

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प.क्र. 29308.....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, शासनाच्या मालकीच्या जमिनीबाबत जी तक्रार करण्यात आली त्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली असे मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले. सदरहू चौकशीमध्ये काय आढळून आले ? ज्या भूमापन अधिकाऱ्यांनी चुकीचे भूमापन केले त्यांच्याविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सिटी सर्वे अधिकाऱ्यांनी जागेची पाहणी करुन संबंधित तक्रारीची चौकशी करीत असताना जो निर्णय घेतला त्या निर्णयाची तपासणी करीत असताना असे आढळून आले की, शासनाच्या जमिनीतून खाजगी जमीनधारकांना जमीन देण्याचा प्रयत्न केला गेला होता. सभापती महोदय, निश्चितपणाने या प्रकरणाची पुन्हा एकदा चौकशी केली जाईल आणि शासनातर्फे या प्रकरणाचा आढावा घेऊन याबाबतीत निर्णय दिला जाईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, यासंदर्भातील या आधी केलेल्या चौकशीमधून असे निष्पन्न झाले होते की,भूमापन अधिकाऱ्यांनी यामध्ये गडबड केलेली आहे. ज्या अधिकाऱ्यांनी हा जमिनीचा घोटाळा केलेला आहे त्यांच्यावर त्वरित कारवाई झाली पाहिजे. सांगली जिल्हयातील भूमिअभिलेख कार्यालयासंबंधी शासनाकडे तक्रारी होत आहेत त्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. अधिक्षक,भूमिअभिलेख यांच्याविरुध्द तक्रारी होत आहेत. तालुका निरीक्षक,भूमिअभिलेख यांच्याविरुध्द पोलीस केसेस होतात. हे अधिकारी कार्यालयामध्ये काम न करता टपरीवर बसून काम करतात अशा बातम्या पेपरमधून येत आहेत. सर्वात महत्वाची तक्रार म्हणजे सर्वसामान्य नागरिकांना भूमिलेख कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी भेटत नाहीत. महिना-महिना लोकांची कामे होत नाहीत. गैरप्रकार करण्यामध्ये हे कार्यालय तरबेज आहे. सांगली जिल्हयातील संपूर्ण भूमिअभिलेख कार्यालयाची चौकशी केली जाईल काय आणि भ्रष्ट अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी एका विशिष्ट प्रकरणाबाबत प्रश्न विचारला होता. त्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाची जवळपास 140.6 चौ.मी.जमीन खाजगी जमीन धारकास दिली गेल्याचे दिसून आले. यासंदर्भात जे अधिकारी/कर्मचारी दोषी असतील त्यांच्यावर निश्चितपणाने कारवाई केली जाईल. माननीय सदस्यांनी एकूणच भूमिअभिलेख कार्यालयाबाबत तक्रार केलेली आहे . माननीय सदस्यांनी त्याबाबतीत काही स्पेसिफिक तक्रार असेल तर शासनाकडे द्यावी त्याबाबतीत चौकशी करुन संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल.

-----

बी -2



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) जैतापूर येथे अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत**

**(२) * ३१३६० श्री. अरविंद सावंत , डॉ. दिपक सावंत , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , डॉ. निलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याच्या निर्णयानुसार तेथे जमिन संपादन करण्याची कार्यवाही शासनाने सुरु केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जैतापूर-माइबन तालुका राजापूर परिसरात १ हजार हेक्टर जमिनीवर १० हजार मेगावॅट क्षमतेचा अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचे शासनाने प्रस्तावित केले असून त्यासाठी साधारण किती हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, आतापर्यंत किती हेक्टर जमिन शासनाने संपादित केली आहे,
(४) असल्यास, भूसंपादनाच्या नोटीसा काढण्यात आल्या आहेत काय, तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) या प्रकल्पासाठी खालील ५ गावांतील एकूण ९३८-०१.६० हेक्टर एवढे क्षेत्र संपादनाखाली आहे :-

| अनुक्रमांक | गावाचे नांव | संपादनाचे एकूण क्षेत्र |
|---|---|---|
| १. | मांडबन | ६९०-३९.१० |
| २. | मिठगवाणे | १०२-४१.५० |
| ३. | निवेली | ७२-६१.४० |
| ४. | करेल | ७०-६८.६० |
| ५. | वरीलवाडा | १-९१.०० |

(४) या प्रकल्पासाठी ५ गावांपैकी ४ गावांतील भूधारकांना कलम-४(१) खालील नोटीसा बजावण्यात आल्या असून फक्त मांडबन गावाच्या नोटीसा बजावणी अद्याप झालेली नाही. तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यता येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आजही महाराष्ट्रामध्ये अनेक प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही. कोयना प्रकल्पग्रस्तांचे अजूनही पुनर्वसन झालेले नाही. उत्तरामध्ये जमीन अधिग्रहित करण्याची कारवाई सुरु झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांना नोटिसा दिलेल्या आहेत अशा शेतकऱ्यांची संख्या किती ? या लोकांच्या पुनर्वसनासाठी किती निधी लागणार आहे आणि त्याची तरतूद शासनाने केलेली आहे काय ? जे प्रकल्पबाधित होणार आहेत त्यांनी पर्यायी जमिनीची मागणी केली आहे काय ?

.....3



SSK/SBT/MAP 1.05

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 31360....

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या लोकांची संख्या जवळपास 2000 आहे. 938 हेक्टर जमीन यामध्ये संपादित होणार आहे. मांडबन,मिठगवाणे,निवेली,करेल,वरीलवाडा या गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे. काही ठिकाणी यासंदर्भात कलम 4 ची नोटीस दिलेली आहे. काही ठिकाणी कलम 6 ची कारवाई झालेली आहे. बाधित लोकांना नियमानुसार जे देणे देय असेल ते देण्याची कार्यवाही शासनाकडून केली जाईल.

नंतर श्री.भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31360....

श्री.नारायण राणे : मी राज्यमंत्र्यांच्या उत्तरामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. या जमीन संपादनामध्ये पुनर्वसन नाही, या प्रकल्पासाठी पुनर्वसन कायदा लागू केलेला नाही. या भूसंपादनामध्ये कोणाचे घर जात नाही, गोठा जात नाही, फक्त दगड-धोंडे, बांध एवढेच संपादित होत असल्यामुळे यामध्ये पुनर्वसनाचा समावेश नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, जवळजवळ 1000 हेक्टर जमीन शासन संपादित करीत आहे. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, कोणाचे घर जात नाही, गोठा जात नाही. परंतु आमची अशी माहिती आहे की, घर किंवा गोठा जात नसला तरी शेतकऱ्यांची कसवणुकीची जमीन जात आहे. शासनाने कलम 4, 6, 8, 9 च्या नोटीस दिल्या असतील त्यापूर्वी किती शेतकऱ्यांनी स्वत:हून जमिनी दिल्या व स्वत:हून जमिनी न दिल्यामुळे शासन प्रत्यक्ष किती जमीन संपादित करणार आहे?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, एकूण 938 हेक्टर जमीन संपादित होणार आहे. काही प्रकरणात कलम 4(1) ची नोटीस दिली आहे. मिठगवाणे गावामध्ये कलम 11 च्या नोटीसपर्यंत पोहोचलो आहोत. निवेली गावामध्ये कलम 6 ची अधिसूचना विभागीय आयुक्तांनी प्रसिध्द केली आहे. करेल गावामध्ये कलम 6 ची अधिसूचना प्रसिध्द झालेली आहे. वरीलवाडा गावामध्ये कलम 11 ची नोटीस देण्यात आलेली आहे. अशाप्रकारे वेगवेगळया गावात वेगवेगळया नोटीसा देऊन झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न विचारण्याचा रोख लक्षात घेता पडीक जमीन म्हणून महसुली दस्तऐवजामध्ये जी नोंद आहे ती "पोटखराबा" अशी आहे. अशी जमीन ही अतिशय निकृष्ट दर्जाची असते. कोकणामध्ये पोटखराबा जमीन शिल्लक राहिलेली नाही. वरकस जमीन म्हटली जाते अशा जमिनीमध्ये कलमे लावण्याचे काम केले जाते. पोटखराबाऐवजी "पडीक जमीन" अशी नोंद केली जावी आणि त्याप्रमाणे नुकसानभरपाई मिळावी असा प्रस्ताव आयुक्तांकडे आलेला आहे. तो प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर त्याला मंजुरी दिली जाईल. पोटखराबा जमिनीसाठी 1500 रुपये हेक्टरी आणि पडीक जमिनीसाठी 28500 रुपये हेक्टरी भरपाई मिळते. पडीक जमिनीचा दर शेतकऱ्यांना दिला जावा असा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, हा प्रकल्प अणुऊर्जा प्रकल्प असल्यामुळे पर्यावरण अहवाल आला आहे काय? असल्यास त्या अहवालानुसार शासन कारवाई करणार का?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31360....

श्री.नारायण राणे : ज्यावेळी असे प्रकल्प कार्यान्वित होत असतात आणि जमीन संपादनाचे काम सुरु होते तेव्हा पर्यावरण अहवालासह केंद्र सरकारची अनुमती आल्याशिवाय राज्य शासन प्रकल्प स्वीकारीत नाही. पर्यावरण विभागाची मंजुरी आल्यानंतर भूसंपादनाचे काम सुरु होते. या प्रकल्पाविषयी सर्व परवानग्या आलेल्या आहेत.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, ज्यावेळी शासन भूसंपादन करते त्यावेळी साधारणपणे दर कमी दिला जातो. पोटखराबा जमिनीसाठी 1500 रुपये हेक्टरी मदत मिळते असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. आज हातरुमाल देखील यापेक्षा महाग मिळतो, इतका कमी दर शेत जमिनीसाठी दिला जातो. हा दर वाढवून देण्यासाठी शासन विचार करील काय?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारण्याऐवजी मी स्वत:हून सांगितले आहे की, पोटखराबा जमिनीसाठी 1500 रुपये हेक्टरी दर आहे. महाराष्ट्रात किंवा देशातही इतका कमी दर शेत जमिनीसाठी दिला जात नसावा. म्हणून "पोटखराबा" ऐवजी "पडीक जमीन" अशी नोंद झाली तर 1500 रुपयांएवेजी 28500 रुपये हेक्टरी दर देता येईल. मात्र हा दर रेडी रेकनर आणि चालू बाजारभावाच्या माध्यमातून ठरविला जातो. त्याप्रमाणे प्रत्येक हेक्टरसाठी रु.28500 देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री.गुरुनाथ कुळकर्णी : सन्माननीय महसूलमंत्र्यांना कोकणामध्ये जमिनीचे काय भाव आहेत हे माहिती आहे. या प्रकल्पासाठी जमीन काय भावाने घेतली जात आहे? गोठा जात आहे का? किती गुंठे जमीन जात आहे हे मंत्रीमहोदयांना माहिती आहे. सभापती महोदय, प्रकल्प त्या भागात यावा ही कोकणवासियांची भूमिका आहे. परंतु शासन पोटखराबा जमिनीसाठी 1500 रुपये हेक्टरी मदत देत असताना "पडीक जमीन" म्हणून नोंद झाली तर 28500 रुपये हेक्टरी मदत मिळू शकते हेही मंत्रीमहोदयांनी सांगितले. आज कोणत्याही ठिकाणी पडीक जमिनीसाठी 28500 रुपये हेक्टरी म्हटल्यानंतर 11000 हजार रुपये एकरी भाव होतो.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 31360** .........

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, कमी दराने शेतक-यांच्या जमिनी घेऊन शासनाने एक प्रकारे शेतक-यांची थट्टाच सुरु केलेली आहे. त्यामुळे जमिनीच्या बाजारभावाप्रमाणे म्हणजे हेक्टरी 50 हजार रुपये या प्रमाणे शेतक-यांच्या जमिनीचा मोबदला मिळणार आहे काय?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या ठिकाणी अणूऊर्जा प्रकल्पसाठी जागा संपादित केली जात आहे. या ठिकाणी सुरुवातीला 1000 मे.वॅ. व नंतर 10 हजार मे.वॅ. वीज या ठिकाणच्या अणूऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणार आहे. या ठिकाणी हा प्रकल्प येत असतांना शेतक-यांच्या भात जमिनी, किंवा बागायती जमिनी संपादित केल्या जाणार नसून निकृष्ठ दर्जा असलेल्या जमिनीच संपादित केल्या जाणार आहेत. या ठिकाणी जमीन संपादित करीत असतांना गोठा किंवा शेतक-याचे घर सुध्दा जाणार नाही. या ठिकाणी शेतक-यांच्या जमिनीचा 28,500 रुपये हेक्टरी या दराने संपादित केल्या जाणार आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जी सूचना केलेली आहे त्या सूचनेचा विचार करुन शेतक-यांच्या जमिनीला अधिक दर दिला जाऊ शकतो काय यासंदर्भात विचार करुन निर्णय घेतला जाईल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकलपासाठी 5 गावातील 938 हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी विचारले आहे की, या प्रकल्पात भातशेतीची तसेच वरकस जमीन एकंदर किती जाणार आहे त्यासंदर्भात मला असे विचारावयाचे आहे की, वरकस जमीन जरी असली तरी त्या ठिकाणी भात तसेच आंबा पीक घेतले जात असते.

श्री. नारायण राणे : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी जी माहिती दिली ती निश्चितपणे तपासून घेतली जाईल. तसेच या प्रश्नाच्या संदर्भात आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आमच्या विभागकडे प्रत्येक गावात एकूण जमीन किती आहे व त्या ठिकाणी कोणकोणती पिके घेतली जातात याचे रेकॉर्ड आहे. परंतु आमच्या माहिती प्रमाणे त्या ठिकाणी आंबा किंवा भातशेतीची कोणतीही लागवड

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : **31360** .........

श्री. नारायण राणे...

झालेली नाही. आता कोकणामध्ये पोट खराबाच्या जमिनी राहिलेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. दिवसेंदिवस कोकणातील बागायती शेतीचे स्वरुप बदलत चालले आहे. कोकणात ज्या ठिकाणी पोटखराबाच्या जमिनी होत्या त्या ठिकाणी आता आंबा कलमे लावली जात आहेत. त्यामुळे या प्रकल्पासाठी बागायती किंवा घर,तसेच गोठयाच्या जमिनी संपादित केल्या जाणार नसल्यामुळे या जमिनीसाठी 28500 रुपये प्रती हेक्टर या दराने जमिनीचा मोबदला दिला जाणार आहे. या प्रकल्पसाठी कलमे आणि बागायतीच्या जमिनी संपादित केल्या जाणार नाही किंवा शेतक-याचे नुकसान होईल अशी कोणतीही माहिती आमच्या रेकॉर्डवर नाही.

---------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पालम (जि.परभणी) तालुक्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष**

**(३) * २९३९७ प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. सदाशिवराव पोळ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुमारे १४ वर्षापूर्वी पालम (जि.परभणी) तालुक्याची निर्मिती करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही येथे न्यायालय, सहायक निबंधक कार्यालय, बांधकाम विभाग, वनविभाग, बसस्थानक आदींची निर्मिती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) ही कार्यालये तातडीने निर्माण करावीत अशी मागणी पालम तालुका विकास आघाडीने दिनांक २४ मे, २००७ रोजी एका निवेदना द्वारे शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणी पूर्ण न झाल्यास या आघाडीने "चक्का जाम" चा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त कार्यालये निर्माण करण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री.नारायण राणे** : (१) होय.

(२) व (३) इतर मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना निवेदनाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

(४) होय.

(५) विविध कार्यालये निर्माण करणे हा विषय विविध विभागांशी संबंधित आहे. तहसिल कार्यालय व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय निर्माण करणे हा विषय महसूल विभागाशी संबंधित असून ही कार्यालये पालम येथील प्रशासकीय इमारतीत कार्यरत आहेत. उर्वरित विभगांपैकी पंचायत समिती, पोलीस ठाणे व उप कोषागार ही कार्यालये कार्यरत आहेत.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, परभणी जिले में पालम तालुके को बने हुए 14 साल हो गए हैं. निजाम राजवट में भी पालम तालुका रहा है. इसके साथ दुजाभाव क्यों है ? यह राखीव मतदार संघ है, क्या इसलिए इसके साथ भेदभाव हो रहा है ? शासन का इस बारे में कॅजुअल एटीट्यूड दिखाई दे रहा है. उत्तर में लिखा है "इतर मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना निवेदनाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहेत." सिर्फ "प्रत" भेजने की वजह से 14 साल से यह काम पूरा नहीं हुआ है. यह कार्य कब तक पूरा होगा, यह मेरा प्रश्न है ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, पालम तालुक्याची निर्मिती होऊन अनेक वर्षे झ ाालेली आहे. सन 1981 ते 1999 या काळात जवळपास 121 तालुक्यांची निर्मिती झालेली आहे. पालक तालुका हा महसुली उत्पन्नाच्या दृष्टीने महत्वाचा तालुका आहे. नवीन तालुका करतांना त्या

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 29397** .........

डॉ. राजेंद्र शिंगणे...

ठिकाणी तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, भूमी अभिलेख, तालुका कृषी, पोलीस स्टेशन, ट्रेझरी असे आवश्यक सहा विभाग प्रथम तयार केले जातात व हे सहा विभाग पालम तालुकयामध्ये निर्माण करण्यात आलेले आहेत. तसेच उरलेल्या 18 प्रकारची कार्यालये असणे आवश्यक आहे त्या संदर्भात त्या त्या विभागाकडे त्या त्या संदर्भात पाठपुरावा सुरु आहे. पुढील काळात जसजसा निधी मिळेल तसतशी कार्यालये पालम तालुक्यात सुरु करण्यात येतील. एका तालुक्यात 18 विभाग निर्माण करण्यासाठी जवळपास 20 कोटी रुपये खर्च येत असतो. तालुक्याच्या संदर्भात जनतेसाठी आवश्यक जे विभाग आहेत ते विभाग पालम येथे निर्माण करण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29397........

डॉ.राजेंद्र शिंगणे.........

उरलेली कार्यालये मग त्यामध्ये न्यायालय, सहायक निबंधक, सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग, एमएसईबी विभाग, सामाजिक वनीकरणय, महिला बाल विकास इत्यादी विभाग असतील, ही सर्व कार्यालये निधीच्या उपलब्धतेनुसार देता येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विद्यमान महसूल मंत्र्यांच्या कार्यकाळात मराठवाड्यामध्ये नवीन 17 तालुके निर्माण झाले. हा प्रश्न फक्त पालम तालुक्यापुरता मर्यादित नाही. मराठवाड्यातील विकसित भागांमध्ये अद्यापपर्यंत विविध सोयीसुविधा देण्यात आलेल्या नाहीत. जनतेच्या मागणीनुसार फक्त तालुके निर्माण करुन प्रश्न सुटत नाहीत, तर नवीन तालुक्यांची निर्मिती केल्यानंतर तेथील लोकांना सर्वप्रकारच्या सुखसोयी पुरविल्या पाहिजेत. तेव्हा नवीन तालुक्यांच्या ठिकाणी सर्व विभागांची कार्यालये किती कालावधीत उपलब्ध करुन देणार आहात ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन 1992 मध्ये नवीन पालम तालुका जाहीर झाला. नवीन तालुका जाहीर झाल्यानंतर आतापर्यंत त्याठिकाणी सहा कार्यालये पूर्ण झालेली आहेत. विविध विभागांची एकूण 18 कार्यालय असणे आवश्यक आहेत. मी सभागृहाला पालम तालुक्या विषयीची माहिती सांगतो. या तालुक्याचे क्षेत्र 50, 882 हेक्टर आहे. या तालुक्यात 82 गावे असून 92 हजार लोकवस्ती आहे. त्यामुळे काही विभागांना लोकसंख्येच्या प्रमाणात कार्यालये उघडणे कठीण जात आहे. येत्या दोन वर्षात ही कार्यालये सुरु होतील. काही अडचण येत असेल तर उपकार्यालये सुरु करण्याचा प्रयत्न केला जाईल. येणाऱ्या दोन वर्षात उर्वरित सर्व कार्यालये उपलबध करुन देण्यात येतील. यासाठी महसूल विभागाने निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. पालम तालुक्याच्या ठिकाणी न्यायालय आणि बसस्थानक देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना सांगू इच्छितो की, शासन कोणताही दूजाभाव करीत नाही.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29397........

श्री.सुरेश देशमुख : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांचा आभारी आहे कारण त्यांनी सांगितले की, शासन कोणताही दूजाभाव करीत नाही. "तालुक्याच्या ठिकाणी प्रत्येक विभागाचे कार्यालय" अशी शासनाची घोषणा आहे. माझ्या तालुक्यात अकलूज आणि शंकरनगर ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायतीपेक्षा या तालुक्याची अवस्था अगदी बिकट आहे. परभरणी जिल्ह्यामध्ये तीन नवीन तालुके जाहीर झाले. त्याठिकाणी फक्त महसूल विभागाचे कार्यालय आहे. महसूल विभागाचे कार्यालय असले म्हणजे सर्व सुविधा उपलब्ध झाल्या असे नाही. मी याठिकाणी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, काही कार्यालयांना निधीची आवश्यकता नाही, ती सहज होऊ शकतात. तेव्हा अशी कार्यालये लवकरात लवकर देण्यात यावीत. मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, "दोन वर्षात उर्वरित कार्यालये दिली जातील." मी त्यांना सांगू इच्छितो की, दोन वर्षाचा कालावधी खूप जास्त होतो. तेव्हा ही कार्यालये एक वर्षात उपलब्ध करुन देणार काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

---------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रत्नागिरी जिल्ह्यात दापोली तालुक्यात वन विभागाच्या आरक्षित खेर्डी जंगलात चंदन, साग, खैर वृक्षांची तस्करी**

**(4) * 31308 श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , श्री. श्रीकांत जोशी , श्री. संजय केळकर : तारांकित प्रश्न क्रमांक 25922 ला दिनांक 17 मार्च, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रत्नागिरी जिल्ह्यात दापोली तालुक्यात वन विभागाच्या आरक्षीत खेर्डी जंगलात वन खात्याच्या अधिकारी वर्गाच्या दुर्लक्षपणामुळे चंदन, साग, खैर वृक्षांची मोठ्याप्रमाणात तस्करी झाल्याचे उघडकीस आल्या प्रकरणी वन क्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक, यांच्यावर शिस्तभंग कारवाई विषयक कारणे दाखवा नोटीस बजावले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहेत व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) सदर ठिकाणी अवैध वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे वनक्षेत्रापाल, वनपाल व वनरक्षक ह्यांना कारण दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे हे खरे आहे.

(2) प्राथमिक चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(3) प्राथमिक चौकशीबाबतची कार्यवाही सुरु असून, कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर दोषी आढळून येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 मधील तरतूदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने उत्तरात थोडी सुधारणा करु इच्छितो. प्रश्न क्रमांक तीनच्या उत्तराच्या शेवटच्या ओळीतील "शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल" या ऐवजी " शिस्तभंगाची कारवाई करण्यात आलेली आहे." असे वाचावे.

यानंतर श्री.पुरी...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31308....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी तेच विचारणार होतो, तरीसुध्दा माननीय मंत्रिमहोदयांना या प्रश्नाच्या उत्तरामध्ये आणखी दुरुस्ती करावयाची असेल तर त्यांनी ती करावी. मागच्या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी यासंबंधीचा तारांकित प्रश्न क्रमांक 25922 विचारला होता. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले होते की, "होय, हे खरे आहे." त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न क्रमांक 2 आणि 3 असा विचारला होता की, "असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित तस्करी करणारे आरोपी व त्यांना हेतुपुरस्सरपणे सहकार्य करणाऱ्या वन खात्याच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे काय ? नसल्यास, चौकशी वगैरे वगैरे." त्याचे माननीय मंत्रिमहोदयांनी स्पेसिफीक उत्तर दिले होते की, "सदर प्रकरणी जबाबदार असलेले आरोपी श्री.अनिल राजाराम केळकर व श्री.दत्ताराम धोंडू करमळे यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन, दापोली येथे फौजदारी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे." नंतर खाली लिहिले होते की, "या प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्यामुळे स्थानिक अधिकारी श्री.देवळे, तत्कालीन वनक्षेत्र यांच्यावर कारणे दाखवा नोटीस देण्याची कारवाई सुरु केली आहे." याठिकाणी माझा असा प्रश्न आहे की, ती कारवाई काय करण्यात आली ? दुसरे असे की, माननीय वनमंत्र्याचा आदर ठेऊन मी विचारु इच्छितो की, आपण याठिकाणी वन खात्याचे ऑडीट कधी केले आहे काय ? नसल्यास, ते करणार का ? त्यामध्ये गेल्या 5 वर्षात जंगल किती होते, याची आपण माहिती घेणार का ? कारण, आज महाराष्ट्रामध्ये अतिशय चिंतनीय अशी स्थिती आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात हा प्रश्न आला होता व त्यावेळी अशी कारवाई करु असे आम्ही सांगितले होते. त्यासंदर्भात आपण चार अधिकाऱ्यांना प्रत्यक्षात चौकशीच्या नोटीस पाठविल्या असून त्यांचे खुलासे मागविले व त्यानंतर आर.एफ.ओ.,दापोली यांच्यामार्फत श्री.देवळे यांची आपण विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. तसेच तत्कालीन वनपाल, दापोली यांची आपण बदली केली असून तत्कालीन वनरक्षक,खेर्डी श्री.जांभळे यांचेविरुध्द आपण चौकशी सुरु केलेली आहे. याठिकाणी आरोपीच्या संदर्भात विचारण्यात आले. हे आरोपी सतत सतत गुन्हे करणारे असल्यामुळे यांचेविरुध्द वेगळया पध्दतीने

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31308....

श्री.बबनराव पाचपुते....

गुन्हे नोंदवता येतील का यादृष्टीने आपण काही लोकांकडून सल्ला घेत आहोत. यासंदर्भात श्री.अनिल केळकर आणि श्री.करिमभाई हे दोन नेहमीचे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर आपण लक्ष ठेऊन आहोत. त्यांच्यावर आपण वेळोवेळी केसेसही नोंदविलेल्या आहेत. परंतु केसेस नोंदल्यानंतर त्यांना ताबडतोब जामीन मिळतो आणि ते बाहेर येतात, अशी परिस्थिती आहे. परंतु यासंदर्भात त्यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या दृष्टीने आपण सल्ला घेत आहोत. त्यांच्यावर कठोर कारवाई केल्यानंतर ते बाहेर न येण्याच्या दृष्टीने व त्यांना योग्य सजा होण्याच्या दृष्टीने आमचा मानस आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागच्यावेळी माननीय वन मंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, "अशाप्रकारचे पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी प्रक्रियेचे गुन्हे नोंदविले." परंतु यावेळी जे लेखी उत्तर दिलेले आहे, त्यात असे काहीही म्हटलेले नाही. त्यामुळे त्यावेळी दिलेले उत्तर खरे की आत्ताचे उत्तर खरे ? हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. दुसरे असे की, आत्ताच माननीय मंत्रिमहोदय म्हणाले की, गुन्हे नोंदविल्यानंतर जामिनावर ते गुन्हेगार बाहेर येतात. म्हणजे, यांचा माननीय आर.आर.आबा यांच्या खात्यावर अविश्वास असल्याचे दिसून येते. माझा प्रश्न असा आहे की, आजच्या उत्तरामध्ये फौजदारी गुन्हे दाखल केल्याचा उल्लेख का नाही ? त्या केसेस ज्यावेळी दाखल केल्या व त्याची जी चौकशी झाली असेल तर ती चौकशी कुठपर्यंत आली ? त्या माध्यमातून कोर्टामध्ये खटला दाखल झाला आहे का ? असल्यास, त्याची स्थिती काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंदर्भात कोर्टात केसेस दाखल केलेल्या आहेत. यासंदर्भात संगनमताने गुन्हा केल्याच्या नावाखाली सेक्शन 34 व 539 खाली केसेस दाखल केल्या असून ते बेलेबल वॉरंट आहेत. त्यांना यासंदर्भात बेल मिळणार नाही. कारण, ते वनाच्या जवळ राहतात आणि त्यांनी झाडे तोडून आणलेली आहेत व तो मालही त्यांच्याकडून जप्त झालेला आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.31308 पुढे सुरु.........**

श्री.बबनराव पाचपुते.......

कोकणामध्ये खाजगी क्षेत्रामध्ये सुध्दा वन आहे, तेथे सरकारी वनक्षेत्र कमी आहे. खाजगी वनक्षेत्रामध्ये देखील सराईत गुन्हेगार तस्करी करतात, त्यामुळे यासंदर्भात सखोल चौकशी करुन जे सराईत गुन्हेगार आहेत, त्यांना कायमस्वरुपी अटकाव करण्याबाबत चर्चा सुरु आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय वनमंत्र्यांनी दिलेले उत्तर हे मासलेवाईक उत्तराचा एक उत्कृष्ट नमुना आहे. ही चोरी कधी झाली, चंदन, साग अशा किमती लाकडांची चोरी झाली का, याबाबतचा अंदाज माननीय वनमंत्र्यांनी घेतला आहे का, एकूण किती किमतीची चोरी झाली, ही चोरी करणारी माणसे किती आहेत ? तसेच, प्रश्न क्रमांक 2 च्या उत्तरात असे म्हटले आहे की, प्राथमिक चौकशी सुरु करण्यात आली आहे. हा काय प्रकार आहे ? गुन्हा केंव्हाचा आणि प्राथमिक चौकशी आता सुरु करीत आहात ? फौजदारी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, असे सांगता आणि प्राथमिक चौकशी सुरु केली आहे, असेही म्हणता ? त्यामुळे माननीय वनमंत्र्यांचे उत्तर सुसंगत आहे की विसंगत आहे ? आपण इतर काहीही कामे करा, परंतु राज्यातील जंगल वाचवा, अशी आमची विनंती आहे. गुन्हेगार खाजगी वनक्षेत्रात चो-या करीत आहेत, एवढी भयानक परिस्थिती आहे. परंतु, या विभागाकडून हा प्रश्न गांभीर्याने घेतला जात नाही, ही अतिशय दुर्देवाची बाब आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रश्नांची उत्तरे तर मी देतोच परंतु माझ्याकडे संपूर्ण राज्यातील वनक्षेत्राबाबत देखील माहिती उपलब्ध आहे. गेल्या तीन वर्षात ...........

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांकडून प्रश्न विचारले जातात, त्यांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करण्यात येतो, परंतु, उत्तर ऐकण्याची त्यांची तयारी नाही.

**सभापती** : या तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी जे काही उपप्रश्न उपस्थित केले आहेत त्यापैकी काही उपप्रश्नांची उत्तरें देण्याची राहिली आहेत. राज्यातील संपूर्ण वनक्षेत्राचे ऑडिट करण्यात येईल काय, तसेच, जो काही फौजदारी गुन्हा नोंदविला आहे त्याअंतर्गत यापूर्वी काही चौकशी झाली आहे का ? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावीत.

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.31308 पुढे सुरु.........**

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, फौजदारी गुन्हयाच्या संदर्भात चार्जशिट दाखल करण्यात आले आहे. त्यामध्ये भारतीय दंड संहिता कलम 379/34, भारताचा वन अधिनियम, 1927 चे कलम 26 (फ) आणि 41 (2) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम 26 (फ) हा 'चोरटी वृक्षतोड' व कलम 41 (2) हा 'चोरटी वाहतूक' या गुन्हयांशी संबंधित आहे. न्यायालयात चार्जशिट दाखल केल्यानंतर संबंधितांना बेल मिळाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्र वन अधिनियमानुसार जप्त केलेला सर्व माल सरकार जमा केलेला आहे. महाराष्ट्रातून सन 2002 मध्ये 113, सन 2003 मध्ये 92, सन 2004 मध्ये 171, सन 2005 मध्ये 154 व सन 2006 मध्ये 132 अशी एकूण 662 ट्रक, ट्रॅक्टर, मेटॅडोअर, टॅक्सी, सायकल, अशी वाहने जप्त केलेली आहेत. 41 ट्रक, ट्रॅक्टर, 89 मेटॅडोअर, 334 टॅक्सी, 5516 सायकल अशी वाहने गेल्या चार वर्षात जप्त करण्यात आली आहेत. जी कायमस्वरुपी सरकारजमा करण्यात आलेली वाहने आहेत त्यामध्ये 62 ट्रक, 13 ट्रॅक्टर, 18 मेटॅडोअर, 77 जीप, कार, 2170 सायकल यांचा समावेश आहे. वन विभागाकडून दरवर्षी वनक्षेत्राचे ऑडिट करण्यात येते. तसेच केंद्र शासनाकडून सॅटेलाईटव्दारा पहाणी देखील करण्यात येते. यासंदर्भात माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती, देशातील सर्व राज्यांच्या वन सचिवांना या बैठकीला बोलाविण्यात आले होते. देशातील सर्व वनक्षेत्राची सॅटेलाईटव्दारा जी पहाणी करण्यात आली त्यामध्ये महाराष्ट्र राज्याचे चित्र इतर राज्यांपेक्षा चांगले आहे, असे या बैठकीमध्ये सांगण्यात आले आहे.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 13:35

ता.प्र.क्र.31308 ......

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, जंगल हे निसर्गाने कोकणाला दिलेले वरदान आहे. रत्नागिरीमध्ये वन विभागाची एक टक्के सुध्दा जमीन नाही. माझ्या माहिती प्रमाणे रत्नागिरीमध्ये वन विभागाची 0.2 टक्के जमीन असेल किंवा नसेलही. दापोलीमध्ये वन विभागाचे 5 ते 10 एकर जंगल आहे. दापोलीच्या जंगलामध्ये वारंवार चोरी का होते ? माझा असा आरोप आहे की, चोर चोरी करीत नसून संबंधित विभागाची मिलीभगत आहे, म्हणून दापोलीच्या जंगलामध्ये वारंवार चोरी होते. दुसरी गोष्ट अशी की, मागच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये हा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित झ ााला होता. आज हा प्रश्न पुन्हा सभागृहामध्ये उपस्थित झालेला आहे. केवळ उत्तर देण्यासाठी कारवाई पूर्ण करण्यात आलेली आहे, अशी माझी माहिती आहे. तिसरी गोष्ट अशी की, मागच्या 3-4 वर्षामध्ये मोठया प्रमाणावर झाडांची तोड होत आहे. आम्ही आमच्या आयुष्यामध्ये एवढया मोठया प्रमाणावर झाडांची तोड बघितलेली नाही. माझा प्रश्न असा आहे की, रायगड जिल्हयातील शंभर आदिवासी कुटुंबांना बरोबर घेऊन लाकूड तोड केली जाते. मोठया प्रमाणावर वृक्ष तोड सुरु आहे, त्यावर बंधन घातले जाईल काय ? दापोलीच्या जंगलातील झाडांची तोड अधिका-यांच्या संगनमताने झालेली आहे, त्या अधिका-यांवर माननीय मंत्री महोदय कारवाई करीतील काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी प्रश्न विचारतांनाच प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. कोकणातील सर्व परिसरामध्ये वन विभागाची शासकीय जमीन कमी आहे. उर्वरित जमीन ही खाजगी जमीन आहे. ते लोकांच्या मालकीचे, जनतेच्या मालकीचे वन आहे. तेथे त्या लोकांना झाडे लावावयाची असतील किंवा वनाचे काम करावयाचे असेल तर महसूल विभागाची किंवा वन विभागाकडे परवानगी मागितली जाते. त्या लोकांनी शासनाकडे परवानगी मागितल्यानंतर कोणती झाडे तोडली जाणार आहेत याची पाहणी केली जाते.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय.....

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी बोलावे. सभापती महोदय, खेर्डी परिसरामध्ये सरकारी जमिनीवरील सागाची झाडे सन 2004-05 मध्ये 30, सन 2005-06 मध्ये 32 आणि 2006-07 मध्ये 53 झाडे तोडलेली आहेत. या तीन वर्षात सरकारी जमिनीवरील सागाच्या झाडांची चोरटी तोड झालेली

..2...

ता.प्र.क्र.31308 ......

श्री.बबनराव पाचतपुते .......

आहे. मागच्या तीन वर्षात खाजगी जमिनीवरील 48 सागाच्या झाडांची आणि इतर 35 झाडांची तोड झालेली आहे. ही तोड झाल्यामुळे शासनाचे 1 लाख 46 हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे. प्रत्यक्षात 6 लाख 78 हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आलेला आहे. त्याचे कारण असे आहे की, खाजगी क्षेत्रात सुध्दा झाडांची चोरटी तोड होते, ती सुध्दा वन विभागाच्या अधिका-यांनी जप्त केलेली आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, या विषयावर सभागृहामध्ये खूप चर्चा झालेली आहे. महाराष्ट्रामध्ये अवैध वृक्ष तोड सुरु आहे याबाबत शासन गंभीर नाही, हे यावरुन दिसून येते. आपण झाडे लावा, झाडे वाढवा असे म्हणतो. परंतु कार्यवाही मात्र होत नाही. मी स्वत: मुरबाड तालुक्यातील टोकावडे गावामध्ये गेलो होतो. टोकावडे गावातील तोडण्यात आलेल्या 76 सागाच्या झाडांचे नंबर मी अधिका-यांना दिले हाते. सागाच्या झाडांची कत्तल झालेली आहे याबाबत आपण काय कारवाई करणार आहात, अशी मी अधिका-यांना विचारणा केली होती. परंतु अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. मी फोटोसह पुरावे दिलेले आहेत. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावतो आहे. सर्व जंगलांची तोड होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची माननीय मंत्री महोदय चौकशी करतील काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंदर्भात मी संपूर्ण राज्याची माहिती दिलेली आहे.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मंत्री महोदय, वन विभागाच्या एका प्रश्नाचे उत्तर देत असताना त्यांना अवांतर प्रश्न विचारले जात आहेत. चोरी कोठे, कधी, कशी झाली आहे असे प्रश्न विचारले जात आहेत, हे योग्य नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.नारायण राणे : सन्माननीय सदस्यांनी कृपया माझे म्हणणे ऐकूण घ्यावे. कोणताही प्रश्न विचारताना त्याला काही तरी आधार असणे आवश्यक आहे, आधाराशिवाय काहीही आरोप करणे योग्य नाही. मूळ विषयासंबंधी प्रश्न असेल तर मंत्री महोदय उत्तर देतील. सन्माननीय सदस्यांनी मुद्दयावरच बोलावे, जो प्रश्न आहे त्या संबंधी विचारावे, नसता त्याचे उत्तर देणे बंधनकारक नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मूळ प्रश्न दापोली तालुक्यातील खिर्डीचा आहे. तरी सुध्दा माननीय सदस्यांनी विचारल्यानंतर मी इतर प्रश्नांचेही उत्तर दिलेले आहे.

**सभापती** : मी मंत्री महोदयांना सूचना करतो की, सभागृहात फक्त दापोली तालुक्यातील खिर्डीबाबत चर्चा सुरु आहे, तेवढयापुरते मर्यादीत उत्तर देण्यात यावे. प्रश्नाचे उत्तर चालू असताना सन्माननीय सदस्यांनी अवांतर प्रश्न उपस्थित केल्यास त्यांना वेगळा प्रश्न विचारण्याची सूचना करावी.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची मी उत्तरे दिलेली आहेत. सन्माननीय सदस्य इतर प्रश्न विचारतील व काही आरोप करतील म्हणून सभागृहात अधिक माहिती दिली आहे. सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना मागील अधिवेशनात कोकणातील माकडांच्या उपद्रवाबाबत प्रश्न विचारला असता येथील माकडांचा नायनाट करु असे आश्वासन दिले होते. रत्नागिरी जिल्हयामधील दापोली तालुक्यामध्ये नष्ट होत असलेल्या जंगलामध्ये माकडांचा समावेश आहे का ? या माकडांना तुम्ही आरोपी करणार आहात का ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31308.....

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विचारलेला प्रश्न मूळ प्रश्नाशी संबंधित नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारल्यानंतर ते विसंगत उत्तरे देत आहेत.

**सभापती** : मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाबाबत अधिक चर्चा करावयाची असल्यास अर्धा-तासाची चर्चेची मागणी करावी. आता मी पुढील प्रश्न पुकारतो.

तारांकित प्रश्न क्र.29470

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी योग्य उत्तरे न दिल्यास आम्ही सभात्याग करु.

**सभापती** : मी पुढचा प्रश्न पुकारलेला आहे, तत्पूर्वी माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनाही या प्रश्नाबाबत बोलण्याची संधी दिलेली आहे, त्यामुळे पुन्हा या प्रश्नावर चर्चा करु नये.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आज विधान परिषदेचा वर्धापन दिन आहे. वर्धापन दिनाच्या दिवशी वरिष्ठांच्या व तज्ञांच्या या सभागृहामध्ये घोषणा न देता, सभात्यागापर्यत न जाता खालच्या सभागृहाला मार्गदर्शन होईल असे काम आपण सर्वांनी केले पाहिजे.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

यानंतर श्री.सुबंरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 13:45

ता. प्र. क्र. 29470 ....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी शांत व्हावे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना मी प्रश्न विचारण्यास परवानगी दिली होती. त्याप्रमाणे त्यांनी प्रश्न विचारल्यानंतर त्यावर मंत्री महोदयांनी उत्तर दिले आणि त्यानंतर अन्य पाच सन्माननीय सदस्यांना मी उपप्रश्न विचारण्यास परवानगी दिली व त्यावर देखील मंत्री महोदयांनी उत्तरे देण्यात आली. त्यानंतरही एखादे उत्तर राहिले असेल आणि मी पुढील प्रश्न पुकारला असेल तर आता पुन्हा परत मागे येणे बरोबर होणारनाही. माझी आपल्याला विनंती राहील की, या संबंधात आपणास अधिक माहिती घ्यावयाची असेल तर आपण या विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करावी, मी त्यासाठी आपणास परवानगी देईन.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण पाच सन्माननीय सदस्यांना येथे या विषयी उपप्रश्न विचारण्यास परवानगी दिली हे बरोबर आहे. पण या सभागृहात एखादा प्रश्न 25-25 मिनिटे देखील चालतो आणि अशा प्रकारे त्यावेळेस आपण त्याला न्याय देण्याचा प्रयत्न करता. आता या ठिकाणी या प्रश्नावर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सर8पोतदार यांनी प्रश्न विचारल्यानंतर त्यावर मंत्र्यांनी उत्तर देण्यापूर्वीच आपण पुढील प्रश्न पुकारला. तेव्हा आमचे म्हणणे एवढेच आहे की, सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी प्रश्न विचारला आहे तर त्याचे उत्तर मिळाले पाहिजे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेता म्हणताहेत तसे झालेले नाही हे कृपा करून समजून घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी प्रश्न विचारल्यानंतर मंत्री महोदयांनी त्यावर उत्तर दिले आहे आणि त्यानंतर अन्य पाच सदस्यांचे उपप्रश्न देखील झाले आहेत. ...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला वाटते की, मंत्री महोदय माझ्या प्रश्नाला उत्तर देतील म्हणून मी गप्प राहिलो. ....

**सभापती** : त्याला माझा इलाज नाही. मी पुढील प्रश्न पुकारलेला आहे. तरी सन्माननीय सदस्य श्री.निकोसे यांनी आपला प्रश्न विचारावा. ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज विधान परिषदेचा वर्धापन दिन आहे. आजच्या दिवशी तरी आम्हाला सभात्याग करण्यास लावू नये अशी माझी आपणास विनंती आहे. आपण सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांना प्रश्न विचारण्यास आणि त्यावर उत्तर होऊ देण्यास परवानगी द्यावी.

...... जे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ठीक आहे. मी केवळ सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनाच पुन्हा प्रश्न विचारण्यास परवानगी देईन आणि त्यानंतर मग या प्रश्नावरील चर्चा संपवून पुढील प्रश्न घेतला जाईल. हे केवळ आज या सभागृहाचा वर्धापन दिन आहे म्हणूनच. तरी आता सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांनी त्यांचा प्रश्न विचारावा.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा प्रश्न अतिशय साधा होता. त्याचे उत्तर येईल म्हणून मी वाट पाहिली परंतु शेवटपर्यंत त्या प्रश्नाचे उत्तर दिले गेले नाही. या ठिकाणी लेखी उत्तरामध्ये प्रश्न 2 च्या उत्तरात मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, प्राथमिक चौकशी सुरू करण्यात आली आहे. म्हणजे एका बाजूला आपण हे म्हणता आहात मग यामध्ये प्राथमिक चौकशी कसली अजून चालू आहे. आपण एकदा कोर्टामध्ये यासंबंधात केस फाईल करून संबंधितांवर गुन्हा दाखल करून शो कॉज नोटीस दिली आहे त्यानंतरही पुन्हा प्राथमिक चौकशी कसली करीत आहात ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रश्नाला उत्तर देताना मला आता मूळ विषयाकउे गेले पाहिजे. सभापती महोदय, या ठिकाणी जो मूळ प्रश्न विचारला आहे तो असा आहे की, रत्नागिरी जिल्ह्यात दापोली तालुक्यात वन विभागाच्या आरक्षित खेर्डी जंगलात वन खात्याच्या अधिकारी वर्गाच्या दुर्लक्षपणामुळे चंदन, साग, खैर वृक्षांची मोठ्या प्रमाणात तस्करी झालेल्याचे उघडकीस आल्या प्रकरणी वन क्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई विषयक कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय ? त्यानंतर प्रश्न क्र. 2 मध्ये विचारण्यात आले आहे की, असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय ? आणि प्रश्न 3 मध्ये विचारले आहे की, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ? सभापती महोदय, म्हणजे यामध्ये वनातील झाडांची चोरी केलेली आहे त्याबद्दलचाच हा प्रश्न नाही तर हा विषय आहे वन खात्याच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांबद्दलचा. मी त्यावर उत्तर दुरूसत करून दिले आहे की, या बाबत चौकशी करून कारवाई करण्यात आली आहे. आरएफओ म्हणजे वनपाल यांची बदली करून त्यांच्यावर डी.इ. करण्यात आलेली आहे असे उत्तर दिले आहे आणि हे मी आपल्या माहितीसाठी मुद्दाम सांगतो.

**सभापती** : ठीक आहे. आता या प्रश्नावरील चर्चा मी थांबवित आहे. यानंतर मघाशी पुकारलेला प्रश्न चर्चेला घेण्यात येईल. तरी सन्माननीय सदस्य श्री.निकोसे यांनी आपला प्रश्न विचारावा.

****

...... जे 3 ...



**अमरावती जिल्हयात आश्रमशाळेसाठी घेतलेल्या लेखी परिक्षेत झालेला गैरप्रकार**

**(5) * 29470 श्री. रमेश निकोसे, श्री. संजय दत्त, श्री. सुधाकर गणगणे, मेजर सुधीर सावंत, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री.सय्यद जामा** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती जिल्हयात आश्रमशाळा अधीक्षक, अधिक्षिका व वसतिगृह गृहपालपदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेत श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय केंद्रावर गैरप्रकार झाल्याचे दिनांक 25 मे, 2007 वा त्यादरम्यान आढळून आले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, संतप्त 20 परीक्षार्थ्यांनी पेपर आटोपल्यानंतर अप्पर आदिवासी विकास आयुक्त कार्यालयात या प्रकरणाबाबत कारवाई करण्याची व भरतीप्रक्रिया रद्द करण्याबाबत एक निवेदन केले हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्या अनुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. विजयकुमार गावित** : (1) होय,

(2) होय,

(3) होय,

(4) कॉपी करण्याचा प्रकार झाल्याचे निदर्शनास आल्याने या प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्यामुळे एका माध्यमिक शिक्षण सेवकास व एका माध्यमिक शिक्षकास निलंबित करण्यात आले असून कॉपी करणाऱ्या उमेदवाराची उत्तरपत्रिका जमा करून ती अपात्र ठरविण्यात आली आहे. तसेच त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन, गाडगेनगर, अमरावती येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, अमरावती जिल्ह्यात आश्रमशाळेसाठी आश्रमशाळा अधीक्षक, अधिक्षिका व वसतिगृह गृहपाल पदांसाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षामध्ये जे गैर प्रकार झाले त्यासंबंधात मी येथे पाच प्रश्न विचारले आहेत. त्यातील पहिल्या तिन्ही प्रश्नांना 'होय' उत्तर देण्यात आले असून प्रश्न 4 ला उत्तर देताना मात्र सांगण्यात आले आहे की, कॉपी करण्याचा प्रकार झाल्याचे निदर्शनास आल्याने या प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्यामुळे एका माध्यमिक शिक्षण सेवकास व एका माध्यमिक शिक्षकास निलंबित करण्यात आले असून कॉपी करणाऱ्या उमेदवाराची उत्तरपत्रिका जमा करून ती अपात्र ठरविण्यात आली आहे. तसेच त्यांच्या विरूद्ध पोलीस ठाणे, गाडगेनगर, अमरावती येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... के 1 ...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29470...

श्री. रमेश निकोसे...

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणी श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या केंद्रावर अवघ्या अर्ध्या तासात पेपर फुटला. त्यामधील सर्व प्रश्नांची उत्तरे एका महिला परीक्षार्थीकडे कॉपी करण्यासाठी तयार होती. त्यावेळी परीक्षकांनी महिला परीक्षार्थी उमेदवारास पकडून दिल्यानंतर परीक्षक श्री. बनसोड यांनी कोणत्याही प्रकारे कारवाई केली नाही. उलट परीक्षकांना दमदाटी केली हे खरे आहे काय? असल्यास, या प्रकरणामध्ये परीक्षार्थी उमेदवाराकडून परीक्षेमध्ये कॉपी झाली आहे काय? यासंबधी चौकशी करण्यात येईल काय? आणि कॉपी करण्यास मदत करणाऱ्या परीक्षकांवर कारवाई करणार काय?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये अधीक्षक, पुरुष व अधिक्षिका, महिला आणि गृहपाल पुरुष व महिला या पदाकरीता परीक्षा घेण्यात आल्या होत्या. त्या परीक्षेमध्ये एक परीक्षार्थी उमेदवार मुलगी कॉपी करीत असतांना आढळून आली. त्यावेळी काही विद्यार्थ्यांनी ही परीक्षार्थी मुलगी कॉपी करीत आहे, त्यामुळे तिच्याकडील कागद जप्त केले पाहिजेत आणि त्या मुलीला परीक्षेमधून बाद केले पाहिजे असे सांगितले. तेहा त्याठिक्‌ाणी परीक्षक श्री. बनसोडे यांनी त्याठिकाणी असलेल्या दुसऱ्या वरिष्ठ केंद्र प्रमुखांना ही मुलगी कॉपी करीत असून तिच्याकडील चिठ्ठी हिसकावून घेऊन ती फाडून फेकून दिली असे सांगितले. हे प्रकरण झाल्यानंतर व परीक्षा संपल्यानंतर त्या वर्गामधील 13 मुली अे.सी.पी., अमरावती यांच्याकडे गेल्या. आणि त्याठिक्‌ाणी अशी तक्रार केली की, एक मुलगी कॉपी करीत होती. हे करीत असतांना तिच्याकडील कागद हिसकावून घेण्यात आले व ते फाडून फेकण्यात आले, परंतु तिच्याकडील पेपर घेण्यात आला नाही. अशाप्रकारची तक्रार केल्यानंतर तात्काळ अे.सी.पी. यांनी केंद्र प्रमुखांना बोलावून घेतले आणि त्या मुलीकडून हिसकावून घेण्यात आलेले व नंतर फाडून फेकून देण्यात आलेले कागद आणावयास सांगितले. फाडण्यात आलेल्या सर्व कागदांचे तुकडे आणल्यानंतर त्यांची जुळवा जुळव करण्यात आली. त्यानंतर त्या मुलींने त्या कागदावर एकूण 14 उत्तरे लिहिली होती. ती उत्तरे पेपरमधील उत्तरांशी जुळवून पाहिली असतां 14 पैकी 6 उत्तरे बरोबर लिहिली होती व 8 उत्तरे चुकीची लिहिली होती. अशापध्दतीने कॉपी करणाऱ्या मुलीचा पेपर न तपासता तो तसाच ठेवून घेतला व शिक्षकांनी त्या मुलीकडील कागद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

ता.प्र.क्र. 29470...

डॉ. विजयकुमार गावित...

फाडून फेकून दिले म्हणून त्या शिक्षकावर कारवाई केली. तसेच, बाजूला असलेल्या दुसऱ्या शिक्षकाने त्या शिक्षकाला ते पेपर फाडून फेकून देण्यास सांगितले म्हणून दोन्ही शिक्षकांवर कारवाई केली. अशाप्रकारे त्या मुलीचा पेपर तपासण्यात आलेला नाही. तो पेपर फुटलेला नाही. सर्वसाधारणपणे ही परीक्षा सकाळी 11 ते दुपारी 2 या दरम्यान होती. आणि हा प्रकार दुपारी 1 ते 2 या दरम्यान घडला. यानंतर त्या मुलीची चौकशी केली असता तिने असे सांगितले की, मी स्वत:च्या हस्ताक्षरामध्ये उत्तरे लिहित असतांना खाडाखोड होईल म्हणून दुसऱ्या कागदावर कच्चे लिहित होते. तरी सुध्दा त्या मुलीचा पेपर तपासण्यात आलेला नाही. त्या मुलीने सांगितलेली माहिती खरी आहे काय, याची शहानिशा करण्यासाठी तो पेपर माझ्यासमोर तपासण्यात आला. त्यावेळी 200 मार्कापैकी फक्त 71 मार्कांची उत्तरे बरोबर लिहिण्यात आली होती. जर त्या मुलीने कॉपी केली असती तर तिला परीक्षेमध्ये 70 ते 80 टक्के मार्क्स मिळाले असते व ती परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाली असती. त्यामुळे या परीक्षेमध्ये कॉपी झालेली नाही.

श्री. वसंतराव खोटरे : हा प्रकार घडल्यानंतर अधीक्षक, अधिक्षिका व गृहपाल यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत काय?

डॉ. विजयकुमार गावित : त्या पदाच्या परीक्षा झाल्या असून उत्तीर्ण उमेदवारांच्या नेमणुका झ ााल्या आहेत.

-------

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 13:55

**वन विभागाच्या जागेत वृक्ष लागवड करण्यास बँकेच्या नफ्यातील दोन टक्के निधी वापरण्यास सहकार खाते व रिझर्व्ह बँकेस दिलेली मान्यता**

**(6) * 30326 श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जामा , श्री. चंद्रकांत रघुवंशी , श्री. रमेश निकोसे , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. धनाजी साठे** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) वन विभागाच्या जागेत वृक्ष लागवड करण्यासाठी बँकांना त्यांच्या नफ्यातील दोन टक्के निधी वापरण्यास सहकार खाते आणि रिझर्व्ह बँकेने माहे एप्रिल, 2007 मध्ये किंवा त्यासुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ठाणे येथील भारत सहकारी आणि कल्याण नागरी सहकारी या बँकांना टिटवाळा मंदिर परिसरात काळू नदीच्या काठची वन खात्याची प्रत्येकी 10 हेक्टर जमीन वनीकरणासाठी देण्यात आली असून ह्याबाबत मा.वनमंत्री यांनी मंत्रालयात त्याच्या दालनात करारही केलेला असल्याचे माहे एप्रिल, 2007 मध्ये आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकरणाचे स्वरुप काय आहे,

(4) असल्यास, शासनाने सदर प्रकल्पाचे तातडीने इतरत्रही कार्यवाही होण्यासाठी कोणत्या सूचना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) दोन टक्के रक्कम काढण्यापूर्वी भारतीय रिझर्व्ह बँकेची पूर्व मान्यता घेण्याच्या अधीन सहकार आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

(2) मौजे म्हसकळ येथील वनजमीनीपैकी प्रत्येकी 10 हेक्टर जमीन देण्याबाबत ठाणे भारत सहकारी बँक व कल्याण जनता सहकारी बँक यांचेशी दिनांक 17.5.2007 रोजी त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे.

(3) घनता 0.4 पेक्षा कमी असलेल्या वन जमीनीचे वनीकरणाची योजना वन विभागाच्या सल्ल्याने करणे, या कराराची मुदत 7 वर्षे, प्रकल्प राबवितांना स्थानिक गावकऱ्यांचा सहभाग, वनजमीनीची व वनोत्पादनावर मालकी शासनाची, इत्यादी महत्वाच्या अटी आहेत.

(4) असे प्रस्ताव तत्परतेने हाताळण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(5) चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30326 .....

श्री.संजय दत्त : अशाप्रकारचे किती प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी किती प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : या संदर्भात जो काही प्रस्ताव आलेला आहे, त्यावर निर्णय घेतलेला आहे. असे प्रस्ताव डीएफओच्या स्तरावर येत असतात. शासनापर्यन्त अशाप्रकारचे प्रस्ताव आले तर त्यावर शासनाकडून ताबडतोब निर्णय घेतला जातो. शासन स्तरावर कोणताही प्रस्ताव प्रलंबित नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या योजनेअंतर्गत कल्याण जनता सहकारी बँक आणि ठाणे भारत सहकारी बँक यांच्याबरोबर करार केलेले आहेत. कराराची मुदत 7 वर्षाची आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, बँकेनी पुढाकार घेऊन आपल्या नफ्यातील दोन टक्के नफा वन लागवडीसाठी खर्च करावयाचा आहे. त्यांना या योजनेतून काही फायदा मिळणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपते : नाही.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ MAP/

**रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील 500 एकर वन जंगल अनधिकृतपणे नष्ट केल्याबाबत**

**(7) * 29490 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 27997 ला दिनांक 26 मार्च, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मौजे वंजारपाडा, देवपाडा, मोठा तलवाडे, पिंपळोली, झ ेंड्याची वाडी येथील शेतकऱ्यांच्या 400 ते 500 एकर वर्कस वन जमिनीत डी.के.ग्रुप दिलीप नागेश कटके यांनी वन विभागाची कोणती परवानगी न घेता परस्पर जंगल मूळापासून नष्ट केल्याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी मंडळ अधिकारी, नेरळ, तहसिलदार, कर्जत, प्रांत आधिकारी, पनवेल, वन विकास अधिकारी, रायगड, जिल्हाधिकारी रायगड, मा.वन मंत्री/राज्यमंत्री व मा.मुख्यमंत्री यांना दिनांक 4 जानेवारी, 2007 व दिनांक 5 फेब्रुवारी, 2007 रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदने सादर केलेली आहेत तरी याबाबत चौकशी करण्यासाठी कोणाची नेमणूक करण्यात आली, वा केव्हा करण्यात आली,

(2) संबंधीत चौकशी अधिकाऱ्याने चौकशीचे काम पूर्ण केले आहे काय,

(3) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्या अनुषंगाने शासनाने पुढील कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) सदर प्रकरणी वनक्षेत्रपाल कर्जत पश्चिम (सं.) यांनी दिनांक 2/3/2007 रोजी श्री.कमलाकर राघू मेंगाळ, ग्रामपंचायत सदस्य झेंड्याची वाडी, श्री. गोविंद शेळके, पोलीस पाटील तळवाडे यांचे समवेत चौकशी व क्षेत्रीय तपासणी केली, तसेच दिनांक 5/3/2007 रोजी तत्कालीन उपवनसंरक्षक अलिबाग यांनी वनक्षेत्रपाल कर्जत पश्चिम यांचे समवेत तपासणी केली.

(2) होय,

(3) प्रस्तुत प्रकरणी चौकशीत तथ्य आढळून आलेले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कर्जत तालुक्यामध्ये डीके ग्रुपचे श्री दिलीप नागेश कटके यांनी आदिवासींची जमीन घेतलेली आहे. खरे तर त्यांना आदिवासींची जमीन घेता येत नाही. तरी देखील त्यांनी घेतलेली आहे. त्या जमिनीवरील झाडांच्या तोडीचा सपाटा लावलेला आहे. गेल्या आठवडयामध्येच या विषयाच्या संदर्भात अर्धातास चर्चेच्या निमित्ताने प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यावेळी महसूल खात्यामार्फत विभागीय चौकशी करू, असे मंत्री महोदयांनी सांगितले होते. या ठिकाणी खाजगी जमिनीवरील बेकायदा जंगलतोड केलेली आहे, तशी त्यांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जंगलतोड करता येत नाही. त्याचबरोबर ती आदिवासींची जमीन आहे त्या संदर्भात विभागीय पातळीवर शासन चौकशी करेल काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जंगलतोड झालेली आहे,असे सांगत आहेत. ती जमीन वन विभागाशी संबंधित नाही. हा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर त्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवून चौकशी केली असता, ज्या ठिकाणी वन जमीन आहे, त्या ठिकाणी कोठेही झाडांची तोड झालेली नाही, असे आढळून आलेले आहे. सन्माननीय सदस्य हे खाजगी जमिनीवरील जंगलतोडीबाबत सांगत असतील तर त्याबाबतची वेगळी चौकशी करावी लागेल.

श्री.जयंत प्र.पाटील :सभापती महोदय, माझा प्रश्न वेगळा आहे. खाजगी जमीनीवरील झाडांची तोड झालेली आहे...

**सभापती** : आता पुढचा प्रश्न घेण्यात येईल. तारांकित प्रश्न क्रमांक 31469..

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला न्याय मिळालेला नाही.

**सभापती** : मी आपल्याला प्रश्न विचारण्यासाठी परवानगी दिलेली होती. आता मी पुढचा प्रश्न पुकारलेला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : खाजगी जमीनीवरील झाडांची तोड झाली तरी त्यासाठी परवानगी घ्यावी लागते.....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात अर्धातासाची चर्चेची सूचना द्यावी.

श्री.जयंत प्र.पाटील : मी अर्धातासाची चर्चाही उपस्थित केलेली होती. खाजगी जमिनीवरील झाडे तोडण्यासाठी परवानगी घ्यावी लागते. ती त्यांनी घेतलेली आहे काय ?

(उत्तर आले नाही.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ MAP/

**ठाणे परिसरातील सुमारे 15 ते 20 वर्षापासून वास्तव्यास असलेल्या इमारती खाजगी वन जमिनी असण्याच्या नोटीसा दिल्याबाबत**

**(8) * 31469 श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप, श्री.भास्कर जाधव, श्री. राजेंद्र जैन , प्रा. फौजीया खान , डॉ. वसंत पवार , श्री. सदाशिवराव पोळ , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. वसंतराव चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक 26058 ला दिनांक 17 मार्च, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे परिसरातील सुमारे 15 ते 20 वर्षापासून वास्तव्यास असलेल्या इमारती खाजगी वन जमिनीमुळे प्रभावित झालेल्या सदनिकाधारक व विकासकांच्या अडचणी विचारात घेता खाजगी वन क्षेत्राचा गुंता सोडविण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्न भाग (1) मधील प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (1) नाही,

(2) पुर्नस्थापित खाजगी वनक्षेत्राला वनसंवर्धन अधिनियम 1980 खाली काही सवलती मिळवण्याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रथम मा.सर्वोच्च न्यायालयातील संबंधित प्रकरणी या प्रस्तावाचा उल्लेख करुन त्यास सहमती घ्यावयाची आहे. सदर बाब नमूद करण्यात आली असली तरी मा.सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयास सप्टेंबर, 2007 पावेतो प्रकरण निकाली काढावयाचे आदेश दिले आहेत.

(3) प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयात सप्टेंबर 2007 पावेतो प्रकरण निकाली काढण्याचे आदेश दिलेले आहेत. सप्टेंबर 2007 पर्यन्त प्रकरण निकाली निघेल या परिस्थितीत शासन आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाला चार महिन्याचा कालावधी दिलेला आहे. त्या संदर्भात जे ॲफिडेव्हीट द्यावयास सांगितले होते ते आम्ही दिलेले आहे.

---

(यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाड, (जि.रायगड) येथील सावित्री नदीतील रेती उपसाचे काम मर्जीतल्या व्यक्तींना दिल्याबाबत**

**(९) * २९७४० श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण : :** सन्माननीय **महसूलमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड, (जि.रायगड) येथील सावित्री नदीतील रेती उपसाचे काम दिनांक ३१ जुलै, २००६ पर्यंत बंद होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ जुलै, २००६ नंतर शासनाने अवाजवी किंमत ठरवून दोन वेळा लिलाव काढला परंतु कोणीही त्यास प्रतिसाद दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १५ फेब्रुवारी, २००७ रोजी शासनाने पुन्हा पाच महिन्यांसाठी १४ कोटी रुपये किंमतीचा लघुत्तम लिलाव काढला व तो दिनांक ९ मार्च रोजी जाहिर होण्यापूर्वीच अनासागर या कंपनीला परमिट पध्दतीने रेती उपसा करण्याची परवानगी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या लिलावातून मिळणारे उत्पन्न शासनाचा महसूल बुडविणारे आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, असे असतांना अनासागर कंपनीला परमीट पध्दतीने रेती उपसा करण्याची परवानगी देण्याची कारणे काय आहेत व शासनाच्या बुडणाऱ्या महसूलास कोणाला जबाबदार धरण्यात आले आहे,

(६) याप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याची कारवाई झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व ही प्रक्रिया केव्हा पूर्ण होणार आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. नारायण राणे यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही,

(२) दिनांक ५ सप्टेंबर, २००३ च्या धोरणात्मक शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर रेतीगटाची लिलावासाठी न्यूनतम किंमत निश्चित करुन आयोजित करण्यात आलेल्या लिलावास प्रतिसाद मिळाला नाही.

(३) अनेकदा लिलाव लावूनही लिलाव यशस्वी न झाल्याने शासनाचे महसूली नुकसान टाळण्यासाठी लिलाव होईपर्यंत तात्पुरते परवाने देण्यात आले. मात्र लिलावाची प्रक्रिया न थांबविता उपलब्ध कालावधीची गणना करुन पुन्हा फेरलिलाव करण्यात आला.

(४) व (५) अनेकदा आयोजित केलेल्या लिलावास प्रतिसाद न मिळाल्याने शासनाचे महसूली नुकसान टाळण्यासाठी लिलावाची प्रक्रिया न थांबविता तात्पुरते परवाने देण्यात आल्याने शासनाचा महसूल बुडाला असे म्हणता येणार नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 3 ला उत्तर देत असताना असे म्हटले आहे की, "अनेकदा लिलाव लावूनही लिलाव यशस्वी न झाल्याने शासनाचे महसुली नुकसान टाळण्यासाठी लिलाव होईपर्यंत तात्पुरते परवाने देण्यात आले. मात्र लिलावाची प्रक्रिया न

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ SBT/

ता. प्र. क्र. 29740 ...... श्री. पांडुरंग फुंडकर .....

थांबविता उपलब्ध कालावधीची गणना करुन पुन्हा फेरलिलाव करण्यात आला." या ठिकाणी माझे दोन प्रश्न आहेत. शासनाने रेती गटाच्या लिलावासाठी न्युनतम किंमत निश्चित करुन लिलाव आयोजित केला असे उत्तरात म्हटले आहे. परंतु या लिलावात न्युनतम किंमत न ठरविता अवाजवी किंमत ठरविली होती. त्यानुसार व्यावसायिकांनी परवाना पध्दतीने रेती उपसण्यासाठी परवानगी मागितली होती हे खरे आहे काय ? स्थानिक व्यावसायिकांना परवानगी न देता महसूल विभागाच्या उपसचिवांच्या सूचनेप्रमाणे परमीट पध्दतीने उपसा करण्याचे जे आदेश दिले ते कोणत्या कंपनीला देण्यात आले आणि त्या कंपनीचे मालक कोण आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारल्याप्रमाणे खरे म्हटले तर 2006-07 मध्ये न्युनतम किंमत 46.45 कोटी रुपये होती. परंतु आपण अपसेट प्राईस ठरविताना वाळूचा उपलब्ध असणारा साठा त्याचबरोबर वाळूची प्रतवारी व बाजारभाव या सगळयांचा विचार करुन अपसेट प्राईस ठरवित असतो. त्यामुळे अवाच्यासव्वा पध्दतीने किंमत ठरविली या म्हणण्यामध्ये काही तथ्य नाही. सन 2005-06 मध्ये 32.91 कोटी रुपये अपसेट प्राईस ठरविली होती. त्यावेळी त्या ठिकाणी हा लिलाव झाला होता. दरवर्षी वाढीव भाव वगैरे सगळ्या गोष्टींचा विचार करुन सन 2006-07 ची अपसेट प्राईस ठरविली होती. परंतु त्यासंदर्भात जेव्हा लिलाव करण्यात आला त्यावेळी त्या लिलावामध्ये भाग घेण्यासाठी कोणी आले नाही. 23.8.2006 ला पहिला लिलाव केला. त्यावेळी त्या ठिकाणी कोणी आले नाही म्हणून विभागीय आयुक्तांनी शासनाकडे प्रस्ताव पाठवून या लिलावाची अपसेट प्राईस कमी करावी अशी विनंती केली होती. 36 कोटी 20 लाख रुपये एवढ्या अपसेट प्राईसचा प्रस्ताव आयुक्तांनी शासनाकडे पाठविला होता. परंतु शासनाने तो प्रस्ताव अमान्य केला आणि परत लिलाव करा अशा सूचना दिल्या होत्या. 7.11.2006 ला दुसरा लिलाव त्या ठिकाणी केला. परंतु त्यावेळी सुध्दा त्या ठिकाणी कोणी आले नाही. त्यानंतर त्या ठिकाणी आपण पाच ते सहा लहान गट तयार करुन अपसेट प्राईस ठरविण्याच्या संदर्भात कार्यवाही केलेली आहे. 24 एप्रिलला तिसरा लिलाव केला. त्यावेळी सुध्दा त्या ठिकाणी कोणी आले नाही. त्या ठिकाणी लिलावात कोणीही भाग न घेतल्यामुळे शासनाचे एवढे

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 29740 ...... डॉ. राजेंद्र शिंगणे .....

मोठे महसुली उत्पन्न बुडू नये यासाठी आपण त्या ठिकाणी लिलावाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत परमीट वाटप करावे यासंदर्भात सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे जवळपास चार कंपन्यांना त्या ठिकाणी परमीट दिले. या चार कंपन्यांच्या माध्यमातून 3,37,84,600 रुपये एवढा महसूल शासनाला मिळाला.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी कंपन्यांच्या मालकांची नावे विचारली होती ती माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितलेली नाहीत. यानंतर शासन परमीट पध्दत चालू ठेवणार की पुन्हा लिलाव करणार ? या कंपन्यांचे मालक कोण आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या कंपन्यांच्या मालकांची नावे आता माझ्याजवळ नाहीत. यामध्ये कंपन्यांची नावे एसएमएस कंपनी, अनासागर मायनिंग प्रायव्हेट लिमिटेड, फ्रेंडस् ग्रुप ड्रेझिंग कंपनी आणि नॅशनल मायनिंग ट्रान्सपोर्ट सर्व्हिस अशी आहेत. मालकांची नावे पटलावर ठेवण्यात येतील.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, ज्या ज्या ठिकाणी रेतीचे ठेके दिले जातात त्यांनी ट्रॅक्टरचे, ट्रकचे पैसे घेण्याच्या बाबतीत शासनाचे बंधन असले पाहिजे. माझ्या तालुक्यामध्ये जे ठेके दिलेले आहेत त्यामध्ये मनमानी पध्दतीने पैसे घेतले जातात. याकडे शासनाचे लक्ष असले पाहिजे. एखाद्या गरिबाला घर बांधावयाचे असेल तर त्यांच्याकडून किती पैसे घ्यावेत याबाबतीत निर्बंध असले पाहिजेत. ट्रॅक्टरचे किती पैसे घ्यावेत, ट्रकचे किती पैसे घ्यावेत याबाबतीत शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ट्रॅक्टर असतील, ट्रक असतील, ड्रेझर असतील त्याबाबतीत शासनाचे स्पष्ट धोरण आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

----

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची भारताच्या राष्ट्रपती पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना माहिती देतो की, महाराष्ट्राच्या सुकन्या श्रीमती प्रतिभाताई पाटील या भारताच्या राष्ट्रपती पदावर निवडून आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने या सदनामध्ये त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव सन्माननीय सदनाचे नेते आणि उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे मांडतील आणि त्यास सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि सर्व पक्षांचे गटनेते पाठिंबा देतील. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे प्रस्ताव मांडतील.

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, मी पुढीलप्रमाणे अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतो.

"या राज्याच्या माजी मंत्री, लोकसभा सदस्य, राज्यसभेच्या उपाध्यक्ष व राजस्थानचे राज्यपाल ही स्थाने भूषविलेल्या श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची भारताच्या 12व्या राष्ट्रपती म्हणून निवड झाल्याबद्दल हे सभागृह त्याचे एकमुखाने अभिनंदन करीत आहे."

सभापती महोदय, श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची आपल्या देशाच्या राष्ट्रपती पदावर नुकतीच निवड झाली आहे. त्या आता राष्ट्रप्रमुख झाल्या आहेत. एवढेच नव्हे तर भारताच्या सर्व संरक्षण दलाच्या प्रमुख बनल्या आहेत. राज्य घटना अंमलात येऊन 57 वर्षे झाली. या काळात महाराष्ट्राला हे स्थान प्रथमच मिळालेले आहे. तसेच श्रीमती प्रतिभाताई पाटील या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती बनल्या आहेत. 150 वर्षापूर्वी सावित्रीबाई फुले यांनी जो स्त्री शिक्षणा वेलू लावला तो आता गगनावरी गेलेला आहे. या कालावधीत त्याचा प्रचंड विस्तार झालेला आहे. त्याची सर्वात मोठी फलश्रुती म्हणजे आज महाराष्ट्रातील एक मराठी महिला राष्ट्रपदी पदावर विराजमान झ ाली आहे. खरे म्हणजे हा महाराष्ट्राचाच नव्हे तर देशबांधवांचा तसेच सावित्रीबाईं फुलेंनी ज्या महाराष्ट्रामध्ये स्त्री शिक्षणाचे झाड लावले त्या राष्ट्राचा हा गौरव आहे. श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची राष्ट्रपती पदी निवड झाल्यामुळे सा-या महाराष्ट्राला अतिशय आनंद झालेला आहे. सभागृहाने या आनंदायी घटनेची नोंद घेण्यासाठी हा अभिनंदनाचा प्रस्ताव मी मांडीत आहे. सभागृहाने यावर चर्चा करावी अशी मी विनंती करतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, महाराष्ट्राने आजपर्यन्त नेहमीच पुरोगामी भूमिका घेतलेली आहे. देशाला दिशा दाखविण्याचे काम महाराष्ट्र आजपर्यन्त करीत आला आहे. श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना मते देणा-या राज्यातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मी अंत:करणापासून अभिनंदन करतो. या निमित्ताने श्रेष्ठींच्या सूचने प्रमाणे आभार मानण्यासाठी मी आणि माननीय मुख्यमंत्री, आम्ही दोघे "मोतोश्री"वर गेलो होतो. जी भूमिका आपण घेतली तिचेही उघड्या मनाने अभिनंदन केले पाहिजे. महाराष्ट्रातून कोणी पुढे जात असेल तर सूर्याजी पिसाळासारखे पाय खेचण्याचे काम सातत्याने महाराष्ट्रात घडले त्यामुळे दिल्लीचे तख्त धरणे महाराष्ट्राला नेहमीच अशक्य बनले. पण या वेळी श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना राज्यामधून पडलेली मते बघितल्यानंतर कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंगेस आणि शिवसेना यानी महाराष्ट्रातून पुढे जाणा-या एका भगिनीला पहिल्यांदा एवढया मोठ्या प्रमाणात भरघोस मताधिक्य प्राप्त करुन दिले. मराठी माणूस एकत्र आला तर देशातील पदे कशी खेचून आणू शकतो आणि महाराष्ट्राला संधी मिळत असेल तर महाराष्ट्र कसा एक होऊ शकतो, महाराष्ट्र ही किती मोठी शक्ती आहे, हे या अनुषंगाने पूर्ण देशाला कळले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र देशाला दिशा दाखवू शकतो हे आज महाराष्ट्राने पुन्हा एकदा सिध्द केलेले आहे. आज ही निवड होत असताना श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हातून अधिक चांगल्या कामांनी आणखी विभूषित व्हावे. या महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेच्या वतीने मी त्यांना शुभेच्छा देतो, त्यांचे अभिनंदन करतो आणि त्यांची कारकीर्द या पुढच्या राष्ट्रपतींना मार्गदर्शक ठरावी इतके चांगले निर्णय त्यांच्या हातून घडावेत, अशा शुभेच्छासह मी पुनश्च एकदा त्यांचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MAP प्रथम श्री.शिगम एम. ......... 14:10

श्री.पांडुरंग फुंडकर ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी महामहीम राष्ट्रपती माननीय प्रतिभाताई पाटील यांच्या अभिनंदनाचा जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे, सभापती महोदय, खरोखरच देशाच्या इतिहासामध्ये साठ वर्षांनंतर स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती होण्याचा मान एका मराठी महिलेला मिळाला, ही महाराष्ट्रीयन माणसासाठीच नव्हे तर या देशाच्या प्रत्येक नागरिकासाठी अभिमानाची गोष्ट आहे, हे नाकारुन चालणार नाही.

सभापती महोदय, माननीय सौ.प्रतिभाताई पाटील या महाराष्ट्राच्या तर आहेतच पण जळगांव म्हणजे खानदेशमध्ये जन्माला येऊन आणि आमच्या विदर्भाच्या सून म्हणून खरोखरच त्यांची कारकीर्द अत्यंत चांगली आहे. सन 1978 ते 1985 पर्यंत ज्यावेळी त्या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सक्रिय होत्या त्या वेळी आमदार म्हणून विधानसभेत काम करीत असतांना अनेकदा माझा त्यांच्याशी संबंध आला आहे. खरे म्हणजे त्या अमरावतीच्या असल्यामुळे अधिक जवळचा संबंध होता. कामाच्या दृष्टीने तसेच,विविध समारंभाच्या निमित्ताने त्यांचा आणि माझा संबंध आला आणि म्हणून ज्या दिवशी त्यांची राष्ट्रपतीपदी निवड झाली त्या दिवशी मला व्यक्तिगतरित्या मनापासून अतिशय आनंद झाला. माननीय सौ.प्रतिभाताई पाटील यांची राष्ट्रपतीपदी निवड झाल्याबाबत अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत असतांना राज्याचे उप मुख्यमंत्री व माननीय सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील हे सूर्याजी पिसाळचा उल्लेख करतील, अशी मला अपेक्षा नव्हती. खरे म्हणजे सूर्याजी पिसाळचा या ठिकाणी उल्लेख करण्याची काही गरज नव्हती, तसा कुठलाही प्रसंग घडलेला नसतांनाही आणि अतिशय सुंदर अशा वातावरणामध्ये नवनिर्वाचित राष्ट्रपतींचे अभिनंदन होत असतांना.....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय,एका चांगल्या वातावरणामध्ये हा प्रस्ताव पास व्हावा याच माझ्या भावना होत्या. यासंदर्भात माझ्या भाषणामध्ये जो उल्लेख आला असेल तो मी मागे घेतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,संसदीय राजकारणामध्ये निवडणूक लोकशाही मान्य झाल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेनुसार या देशाच्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांपासून ते राष्ट्रपती पदापर्यंत निवडणूक प्रक्रियेतूनच ही पदे भरली जातात. हा लोकशाहीचा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

एक संकेत आहे. उमेद्‌वार महिला होत्या म्हणून निवडणूक व्हायला नको होती, अशा प्रकारची अपेक्षा या ठिकाणी करण्यात आली. लोकशाहीमध्ये निवडणूक ही मान्य करायलाच पाहिजे व्यक्तिगतरित्या मी त्यांचे अभिनंदन करीत असतांना मला अभिमानही आहे. एका पक्षाचे ध्येय-धोरण, तत्वज्ञान मी मान्य केलेले आहे त्या पक्षाच्या दिल्लीत राजकरणाकरिता अनेक पक्षांनी मिळून एन.डी.ए.नावाचा एक गट स्थापन केलेला आहे आणि मग अशी एन.डी.ए.ने एखादी भूमिका निश्‍चित करुन जो उमेद्‌वार ठरविला असेल त्याचे पक्षबांधिलकी म्हणून समर्थन करणे आम्हाला क्रमप्राप्त आहे आणि म्हणून सौ.प्रतिभाताई पाटील यांच्या निवडीला बी.जे.पी.ने विरोध केला, म्हणून फार मोठा गुन्हा केला, अशातला भाग नाही. मी काही देशाच्या राजकारणात काम करत नाही परंतु पदाधिकारी म्हणून या महाराष्ट्राच्या राजकारणात निश्‍चितपणाने मी काम करतो. मागचे महामहीम राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम यांची निवड सहमतीच्या राजकारणातून झ
ाली. मला असे वाटते की, कॉंग्रेस पक्षाने सहमतीचे राजकारण केले असते तर आज कदाचित या देशात एक वेगळे चित्र निर्माण झाले असते. साठ वर्षानंतर एक महिला या देशाच्या राष्ट्रपतीपदी विराजमान झाल्या आहेत, हा अत्यंत महत्वाचा असा एक मुद्दा आहे. यासंदर्भात मी खोलात जाणार नाही. एक महिला राष्ट्रपती म्हणून त्यांच्या झालेल्या निवडीने देशामध्ये महाराष्ट्राला आता अत्यंत महत्वाचे स्थान मिळालेले आहे. खरे म्हणजे हा सन्मान महाराष्ट्राला यापूर्वीच मिळावयाला पाहिजे होता. देशाच्या सर्वोच्च पंतप्रधान या पदी एक महिला या पूर्वी होऊन गेल्या. श्रीमती इंदिरा गांधी यांची पंतप्रधान म्हणून यशस्वी कारकीर्द या देशाने पाहिलेली आहे. पंतप्रधान म्हणून श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कारकीर्दीतील शेवटचा काळ सोडला तर त्यांची कारकीर्द अतिशय चांगली झालेली होती.

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ SBT/ 14:15

श्री. पांडुरंग फुंडकर ....

त्याचपध्दतीने महाराष्ट्राला आज जरी 60 वर्षानंतर हा बहुमान मिळत असला तरी सुध्दा मी या घटनेचा आनंद व्यक्त करीत आहे. उशिरा का होईना पण या राज्याला हा सन्मान मिळाला आहे. विधानपरिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त भाषण करताना माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, या देशाच्या स्वातंत्र्य लढयाचा केंद्रबिंदू हा या राज्यात होता. इंग्रजांना या देशातून हाकलून लावण्यासाठी जे नेतृत्व दिले होते ते महाराष्ट्रातून दिले होते. त्या महाराष्ट्राला आज 60 वर्षानंतर देशाच्या सर्वोच्च पदावर जाण्याचा मान मिळाला आहे. प्रतिभाताईंच्या माध्यमातून आज या देशाचे सर्वोच्च पद महाराष्ट्राच्या हातात आले आहे आणि महाराष्ट्राला तो सन्मान मिळाला आहे यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट असू शकत नाही. देशातील जनतेच्या अपेक्षा निश्चितपणाने वाढलेल्या आहेत. महिला म्हणून प्रतिभाताईंना विरोध करण्याचे कोणतेही कारण दिसत नव्हते. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याचा सातत्याने प्रयत्न केला गेला. त्यामुळे त्यांना राष्ट्रपती पदासाठी विरोध करण्याची काही आवश्यकता नव्हती. आज राज्यातील सर्व जनतेला आनंद झालेला आहे. प्रतिभाताईंकडून अपेक्षा वाढलेल्या आहेत. एक कर्तृत्ववान महिला म्हणून काम करीत असताना तसेच मंत्रिमंडळात काम करीत असताना त्यांनी त्या त्या खात्यामध्ये न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यपाल पदी काम करीत असताना सुध्दा चांगल्या पध्दतीने त्या पदाला न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महाराष्ट्राची ही कर्तृत्ववान महिला निश्चितपणाने राष्ट्रपती पदाला न्याय देण्याचा प्रयत्न करील अशी अपेक्षा हिंदुस्थानातील प्रत्येक नागरिकाने व्यक्त केली तर ती चुकीची ठरणार नाही. महाराष्ट्रातील जनतेने केली तर ती अधिकच चुकीची ठरणार नाही. प्रतिभाताईंच्या माध्यमातून न्याय मिळेल अशी राज्यातील जनतेची अपेक्षा आहे. मागासलेपणा आहे, सिंचनाचा विषय आहे. राष्ट्रपती हा प्रत्यक्ष प्रशासनामध्ये भाग घेत नसला तरी ज्यावेळी संसदेच्या उभय सभागृहांसमोर दरवर्षी त्यांचे भाषण होते त्यावेळी महाराष्ट्राला एक चांगला वाटा त्यातून मिळेल आणि राज्याच्या राजकारणाला चांगली दिशा मिळेल तसेच राज्याच्या विकासाला चांगली चालना मिळेल अशी अपेक्षा केली तर वावगी ठरणार नाही. एक अपेक्षा मी याठिकाणी व्यक्त करुन माझे दोन शब्द संपविणार आहे. महाराष्ट्राची एक वेगळी अशी शान आहे,मान आहे आणि महाराष्ट्राचा बाणा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे आपण नांव घेतो. त्यांनी अटकेपार झेंडे नेले. एक महिला राष्ट्रपती पदावर गेल्यानंतर आम्ही अशी अपेक्षा

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

करतो की, संसदेवर हल्ला करणाऱ्या अफझल गुरुची फाशी गेली 5 वर्षे रोखण्यात आलेली आहे ती एक महिला त्या पदावर गेल्यानंतर याबाबतीत चांगला निर्णय घेऊन जगाच्या इतिहासात त्याची नोंद झाल्याशिवाय राहणार नाही अशी अपेक्षा व्यक्त करुन पुन्हा एकदा व्यक्तिगत खऱ्या अर्थाने मनापासून या निवडीबद्दल मला अभिमान वाटतो आणि त्यांना मी शुभेच्छा देतो, अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सदनाचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी राष्ट्रपती पदाच्या निवडणुकी सौ.प्रतिभाताई पाटील या विजयी झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला आमचे पूर्ण अनुमोदन आहे. खरे पाहता सौ. प्रतिभाताई पाटील या 25 जुलै,2007 रोजी राष्ट्रपती पदी विराजमान होणार आहेत. आज त्या राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजयी झालेल्या आहेत. राष्ट्रपतीपदाचा शपथविधी झाल्यानंतर हा प्रस्ताव मांडला असता तर अधिक चांगले झाले असते. परंतु आम्ही तुमच्या आणि सदनाच्या भावनांशी पूर्णपणाने सहमत आहोत.

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचा प्रश्न निवडणुकीच्या माध्यमातून सोडविण्याचे ठरल्यानंतर एकेका उमेदवाराची नांवे जाहीर होऊ लागली. त्यावेळी शिवसेनाप्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी एक भूमिका घेतली.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ 14:20

श्री.मधुकर सरपोतदार...........

महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने ठाण्यामध्ये माननीय शिवसेना प्रमुखांनी एक भूमिका मांडली आणि ती भूमिका अशी होती की, संसदेवर हल्ला करुन तेथील सुरक्षा रक्षकांना कंठस्नान घालणाऱ्या, संसदेतील सर्व लोकप्रतिनिधींची हत्या करु पाहणाऱ्या या पाकिस्तानी अतिरेक्यांच्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी म्हणून या देशातील लोकांनी जितक्या एकसुरामध्ये तेव्हा आवाज उठविला होता त्याच पध्दतीने जे अतिरेकी पकडले गेले त्यांच्या सर्व कायदेशीर लढाया पूर्ण झाल्यानंतर सुप्रीम कोर्टाने एकदा नव्हे तर दोन वेळा जाहीर केले की, अफझल गुरुला फाशी दिली पाहिजे. त्या शिक्षेची अंमलबजावणी गेल्या ऑक्टोबरपासून आजपर्यंत प्रलंबित आहे, त्या संदर्भात माननीय शिवसेना प्रमुखांनी ठाण्याच्या सभेमध्ये भाष्य केले होते. ते भाष्य प्रत्येकाच्या हृदयाला स्पर्श करुन गेले होते. त्याच पार्श्वभूमीवर ज्यावेळी श्री.शिवराज पाटील यांचे नाव पुढे आले त्यावेळी माननीय शिवसेना प्रमुखांनी विरोध केला होता. कारण श्री.शिवराज पाटील हे देशाचे गृहमंत्री आहेत. त्यांच्याकडूनच फाशी देण्यासंदर्भातील फाईल राष्ट्रपतींकडे सरकायला पाहिजे ती सरकली नाही. परिणामत: अफझल गुरु आजही फाशीशिवाय आरामात बसला आहे.

सभापती महोदय, या देशाची प्रतिष्ठा, या देशाचा सन्मान, या देशाचा गौरव गुन्हेगाराला सजा दिल्यानंतरच होऊ शकतो, अन्यथा नाही. गुन्हेगारांशी तडजोड करुन या देशाचा गौरव होत नाही, ही भूमिका कोणताही पक्ष, या देशाची कोणतीही व्यक्ती, ज्या व्यक्तीचे या देशावर प्रेम आहे अशी व्यक्ती मान्य केल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी माननीय शिवसेना प्रमुखांनी आपली भूमिका राखून ठेवली होती. एनडीएचा प्रश्न उपस्थित झाला. एनडीएची 1996 साली स्थापना झ ाली, त्यावेळी मी एनडीएचा एक संस्थापक सदस्य होतो. एनडीएची स्थापना झाल्यानंतरचा सगळा इतिहास सर्वांना माहिती आहे, त्यामुळे मी त्यामध्ये जाऊ इच्छित नाही. प्रश्न फक्त एकच आहे तो म्हणजे ज्यावेळी राष्ट्रपतीपदासाठी उमेदवारी जाहीर झाली त्यावेळी शिवसेनेची भूमिका समजून घेतली गेली नाही. शिवसेनेने आपली भूमिका गेल्या महिन्यात जाहीर केली. आमची या विषयावर चर्चा झाली. ज्यावेळी महाराष्ट्राचा प्रश्न येतो, मला आठवते, मी त्यावेळी लोकसभेचा सदस्य होतो, पंतप्रधान पदाची संधी श्री.शरद पवार यांना मिळणार होती. त्यावेळी लोकसभेमध्ये मला अनेक पत्रकारांनी प्रश्न विचारला होता की, श्री.शरद पवार पंतप्रधान झाल्यानंतर तुमची भूमिका काय राहिल? मी मिडियाला सांगितले होते की, या महाराष्ट्राचे श्री.शरद पवार जर पंतप्रधान होणार





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ 14:20

श्री.मधुकर सरपोतदार...........

असतील तर महाराष्ट्राचा मराठी माणूस, मराठी रक्ताचा माणूस, महाराष्ट्राचा नेता म्हणून शिवसेना त्यांच्या पाठीशी उभी राहील. नेमकी ती भूमिका मी माननीय शिवसेना प्रमुखांच्या मान्यतेने मांडली होती. तीच भूमिका माननीय शिवसेना प्रमुखांनी यावेळी जाहीर केली. ही महाराष्ट्राची सुकन्या आहे. तिला सगळ्या विषयांचा अनुभव आहे. मंत्रीपद भूषविले आहे, राज्यपालपद भूषविले आहे. लोकसभेत निवडून गेली आहे, राज्यसभेत निवडून गेली आहे. निरनिराळ्या सदनामध्ये जाऊन जी महिला आज राज्यपाल म्हणून काम करते, त्या महिलेच्या पाठीशी उभे राहणे हे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे ही भूमिका शिवसेनेने मांडली. शिवसेनेचा जन्म झाला तो मुळात मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी, लढ्यासाठी झाला. 42 वर्षे आमच्या संघटनेला झाली. आमच्यावर किती संकटे आली, किती आरोप झाले परंतु आम्ही त्या भूमिकेपासून आजपर्यंत ढळलेलो नाही. आजही ती भूमिका कायम आहे. त्याच माध्यमातून माननीय शिवसेना प्रमुखांनी आपली भूमिका जाहीर केली. आमची भूमिका जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया काय आल्या यामध्ये मी जाऊ इच्छित नाही. एकदा आम्ही भूमिका घेतल्यानंतर कितीही संकटे येऊ द्यात, त्या संकटांशी मुकाबला करायचा, त्या संकटांना सामोरे जायचे ही भूमिका प्रथमपासूनच आहे. त्याप्रमाणे यावेळी सुध्दा त्या भूमिकेशी एकनिष्ठ राहिलो आणि ती भूमिका बजावली. मला आज आंनद एकाच गोष्टीचा आहे, तो म्हणजे श्रीमती प्रतिभाताई पाटील या देशाच्या सर्वोच्च स्थानावर जाऊन विराजमान झाल्या आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

सभापती महोदय, माननीय प्रतिभाताई पाटील या महाराष्ट्राच्या सुकन्या असून त्यांनी कधीही प्रसिध्दीच्या पाठीमागे धाव घेतली नाही, त्यामुळे मला त्यांचे कौतुक वाटते. 5-7 वर्षे त्या राजकारणापासून दूर राहिल्या परंतु त्यांनी कधीही पदासाठी संघर्ष केला नाही. मला आठवते की, जेव्हा विधान परिषदेच्या सुवर्णमहोत्सवाचा कार्यक्रम झाला होता त्यावेळी त्या उपस्थित होत्या. राजस्थानच्या राज्यपाल म्हणून त्यांनी फार चांगले कार्य केलेले आहे. राजस्थानचे राज्यपाल म्हणून काम करीत असतांना राजस्थान सरकारने त्यांच्या विरुध्द तक्रार केली असे माझ्या ऐकिवात नाही. निस्पृहतेने काम करणारी महाराष्ट्राची एक भगिनी राष्ट्रपती पदावर पोहचली असल्यामुळे आम्हाला त्याचा अभिमान आहे. यासंदर्भात त्यांचे कौतुक झाले तर आम्ही त्यामध्ये सहभागी होऊच. महाराष्ट्रातील प्रत्येक घटकाने माननीय प्रतिभाताई पाटील राष्ट्रपती झाल्या म्हणून अभिनंदन केलेच पाहिजे. राष्ट्राचा प्रश्न होतो तेव्हा आपण राष्ट्राचे नागरिक म्हणून उभे राहू, परंतु जेव्हा महाराष्ट्राचा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा महाराष्ट्रातील सर्व जनतेने, महाराष्ट्राच्या कल्याणासाठी एक भुमिका घेऊन उभे राहिले पाहिजे ही आमची प्रथमपासूनची भूमिका असून ती आजतागायत आम्ही टिकवून ठेवली असून भविष्यकाळात देखील तशीच टिकून राहील, मग बेळगावचा प्रश्न असो किंवा अन्य कुठलाही प्रश्न असो. शिवसेना कोणत्याही लढयापासून कधीही मागे आलेली नाही. महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा, महाराष्ट्राच्या सन्मानाचा प्रश्न उपस्थित होतो तेव्हा शिवसेना कधीही मागे हटत नाही. आता प्रश्न राहिला आहे तो अफजलगुरुचा. या प्रश्नासंदर्भात आमच्या प्रतिभाताई विचार करतील आणि त्यातून त्यांनाच मार्ग काढून हा प्रश्न सोडवायचा आहे. जबाबदारीच्या जागेवर आल्यावर त्या तितक्याच जबाबदारीने निर्णय घेतील अशी आम्ही त्यांच्याकडून अपेक्षा करतो. राष्ट्राचा कारभार अजून ऊंच करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सार्थकी लागतील. त्यांच्या पाठीमागे भरपूर अनुभव असून त्या सुशिक्षीत आहेत, कायदे तज्ञ आहेत त्यामुळे त्याचा फायदा राष्ट्राला मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती चुकीची ठरु नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी जो प्रस्ताव मांडला त्याला 100 टक्के नाही, तर 200 टक्के सहमत आहोत, आम्ही आपल्या अभिनंदनाच्या ठरावाला संपूर्ण पाठिंबा देतो. मला एवढेच सांगावेसे वाटते की, माननीय प्रतिभाताई

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

पाटील या सौभाग्यवती असल्यामुळे त्यांना श्रीमती प्रतिभाताई पाटील न म्हणता सौभाग्यवती प्रतिभाताई पाटील म्हणूनच त्यांचा उल्लेख करावा असे माझे स्वत:चे मत आहे. त्यांचे सौभाग्य हे या देशाचे सौभाग्य ठरो अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करुन मी माझे दोन शब्द संपवतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर ) : माननीय सौ. प्रतिभाताई पाटील यांची राष्ट्रपतीपदी निवड झाल्याबद्दल या ठिकाणी उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील साहेबांनी अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर मनापासून आनंद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

माननीय प्रतिभाताई पाटील यांची एकंदर राजकीय वाटचाल मी अगदी जवळून पाहिलेली आहे. त्यांच्या राजकीय जीवनातील सा-या घटनाक्रमाचा मी एक साक्षीदार आहे. 1962 मध्ये त्यांना पहिल्यांदा विधानसभेचे तिकीट मिळाले होते. तिकीट वाटपाच्या चार-एक महिने अगोदर महाबळेश्वर येथे प्रत्येक जिल्हयातून 10 व्यक्तींचे एक मोठे शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यावेळेस मी युवक चळवळीमध्ये काम करीत होतो. महाबळेश्वर येथे अमरावतील जिल्हयातील 10 लोक आले होते त्यात मी एक होतो. त्यावेळेस यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे, बर्वे, आबासाहेब खेडकर, भाऊसाहेब वर्तक, राजारामबापू पाटील हे त्या शिबीरास उपस्थित होते. त्यावेळेस सगळयांमध्ये दोनच गोष्टींची चर्चा सुरु होती ती म्हणजे, तिकीट मिळालेल्या लोकांमध्ये माननीय सौ. प्रतिभाताई या शिक्षीत असल्यामुळे त्यांना तिकीट मिळाले पण शरद पवार हे वयोमर्यादेत दोनचार महिन्यांनी कमी होते त्यामुळे त्यांना तिकीट मिळाले नाही अशी चर्चा त्यावेळी आम्हा तरुण लोकांमध्ये सुरु होती. त्यावेळेस शरद पवारांकडे वेगळी जबाबदारी सोपविण्यात आली होती. माननीय प्रतिभाताई जेव्हा सभागृहात सदस्य म्हणून निवडून आल्या त्यावेळेस मी शिक्षण चळवळीमध्ये काम करीत होतो.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...........

शिक्षण ही समाजाची जबाबदारी आहे असा मतप्रवाह होता. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा जोतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख यांनी जी कामगिरी केली ती तहहयात आहे. शिक्षणाची जबाबदारी समाजाने स्वीकारली पाहिजे असा मतप्रवाह होता. परंतु ही जबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे असे म्हणणारी दोन मूर्तीमंत उदाहरण म्हणजे श्री.मधुकरराव चौधरी आणि श्रीमती प्रतिभाताई पाटील. या दोघांनी अनुक्रमे शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षणाची जबाबदारी अतिशय प्रभावीपणे पार पाडलेली आहे आणि हा इतिहास आहे. त्यांनी त्या काळात शिक्षणाच्या संदर्भात घेतलेले निर्णय आजही प्रमाण मानले जातात. त्यांनी बेसिक स्ट्रक्चर निर्माण केले. सन 1977चा शासन निर्णय आजही नेतृत्व करीत आहे. आजच्या मंत्रिमहोदयांच्या कार्यकाळात आठ दिवसांपूर्वीचे निर्णय सतत बदलावे लागतात, मागे घ्यावे लागतात. दूरदृष्टी असलेली माणसे पिढ्यानपिढ्या राज्य करतात याचे त्या जीवंत उदाहरण आहेत.

सभापती महोदय, मी आपणास एक घटना सांगतो. ती घटना रेकॉर्ड झालेली असल्यामुळे याठिकाणी सांगण्यास काही हरकत नाही असे वाटते. माननीय वसंतदादा पाटील यांनी श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना शिक्षणमंत्री पद स्वीकारणार काय असे विचारले. त्यावेळी शिक्षणाचे एकच खाते होते. शिक्षण खात्याची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी आहे पण शिक्षणाची स्थिती अतिशय वाईट आहे, ती सुधारण्यासाठी अर्थमंत्र्यांनी पैशाची थैली सैल सोडावी असे त्यांनी सांगितले. हे सर्व रेकॉर्ड झालेले आहे. सौ. प्रतिभाताई पाटील यांनी 40 दिवसांच्या कालखंडामध्ये तीन बैठका घेतल्या. त्या बैठकीत त्यांनी सर्व अधिकाऱ्यांना बोलाविले. एकेका प्रश्नाबाबत त्यांनी निर्णय घेतला व काम मार्गी लावले. श्री. सुखटणकर यांचे मिनिटस् आहेत. एक मंत्री म्हणून कसे काम करावे याचा परिपाठ त्यांनी घालून दिला होता. सचिवांना कसे ताब्यात ठेवायचे, त्यांना त्यांची जागा कशी दाखवली पाहिजे ते त्यांच्याकडून शिकावे. मी त्यांना जवळून काम करताना पाहिलेले आहे. प्रत्येक विषयाकडे पाहण्याची, निरीक्षण करण्याची त्यांची पध्दत पाहिली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...........

सभापती महोदय, प्रतिभाताई उच्च विद्याविभूषित आहेतच, पण त्याच बरोबर विनम्रता, विनयशीलता, कार्यमग्नता, कर्मठता इत्यादी दुर्मिळ गुण त्यांच्यात आहेत. मंत्रीपद भूषवित असताना त्यांनी काही कठोर निर्णय कणखरपणे घेतले. निर्णयामध्ये काही कमी जास्त होत असेल तर त्या मागे घेण्यास सुध्दा कचरल्या नाहीत. हा त्यांचा गुण आम्ही सभागृहात आणि सभागृहाबाहेर देखील पाहिलेला आहे.

सभापती महोदय, सौ.प्रतिभाताई पाटील यांचा डॉ.शेखावत यांच्याशी विवाह झाला. त्या आमच्या जिल्ह्याच्या खासदार होत्या त्यामुळे त्यांना अतिशय जवळून पाहण्याची संधी आम्हाला मिळाली. मी सभागृहाला त्यांच्या स्वभावाविषयीची एक घटना सांगतो. त्या राज्यसभेच्या उपसभापती होत्या. त्यानंतर त्या महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा झाल्या. राज्य सभेच्या कामामध्ये आणि पार्टीच्या कामामध्ये फार मोठा फरक आहे. एकवेळ राज्यसभेचे उपसभापती पद परवडले, पण महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पद नको. त्यांनी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांची आणि माझी अमरावतीला जाताना भेट झाली. आम्ही एकाच डब्यातून प्रवास करीत होतो. मी त्यांना सहज म्हणालो की,

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 14:35

प्रा.बी.टी.देशमुख...

अगोदरचे काम बरे होते, हे प्रकृतीच्या दृष्टीने फार कटकटीचे काम आहे. त्यावर त्या असे म्हणाल्या की, बी.टी., आम्ही पक्षामध्ये काम करतो आणि पक्षाने आपल्यासाठी काही चांगले केले, आपल्याला चांगले दिले तर ते मान्य आणि कठीण असेल तर ते अमान्य, अशी भूमिका घेता येत नाही. त्यामुळे वरिष्ठांना व हायकमांडना अशी अपेक्षा असते की, आपण हे काम केले पाहिजे, त्यामुळे आपण ते काम निष्ठेने केले पाहिजे. त्यापुढे त्या असेही म्हणायच्या की, आमच्या पक्षाने निर्णय घेऊन आपल्यावर जबाबदारी सोपवलेली आहे. अशी जी त्यांची विचार करण्याची पध्दत आहे, त्याबाबत मला असे वाटते की, त्यांच्या यशामध्ये या विचारांचा फार मोठा सहभाग आहे. त्यांच्या पक्षाने त्यांना राज्यसभेचे उप सभापती केले. त्या पुढे असेही म्हणाल्या की, ठीक आहे, आज पक्षाने सांगितले की, महाराष्ट्र कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष व्हा. त्यावेळी त्यांनी दिलेली जबाबदारी मी स्वीकारली पाहिजे व त्यामुळे ती मी सानंद व आनंदपूर्वक पार पाडीन. काम करीत असताना हा जो त्यांचा विचार होता, त्याबाबतीत मला असे वाटते की, जीवनाच्या या अत्युच्च शिखरावर जाताना त्यांना या त्यांच्या विचारांनी खूप मोठी मदत केली आहे. डॉ.शेखावत मला जे बोलले त्यावरुन मला असे वाटते की, त्यासाठी आपण स्पर्धा करावी असा विचार त्यांच्या मनामध्ये नव्हता. त्या पक्षामध्ये विचार होऊन त्यांना राष्ट्रपती पदाची जबाबदारी देण्याबाबत विचार झाला. यामध्ये अपेक्षांची गोष्ट आहे, ती असणे स्वाभाविकच आहे. मलासुध्दा अनेक लोकांनी फोन करुन व घरी येऊन विचारले की, आता त्या राष्ट्रपती झाल्यानंतर आपल्याला 371 (2) या मुद्दासंबंधी त्यांची मदत होईल का ? मी सर्वांना म्हटले की, घटनेमध्ये अशी तरतूद आहे."There shall be a Council of Ministers with the Prime Minister at the head to aid and advise the President who shall, in the exercise of his functions, act in accordance with such advice." तेव्हा कायद्याच्या दृष्टीने विचार केला तर खूप मोठया अपेक्षा करणे बरोबर नाही. परंतु एखाद्या व्यक्तीला प्रश्नांची माहिती असेल, त्या प्रश्नांविषयी जिव्हाळा असेल तर त्याचा काहीना काही आपल्याला लाभ होतोच. तेव्हा अपेक्षा या स्वाभाविकच असतात. एवढया मोठया पदावर आपल्या आजूबाजूची व्यक्ती गेली तर त्यांच्याकडून अपेक्षा असणे हे स्वाभाविकच आहे. त्यांच्या निवडीबाबत मी मन:पूर्वक आनंद व्यक्त करतो व याठिकाणी सौ.प्रतिभाताई पाटील यांच्या

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

अभिनंदनाचा जो प्रस्ताव माननीय उप मुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांनी चर्चेसाठी मांडलेला आहे, त्यास पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद !

------

(..3.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे नेते व महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेबांनी नवनिर्वाचित राष्ट्रपती आदरणीय सौ.प्रतिभाताई पाटील यांच्या अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला, त्याचे समर्थन करण्याकरिता आणि त्या निमित्ताने माझ्या आनंदाच्या सहभावना व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, मला व्यक्तीश:, महाराष्ट्रातील नागरिकांना व देशातील नागरिकांना या निवडीबद्दल वेगळा आनंद झालेला आहे. विशेषत: महाराष्ट्राला का आनंद झाला, याचे वर्णन आताच सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी केले आहे. व्यक्तिगत, राजकीय, सामाजिक जीवनामध्ये माझ ी वाटचाल चालू असताना, मी सन 1968-69 मध्ये काँग्रेस सेवा दलात असल्यापासून ताईंना अतिशय जवळून पाहण्याची संधी मला मिळाली. त्यांचे व्यक्तिमत्व, त्यांचे विचार, त्यांचे नेतृत्व, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षामध्ये तसेच त्या प्रदेशाध्यक्ष असताना पक्षाचा प्रवक्ता म्हणून आणि त्यानंतर अनेक वर्षे त्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात असताना, विरोधी पक्षनेत्या असताना, मी महाराष्ट्र युवक काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून काम करीत असताना, मला अनेक अनुभव आलेले असून त्या माध्यमातून मला जीवनामध्ये खूप काही शिकता आले. आताच माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांनी उल्लेख केला की, त्यांच्या निवडीमुळे सावित्रीबाईंना सात्विक आनंद झाला असेल.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.........

माननीय प्रतिभाताईंची आणि माझी सुरुवातीला ओळख झाली त्यावेळी मी मुंबईमध्ये युवक कॉंग्रेस संघटनेमध्ये काम करीत असतांना अनेक प्रश्नांसाठी त्यांच्याकडे जात असे. त्यांना जेव्हा समजले की, मी वारकरी संप्रदायातील आहे त्यावेळी त्यांनी मला मोठया आनंदाने सांगितले होते की, "उल्हास, मी जळगाव जिल्हयातील आहे, माझा मतदारसंघ एदलाबाद, तापी नदीच्या किनारी संतशिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांची ही जी भावंड, निवृत्तीनाथ त्र्यंबकेश्वरला, मुक्ताई मुक्ताईनगरला म्हणजे पूर्वीचं एदलाबाद, सोपानकाका सासवडला आणि ज्ञानेश्वर महाराज आळंदीला, तर एक लक्षात ठेव की, मी मुक्ताईंच्या नगरीतील आहे." हे माननीय सौ.प्रतिभाताई पाटील यांनी मला अतिशय आनंदाने सांगितलं होत. "तेथे मुक्ताईंची जी समाधी आहे, मुक्ताईंचा वास, सहवास आहे त्यामुळे त्या नसतांना देखील त्या समाधीमधून आणि त्यांच्या अनेक अभंगांमधून माझ्या जीवनामध्ये मला जी प्रेरणा मिळाली, ती मी अत्यंत मोलाची समजते", असे माननीय ताईंनी मला अनेक वेळा सांगितलेलं आहे. त्यांच्याबरोबर बोलतांना, त्यांच्याशी चर्चा करतांना त्यांना एका ओवीची आठवण झ ाली आणि नंतर मी त्या ओवीचा उल्लेख केला. 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' हा जो अभंग मुक्ताईंनी वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षी रचला, माऊलींनी स्वत:ला कोंडून घेंतलं होतं, ते त्यांच्या आयुष्यात पूर्वी कधी चिडले नव्हते, रागावले नव्हते, पण स्वत: कोडून घेऊन, दार बंद करुन घेतलं होतं, त्यावेळी मुक्ताईंनी अभंग लिहिले. ओवीतील एका ओळीबाबत ताईंनी माझ्याशी तासभर चर्चा केली. 'भवसागर आपण व्हावे, नीज बोधे जग निववावे' या ओवीबाबत त्यांनी माझ्याशी चर्चा केली. सन्माननीय ताई पहिल्यांदा निवडून आल्या त्या सन 1962 साली. मी त्यावेळी पक्षात एवढा ॲक्टिव्ह नव्हतो. सन 1967 नंतर सेवादलाच्या माध्यमातून, कार्यकर्त्यांच्या माध्यमातून मी त्यांना भेटत होतो. त्यावेळी या ओवीची उकल करतांना त्या असं म्हणाल्या की, "आयुष्यात संत ज्ञानेश्वर कधी रागावले नव्हते, चिडले नव्हते पण स्वत:ची चीड म्हणा, त्यांनी स्वत:ला कोंडून घेतलं होतं आणि त्यावेळी त्यांना त्यांची सर्वात लहान असलेली बहिण, मुक्ताई वयाच्या तेराव्या वर्षी सांगते की, "भवसागर आपण व्हावे, नीज बोधे जग निववावे." स्वत:च्या बोधाने, तप्त झालेलं जग निवळण्याचं, शांत करण्याचं, थंड करण्याचं सार त्यामध्ये आहे." आता आपण चर्चा केली की वरचं सभागृह कशाकरिता आहे. चर्चेत असा उल्लेख आला की, हे सभागृह

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.........

झालेली सर्व चर्चा 'कूल' करण्याकरिता आहे. त्या पुढे असं म्हणाल्या की, "अत्यंत शांत चित्ताने, डोकं नेहमी शांत ठेऊन, धिरोदात्तपणे आपला मुद्दा न सोडता कसं वागावं, कसं काम करावं, याची प्रेरणा मुक्तांईच्या या अभंगातून मला मिळाली होती. त्यामुळे मुक्ताईनगरचं मी प्रतिनिधीत्व करते याचा मला आनंद आहे." आज सन्माननीय ताई देशाच्या सर्वोच्च पदी बसल्या असतांना स्वर्गामध्ये कदाचित मुक्ताईंना आनंद होईल, सावित्रिबाई फुल्यांना आनंद होईल आणि जळगाव जिल्हयातील श्रेष्ठ कवियित्री बहिणाबाईंनाही आनंद होईल. मला माहिती आहे की, सन्माननीय ताईंना अनेक कविता तोंडपाठ आहेत. बहिणाबाईंनी तर जीवनाचं तत्वज्ञानच त्यांच्या कवितात सांगितलं आहे. हल्ली महिलांच्या प्रश्नांबाबत आपण चर्चा करतो, ही सर्व चर्चा बहिणाबाईंनी त्यावेळी केलेली आहे. आजही सन्माननीय ताईंना अनेक कविता मुखोद्गत आहेत, हेही मी जवळून पाहिलेलं आहे. दुसरा एक ऐतिहासिक योगायोग आहे. जळगावमधील पारोळा मतदार संघाचा झाशीच्या राणीचा एक ऐतिहासिक संबंध आहे, ऋणानुबंध आहे. पारोळा हे झाशीच्या राणींच्या मामाचं गाव. "मेरी झांसी में नही दुंगी" असं म्हणणा-या झाशीच्या राणीच्या मामाचं गाव म्हणजे पारोळा. आपल्या पारुताई वाघ पूर्वी त्या मतदारसंघातून निवडून येत असत. त्याकाळी सन्माननीय सदस्य, श्री.सुधाकर गणगणे हे एन.एस.यु.आय.चे अध्यक्ष आणि मी महाराष्ट्र युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो. आज आपण महिलांना तेहतिस टक्के आरक्षण मिळण्याबाबत केवढी चर्चा करतो. त्यावेळी अशी काहीही चर्चा नसतांना विधानसभेमध्ये जवळ जवळ चोवीस महिला आमदार होत्या. आमदार निवासाचा पूर्ण एक मजला या महिला आमदारांनी व्यापलेला होता, एवढंच नव्हे तर सर्व महिला आमदारांना राहाता येत नव्हतं म्हणून आणखी अर्धा मजला देण्यात आला होता. ज्यावेळी तेहतिस टक्क्याची कधी चर्चा देखील नव्हती, त्यावेळी माननीय प्रतिभाताई पाटील या आमदार होत्या, अनेक महिला आमदार होत्या, केशरताई होत्या, विमलताई रांगणेकर होत्या, धुळयाच्या नीलाताई पाटील होत्या, बाजपेयी ताई होत्या, मामी भोर होत्या, महिला आमदारांची खूप नावं सांगता येतील. म्हणजे आम्हाला जर कँटीनमध्ये खाण्याचा कंटाळा आला तर माननीय प्रतिभाताईंना आणि या महिला आमदारांना आम्ही विनंती करायचो की, आम्हाला कँटीनच्या खाण्याचा कंटाळा आला आहे, आज आम्ही जेवायला येऊ का ? अतिशय आनंदाने पुष्कळशा या भगिनी आमदार आम्हाला जेवायला बोलवत असतं, त्याची आज मला या निमित्ताने आठवण होते.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 14:45

श्री.उल्हास पवार ........

मी प्रदेश काँग्रेसचा प्रवक्ता असतांना त्यांनी मला कामाची संधी दिली होती. त्यावेळी मी प्रदेश काँग्रेसचा प्रवक्ता होतो आणि माननीय सौ.प्रतिभाताई पाटील तीन वर्षे अध्यक्षा होत्या. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ निवृत्त अधिकारी म्हणजे आय.जी.प्रिझन या पदावर असलेले, त्यांचे नाव मी सांगत नाही कारण ते संयुक्तिक होणार नाही. मी गांधी भवनातील प्रदेश काँग्रेसच्या कार्यालयामध्ये बसलेलो होतो. माननीय सौ.प्रतिभाताई कार्यालयामध्ये यायच्या होत्या. ते अधिकारी माझ्याकडे आले आणि म्हणाले की, मला ताईंना भेटायचे आहे. मी त्यांची ताईंशी ओळख करुन दिली. त्यांनी असे सांगितले की, मला काँग्रेस पक्षामध्ये येऊन सामाजिक कार्य करायचे आहे. थोडया वेळाने माझ्या असे लक्षात आले की, लोकसभेच्या निवडणुका जवळ आलेल्या आहेत. ताईंशी मी त्यांची ओळख करुन दिली आणि सांगितले की, हे अमुक-अमुक आय.जी.प्रिझन, यांना लोकसभेच्या निवडणुकीला उभे रहायचे आहे. त्यावर ताई म्हणाल्या की चांगली गोष्ट आहे, यांचा बायोडाटा कोठे आहे ? मी ताईंना सांगितले की, ते खूप शिकलेले आहेत, त्यांनी पुस्तके लिहिलेली आहेत. त्यांना ताईंनी विचारले की, तुम्हाला कोणत्या मतदार संघातून निवडणुकीला उभे रहावयाचे आहे. मी सांगण्याच्या आधीच ते निवृत्त अधिकारी म्हणाले की, मतदारसंघ वगैरे काही नाही, महाराष्ट्रातील कोणत्याही मतदारसंघातून मला निवडणुकीला उभे केले तरी चालेल. त्यांनी असे सांगितल्यानंतर ताईंनी ज्या त-हेने माझ्याकडे पाहिले, त्यांच्या पाहण्यामध्ये आणि डोळयामध्ये जे भाव होते त्यातून मला त्यांची विनोदबुद्धी दिसली. ते निवृत्त अधिकारी तेथून उठून गेल्यानंतर थोडया वेळाने ताई मला खाजगीत असे म्हणाल्या की, अशा काही केसेस आल्या तर आधी तुम्ही बघत जा आणि नंतर त्यांना माझ्याकडे आणत जा. त्यांची अशी विनोदबुद्धी मला त्या प्रदेश काँगेसच्या अध्यक्षा असतांना बघावयास मिळाली.

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, सामाजिक प्रश्नांची उकल करीत असतांना त्या शिक्षण मंत्री असतील, समाजकल्याण मंत्री असतील, आरोग्य मंत्री असतील हे सर्व करीत असतांना एक अत्यंत महत्वाची परंतु हृदयस्पर्शी अशी माझी एक आठवण या निमित्ताने मी सांगू इच्छितो. मी महाराष्ट्र युवक काँग्रेसचा अध्यक्ष होतो, त्यावेळी ताई समाज कल्याण मंत्री होत्या. मी पुण्यामध्ये असतांना पुण्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या होस्टेलमधील आदिवासी विद्यार्थी डॉ.डगला नंतर तो

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार ........

आयुष्यामध्ये डॉक्टर झाला, त्या विद्यार्थ्याला घेऊन एक दलित विद्यार्थी माझ्याकडे आला आणि मला असे म्हणाला की, दादा हा लागोपाठ दोन वेळा नापास झाल्यामुळे याला कायद्याप्रमाणे आता वसतिगृहातून बाहेर काढतील. कोठे जायचे, काय खायचे असा प्रश्न आता या विद्यार्थ्याला पडलेला आहे. या विद्यार्थ्यांची डॉक्टर होण्याची जीद्द आहे. मी त्या विद्यार्थ्याला ताईंकडे घेऊन गेलो आणि ताईंना सांगितले की, हा विद्यार्थी लागोपाठ दोन वेळा नापास झालेला आहे, हा विद्यार्थी नापास होण्याचे कारण असे आहे की, गावी पाडयावर या विद्यार्थ्याची आई आहे, त्याचा एक भाऊ मनोरुग्ण आहे, मनोरुग्ण झालेला त्याचा भाऊ त्याच्या आईला मारहाण करतो, खूप त्रास देतो, हा विद्यार्थी अतिशय मातृभक्त आहे आणि आईच्या काळजीमुळे दोन वर्ष त्याचा अभ्यास झालेला नाही म्हणून हा विद्यार्थी नापास झालेला आहे, आपल्या खास अधिकाराचा वापर करुन जर या विद्यार्थ्याला काही मदत करता आली तर त्याला मदत करावी, अशी मी आपल्याला विनंती करण्यासाठी आलेलो आहे, असे मी ताईंना सांगितले. ताईंनी क्षणात अधिका-यांना बोलाविले, सर्व अभ्यास केला आणि स्वत:चे अधिकार वापरुन कायद्यामध्ये, नियमामध्ये अपवाद करुन त्या विद्यार्थ्याला वसतिगृहामध्ये रहाण्याची परवानगी दिली. नंतर दोन-तीन वर्षांनी तो विद्यार्थी डॉक्टर झाला. तो विद्यार्थी ताईंच्या पाया पडण्यासाठी आला आणि ताईंसमोर ढसाढसा रडला आणि म्हणाला की, ताई आपण जर नसता तर मी डॉक्टर झालो नसतो. दूरदृष्टीमुळे आणि दीन-दुबळयांवर कृपादृष्टी ठेऊन घेतलेल्या निर्णयामुळे आपण मला डॉक्टर केलेले आहे म्हणून मी कोणत्याही शहरामध्ये प्रॅक्टीस करणार नाही. मी माझ्या आदिवासी पाडयामध्ये जाऊन प्रॅक्टीस करीन. त्याने आयुष्यभर पालघरजवळच्या, डहाणूजवळच्या आदिवासी पाडयावर काम केले, हे मी स्वत: पाहिलेले आहे. त्या विद्यार्थ्यांच्या मेसचा दर प्रती महिना दीडशे रुपये होता. आम्ही आणि आज राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पुणे शहराचे अध्यक्ष श्री.जयदेव गायकवाड पूर्वी ते दलित पॅंथरमध्ये काम करीत होते. त्या सर्व दलित विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ घेऊन मी ताईंकडे गेलो. त्या विद्यार्थ्यांच्या मेसचा दर प्रती महिना दीडशे रुपये होता तो साडेतीनशे रुपये करण्यात आला होता. तो दर ताईंनी वाढवून त्यांच्या काळामध्ये साडेसहाशे रुपये केला होता. त्या विद्यार्थ्यांना चांगले सकस अन्न मिळावे यासाठी ताईंनी समाजकल्याण मंत्री असतांना प्रयत्न केलेला आहे. ताईंच्या अशा अनेक आठवणी मला येथे सांगता येतील.

..3...



GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ......... 14:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार ........

सभापती महोदय, माननीय सौ.प्रतिभाताई पाटील यांच्या जीवनातील महत्वाचे टप्पे कदाचित खूप कमी लोकांना माहीत असतील. कॉलेज जीवनामध्ये त्या ब्युटी क्वीन म्हणून निवडून आल्या होत्या, ही ताईंनीच मला सांगितलेली गोष्ट आहे. सर्वात देखणी तरुणी म्हणून महाविद्यालयीन जीवनात ताईंची निवड झालेली होती.

यानंतर श्री.गागरे .....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार .....

त्यांना शालीन असे नैसर्गिक सौंदर्य लाभलेले आहे. त्यांच्या आजपर्यंतच्या वाटचालीमध्ये डोक्यावरचा पदर कधीही ढळलेला नाही. त्यांच्या सौदर्याला शालिनता, सभ्यता, शुचिर्भूत, लीनता व नम्रतेची वैभवशाली झालर असल्याचे तुम्हा-आम्हाला पहावयास मिळत आहे. महाराष्ट्रातील आदरणीय व सर्वश्रेष्ठ अशी महिला सर्वोच्च पदावर विराजमान होताना मुक्ताई, सावित्रीबाई फुले तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना स्वर्गात निश्चितच आनंद होईल. कारण त्यांनी महिलांच्या उत्थानाकरिता फार मोठे काम केलेले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या पत्नी कस्तुरबा गांधी 1913 साली जगातील पहिल्या महिला सत्याग्रही म्हणून जोहान्सबर्ग येथे सहभागी झाल्या होत्या. सौ.प्रतिभा पाटील यांच्या निवडीमुळे त्यांनाही आनंद होईल. कारण त्यांची इच्छा होती की, स्वतंत्र भारतामध्ये सर्वोच्च स्थानावर सर्व पदावर शोषित व वंचित माणूस बसला पाहिजे व महिलांनाही ते स्थान मिळाले पाहिजे. स्वातंत्र्यानंतरच्या सुमारे 60 वर्षाच्या कालावधीमध्ये के.आर. नारायणन यांच्यासारखा शोषित व वंचित समाजाचा अत्यंत विद्वान असा प्रतिनिधी राष्ट्रपती पदावर विराजमान झाला व आज सौ.प्रतिभाताई पाटील हया पदावर विराजमान होत आहेत. दोन्ही गोष्टींचा सात्विक आनंद राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना स्वर्गात झाल्याशिवाय राहणार नाही. भारत व आपला महाराष्ट्र संपूर्ण आशिया खंडाला नव्हेतर जगाला मार्गदर्शक आहे. 350 वर्ष लोकशाही असलेल्या अमेरिकेसारख्या अनेक राष्ट्रात देखील काळा निग्रो माणूस उपाध्यक्ष होऊ शकत नाही तर अध्यक्ष होणे दूरची बाब राहिली. परंतु हे काम महाराष्ट्राच्या व भारताच्या 50 वर्षाच्या इतिहासामध्ये के.आर. नारायणन यांच्या रुपाने झाल्याचे दिसले आहे आणि आज या खंडप्राय देशाच्या राष्ट्रपती पदावर आज सौ.प्रतिभाताई विराजमान होत आहेत. हे कामही अमेरिकेला जमले नाही. कदाचित अमेरिकेच्या या निवडणूकीत जमेल की नाही हे मला माहिती नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मुक्ताई यांच्याकडून सामाजिक व वैभवशाली वारसा भारताला व महाराष्ट्राला मिळाला आहे म्हणून सौ.प्रतिभा पाटील यांच्या निवडीचे आपण साक्षीदार आहोत. मी आपल्या सात्विक आनंदामध्ये सहभागी आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या या प्रस्तावाचे मी मनापासून समर्थन करतो व या ठरावाला पाठिंबा देऊन माझे मनोगत थांबवितो.

-----

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

श्री.अरुणभाई गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

आज आमचा आनंद गगनात मावत नाही. आमच्या जीवनातील अत्यंत आनंदाचा दिवस व अत्यंत आनंदाचा क्षण आहे. म्हणून निकाल लागल्यानंतर सर्वांना इतका आनंद झालेला आहे. खानदेश कन्या महाराष्ट्र कन्या झाली आणि आज भारत कन्या झाली. अत्यंत निर्मळ, निरपेक्ष, निष्कांचन जीवन मागील 40 वर्षाच्या सामाजिक व राजकीय जीवनात त्या जगल्या आहेत. त्याच्यामुळे हा लाभ त्यांना लाभला आहे. त्यांच्या विजयाच्या माध्यमातून भारताच्या संस्कृतीचे दर्शन आपल्याला घडले आहे. पक्षनिष्ठा, समाजनिष्ठा, देशनिष्ठा याचा लाभ त्यांना मिळाला असे न म्हणता त्याच्या कार्यपध्दतीमुळे त्यांना विजय मिळाला ही वस्तुस्थिती आपल्याला सांगता येईल.

A nation is revealed by the person he worships and the vision he cherishes. 1962 मध्ये त्या आमदार झाल्या. त्यावेळी मी विद्यार्थी होतो. त्यावेळी टाईम्स ऑफ इंडियामध्ये पहिल्या पानावर "M.L.A. from Jalgaon" असे त्यांच्याबद्दल छापून येत होते. पहिल्या दिवसापासून त्या कामाला लागल्या. "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन" 1962 साली विधानसभेमध्ये विविध विषयावर त्या प्रश्न विचारत होत्या. त्यावेळी त्यांना राष्ट्रपती पद मिळेल अशी अपेक्षाही नव्हती. असेल ते काम करण्याचा त्यांचा दृष्टीकोन होता. हा विचार अत्यंत महत्वाचा होता. त्यांच्या निवडीमुळे केवळ हिंदुस्थानात नव्हे तर जगामध्ये भारताच्या गुणग्राहकतेची नोंद झालेली आहे. गुणी माणसांची या देशामध्ये कदर होते व त्यांना आदर मिळतो. मी मेळघाटात असताना त्यांची उमेदवारी जाहीर झाल्याची बातमी समजली. मेळघाटात मोबाईल लागत नव्हते. परंतु काही कार्यकर्ते धावत-पळत आले व त्यांनी सांगितले की, ताईंना तिकीट मिळाले व ताई आता राष्ट्रपती होतील. ताई राष्ट्रपती होतील हे निश्चितपणे माहिती होते परंतु तीन लाखाने निवडून येतील हे माहिती नव्हते.

"हम समझते थे कि हम ही चाहते है आपको
मगर आपको चाहने वाला तो काफिला निकला
हमने बात की खुदा से, तो वह भी आपका चाहने वाला निकला "

सौ.प्रतिभा पाटील निवडून येण्यासाठी शिवसेनेनेही मदत केली आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुजराती ....

आपल्याला वाटत होते की, 2 लाख मतांनी ताई निवडून येतील पण त्या 3 लाख मतांनी निवडून आल्या. आपण आपल्या जीवनामध्ये चांगल्या पद्धतीने, एक समर्पित भावनेने जीवन जगलो, 40 वर्षांचे समर्पण सोपे नाही. राजकारणात काम करीत असताना प्रलोभने असतात, किती तरी बाबी असतात. जे पद मला मिळेल त्या पदाला न्याय देण्याच्या संदर्भातील विचार मी करीन. त्या आमदार होत्या, मंत्री झाल्या, त्यानंतर विरोधी पक्षनेता देखील झाल्या. काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा म्हणूनही त्यांनी काम केले. राजस्थानच्या राज्यपाल आणि आता त्यानंतर राष्ट्रपती म्हणून त्यांची निवड झाली आहे. यामध्ये केवळ नशीब आहे असे नाही तर निष्ठा देखील तितकीच महत्त्वाची आहे. मी काम कोणासाठी करतो हे अत्यंत महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने त्यांच्यावर काही आरोप करण्यात आले. आमचे नेते आदरणीय श्री.शरद्चंद्रजी पवार यांनी त्या आरोपांचे देखील खंडण केले. सार्वजनिक जीवनामध्ये हे होत असते. पण एक शायर म्हणतो

ए चांद मैंने तो बहुत सारे चांद देखे हैं
तुझ पर तो दाग है, मैंने तो बेदाग देखे हैं.

असे अत्यंत निर्मळ आणि सोज्वळ असे व्यक्तिमत्व, सर्वांना सोबत घेऊन जाणारे व्यक्तिमत्व आणि हे सर्व करीत असताना देखील अजातशत्रू. सभापती महोदय, गेली 20-25 वर्षांमध्ये अनेकदा त्यांच्या सोबत काम करण्याची संधी मला मिळाली. अत्यंत शांतपणे त्या काम करीत असत. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य मित्रांनी बहिणाबाईंचा उल्लेख केला. तीच त्यांची पवित्र भूमी. नाडगाव म्हणून गाव आहे. नाडगाव ते जळगाव, जळगाव ते मुंबई, मुंबई ते दिल्ली, दिल्ली परत दिल्ली व्हाया जयपूर. सभापती महोदय, प्रवास कसा करावा लागतो वा होतो ते कोणाच्याही हातात नसते. पण माझ्या जीवनातील प्रवास मी चांगल्या पद्धतीनेच करीन, माझे जीवन हे माझ्यासाठी नाही. I want to be happy, but I cannot be happy unless I see you happy too. In joy of others, lives of our own. In good of others, finish of our own. In progress of others abide by our own. दुसऱ्याच्या सुखात माझे सुख आहे, दुसऱ्याच्या दुःखात माझे दुःख आहे. समोरचा माणूस संकटात असेल तर ते माझेही संकट आहे अशा पद्धतीने ज्यावेळेस जीवनाची वाटचाल होते त्यावेळेस ती वाटचाल जीवनामध्ये मी समर्पित जीवनाच्या माध्यमातून मी जगेन अशा पद्धतीचे कार्य आदरणीय प्रतिभाताईंच्या माध्यमातून झाले आहे.

........ एक्स 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुजराती .....

त्या आता राष्ट्रपती झालेल्या आहेत. अनेकांच्या आकांक्षा वाढलेल्या आहेत. त्यांच्या नेतृत्त्वाच्या माध्यमातून भारताच्या विकासाचे एक नवे पर्व सुरू होईल आणि त्या विकासामध्ये सामाजिक न्याय आपल्याला दिसेल, महिलांचे उन्नयन होईल, अनुसूचित जाती-जमाती, गरीबांचे उन्नयन होईल, झ ोपडीत राहणाऱ्या माणसांचे उन्नयन होईल. झोपडीला असते काळीज, मातीला असते माया, फाटक्याच्या स्वप्नाला विकासाची ओढ, त्या फाटक्या माणसाचा विकास होईल अशा पद्धतीची अपेक्षा पूर्ण होईल अशी आम्हाला खात्री आहे, पुनश्च त्यांचे अभिनंदन.

( **सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री. उल्हास पवार** )

....... एक्स 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या देशाच्या सर्वोच्च पदावर महाराष्ट्राची एक लेक जाते आहे त्याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी या सदनाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी जो प्रस्ताव मांडला आणि या सभागृहाला आपल्या आनंदात सहभागी करून घेतले त्याबद्दल मी प्रथमत: त्यांचे आभार मानतो. सभापती महोदय, या सभागृहामध्ये यापूर्वी वरिश्ठ सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यांच्याशी मी सहमत आहे. पण दोन कारणांसाठी अधिक आनंद मला प्रतिभाताईंच्या विजयामध्ये दिसतो आहे. एक तर समस्त स्त्री वर्गाला अत्यंत अभिमानास्पद अशी ही घटना आहे, अत्यंत गौरवशाली अशी ही घटना आहे. प्रतिभाताई ह्या केवळ स्त्री आहेत म्हणून नाही तर खऱ्या अर्थाने त्या पूर्ण स्त्री आहेत. स्त्रीला स्वत:चे असे स्वतंत्र अस्तित्व असते, स्वत:ची अशी ओळख असते, अस्मिता असते. बऱ्याचदा असे होते की, लग्नानंतर स्त्रीची ओळख मिटते. पण प्रतिभाताईंनी लग्नानंतरही आपल्या आईवडीलांचे नाव आवर्जून जपले. आणि त्यांच्या सासरच्या मंडळींनी देखील त्यास मान्यता दिली हा त्यांचाही मोठेपणा आहे. पण आपले अस्तित्व आणि आपली ओळख, माहेरची ओळख त्यांनी जपली म्हणून प्रतिभाताई पाटील या पूर्ण स्त्री होतात, खऱ्या अर्थाने मुक्ताई आहेत आणि अशा या प्रतिभाताई आज राष्ट्रपतीपदी पोहोचल्या आहेत त्यांचा मला अतिशय आनंद होत आहे. प्रतिभाताई, राष्ट्रपतीपदी पोहोचणारी जी व्यक्त असते ती पूर्ण देशाचे आकलन असलेली, देशाची एकता, अखंडता धर्मनिरपेक्षता राखणारी असली पाहिजे ही अपेक्षा नेहमीच व्यक्त होत असते. सभापती महोदय, मी जेव्हा खालच्या सभागृहामध्ये पत्रकार होतो तेव्हा पहात होतो तेथे प्रतिभाताईंची भाषणे, त्यांचे कामकाज, मंत्री असतानाही पूर्ण राज्याचे आकलन, राज्याबद्दलची, देशाबद्दलची त्यांची दृष्टी त्यांच्या प्रत्येक वक्तव्यातून प्रकट होत असे. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... वाय 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपलि पाटील ...

सभापती महोदय, राजस्थानच्या राज्यपालपदी असतांना त्यांचे जे वर्तन होते ते खऱ्या अर्थाने धर्म निरपेक्ष व्यक्ती म्हणून त्यांनी काम केले, राज्याचे प्रमुख म्हणून काम केले आहे.त्या राज्यामध्ये धर्म स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारावर अतिक्रमण करणारे बिल मांडण्यात आले. त्यावेळी ते बिल परत पाठविण्याचे धाडस त्यांनी दाखविले. म्हणून मला अधिक आनंद होतो. अशाप्रकारे या सभागृहामध्ये सभासदत्वाची शपथ घेणाऱ्या किंवा मंत्रिपदावर जाणाऱ्या व्यक्तिला धर्मनिरपेक्षतेला साक्ष ठेऊन शपथ घ्यावी लागते. परंतु ज्यावेळी कृती करण्याची वेळ येते, महत्वाची घटना घडल्यानंतर कसोटीची वेळ येते त्या कसोटीच्या वेळी माणूस काय निर्णय घेतो हे महत्वाचे असते. राजस्थानच्या राज्यपाल पदावर असतांना माननीय सौ. प्रतिभाताईंनी निर्णय घेऊन धर्म स्वातंत्र्यावर गदा आणणारे बिल परत पाठविण्याचे धाडस त्यांनी दाखविले त्याबद्दल खरोखरच त्यांना सलाम केला पाहिजे. खऱ्या अर्थाने स्त्रिचे स्वातंत्र्य, स्त्रिचे स्वतंत्र अस्तित्व, ओळख जपणारी व धर्मनिरपेक्षतेची मूल्ये मनोमन जपणारी व्यक्ती देशाच्या प्रमुख पदावर जाते याचा आम्हाला मोठा आनंद होत आहे. संसदीय लोकशाहीबद्दल त्यांना फार आस्था होती. या सभागृहाच्या स्वतंत्र अस्तित्वाबद्दल, त्याच्या सार्वभौमत्वाबद्दल अतिशय जागरुक असायच्या. वैधानिक मंडळे निर्माण करण्याबाबत लोकांची मागणी होती. त्या वैधानिक विकास मंडळाच्या विधेयकावर त्यांनी विधानसभेमध्ये जो प्रतिवाद केला तो मी पत्रकार गॅलरीमधून पहात होतो. तो प्रतिवाद ऐकल्यानंतर थक्क होत होतो. त्यांच्यामध्ये या सभागृहाच्या हक्काबाबत जी तळमळ होती ते हक्क व अधिकार वैधानिक मंडळाच्या निर्मितीमुळे संकुचित होता कामा नयेत असे सांगण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांनंतर असे अनेक प्रसंग घडले. आणि या सभागृहाचे हक्क कसे संकुचित होत गेले हे आपण पाहिले आहे. घटनेतील तरतुदीनुसार वैधानिक विकास मंडळांची आपल्याला गरज आहे. परंतु हे करीत असतांना त्यांनी मांडलेली भूमिका खरोखरच अभिमानास्पद आणि गौरवशाली आहे. अशाप्रकारे माननीय सौ. प्रतिभाताई पाटील या भारताच्या राष्ट्रपती होत आहे याबद्दल मी माझ्या लोकभारती पक्षातर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब यांनी माननीय सौ. प्रतिभाताई पाटील यांची राष्ट्रपती पदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा जो ठराव मांडला आहे त्या ठरावाला पाठिंबा देण्याकरिता मी याठिक्‍ाणी उभी आहे. आदरणीय सौ. प्रतिभाताई पाटील या भारतासारख्या खंडप्राय देशाच्या महामहिम राष्ट्रपती होत असून त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करते. त्यांचे व्यक्तिमत्व हे शांतपणे तेवणाऱ्या निरांजनातील ज्योतीसारखे आहे. शांत शालीन सुस्वभावी आणि सुसंस्कृत असे त्यांचे व्यक्तिमत्व खरोखरच मनाला भावणारे आहे. त्या या प्रगल्भ लोकशाही राबविणाऱ्या खंडप्राय देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान होत आहेत. याबद्दल निश्चितच आपणा सर्वांना आनंद होत आहे. इतकेच नव्हेतर आमचा आनंद हा व्दिगुणी आणि त्रिगुणी झाला आहे. पहिली गोष्ट म्हणजे त्या सर्वोच्च पदावर विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला राष्ट्रपती होत आहेत. त्यामुळे समस्त महिला वर्गाला अभिमान वाटत आहे, त्यांच्याबद्दल अतिशय ममत्व वाटत आहे.दुसरे म्हणजे त्या महाराष्ट्राच्या सुकन्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जनतेला पराकोटीचा आनंद झाला आहे. तिसरे म्हणजे आपल्या अधिक जवळची व्यक्ती एवढया मोठया उच्च, सर्वोच्च पदावर जावून पोहोचली आहे या भावनेची अनुभूती विलक्षण आहे. मी आणि सौ. प्रतिभाताई राज्यसभेमध्ये एकत्र काम करीत होतो. 1984 मध्ये राज्यसभेची निवडणूक झाली त्यावेळी आम्ही सात जण राज्यसभेवर निवडून गेलो. त्यामध्ये आमच्याबरोबर निवडून गेलेल्यांमध्ये वरिष्ठ माननीय श्री. हुसेन दलवाई साहेब होते. ते नंतर लगेच लोकसभेच्या निवडणुकीमध्ये रत्नागिरी मतदारसंघामधून उभे राहिले व लोकसभेवर निवडून गेले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार ) : सिनियर दलवाई.

श्रीमती सुधा जोशी : होय, सिनियर हुसेन दलवाई. म्हणूनच श्री.हुसेन दलवाई रत्नागिरीतून लोकसभेवर निवडून गेले असे मी मुद्दाम सांगितले. त्यांच्या जागेवर श्रीमती प्रतिभाताई पाटील निवडून गेल्या. त्या नंतर एक वर्षांनी त्या राज्यसभेच्या उपाध्यक्षा झाल्या. मी त्यांना प्रत्यक्ष सभागृह चालवताना पाहिलेले आहे. राज्यसभेचे कामकाज चालविणे तसे सोपे नाही. परंतु त्यांनी राज्यसभा अत्यंत समर्थपणाने हाताळली, असे मला अभिमानाने सांगावेसे वाटते. महाराष्ट्रात पाच वेळा विधानसभेवर त्या निवडून गेल्या. त्यांनी जवळजवळ सर्व विभागाच्या मंत्री पदाचा अनुभव घेतला. मंत्री असतांना प्रत्येक विभागामध्ये त्यांनी आपली छाप पाडून उत्कृष्ट अशाप्रकारचा कारभार केला. राजस्थानचे राज्यपाल पद देखील त्यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने पार पाडले. ते जे काम हाती घेत असत त्याला त्यांनी न्याय दिलेला आहे. ज्या पदावर त्या विराजमान होतील, त्या पदाला पुरेपूर न्याय देणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. आताही सर्वोच्च पदावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा त्या उमटवतील आणि त्या पदाची शान वाढवतील यात मला तिळमात्र शंका वाटत नाही.

सभापती महोदय, देशाच्या नागरिकांच्या विशेषत: महिलांच्या त्यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. सर्वांच्या अपेक्षांची त्या समर्थपणे पूर्तता करतील. त्यांची कारकीर्द ही अत्यंत उत्कृष्ट होवो, देशसेवेची ही महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडण्याकरिता त्यांना उदंड आयुष्य आणि उत्तम आरोग्य प्राप्त होवो, अशी मी परमेश्वर चरणी प्रार्थना करते आणि सभागृहाच्या माननीय नेत्यांनी जो ठराव मांडलेला आहे, त्या ठरावाचे समर्थन करून माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर. पाटील यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे, त्याबद्दल त्याचे मी अभिनंदन करतो आणि प्रस्तावाचे समर्थन करतो.

या ठिकाणी सन्मानीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर माझ्या मनात प्रश्न निर्माण झाला. श्रीमती प्रतिभा पाटील यांचे अवर्णनीय व्यक्तिमत्व असल्याचे वर्णन करण्यात आले. कदाचित त्यांच्यावर अन्याय झाला असे माझे मत आहे. याच्या अगोदरच राष्ट्रपतीपदी कोणाला नियुक्त करायचे, याबाबतची ज्यावेळी चर्चा झाली, त्यावेळेला महाराष्ट्रातून त्यांचे नाव जायला पाहिजे होते. भारतीय जनता पक्षाने नेहमीच स्त्री शक्तीची, मातृशक्तीची पूजा केलेली आहे. भारतीय जनता पक्षाने केवळ स्त्री म्हणून श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना विरोध केला नाही. राष्ट्रपती पदावरील व्यक्ती ही अबाव्ह ऑल असावी, त्यांचे व्यक्तिमत्व राजकारणविरहित असावे, साधरणत: असा मतप्रवाह या देशामध्ये आहे. सुरुवातीच्या काळामध्ये जर कॉंग्रेस पक्षाने दहा-बारा महिलांची नावे काढली असती आणि सर्व पक्षांना बोलाविले असते तर त्या नावांची छाननी करून दोन-तीन महिलांची नावे निश्चित झाली असती आणि मग भारतीय जनता पक्षाने त्यास विरोध केला असता तर आम्हाला वाईट वाटले असते. श्रीमती प्रतिभाताई पाटील या स्त्री राष्ट्रपती झाल्या, याबाबत काही गोष्टी रेकॉर्डवर आलेल्या आहेत. त्यांचे स्पष्टपणाने अभिनंदन करताना आम्हालाही अभिमान वाटला असता. छत्रपती शिवाजी महाराजांचे या ठिकाणी वर्णन केले गेले. आम्ही माता जिजाऊ यांना मानतो. आपल्या संस्कृतीमध्ये पितृदेवो भव, असे पहिल्यादा म्हणत नाहीत, तर मातृदेवो भव असेच म्हणतात. कोणतेही शुभ कार्य हे स्त्री शिवाय पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे देशाच्या सर्वोच्च पदावर सौ.प्रतिभाताई पाटील यांची निवड झाल्याबद्दल तुम्हा-आम्हा सर्वांना अभिमान आहे. पण या निवडणुकीच्या काळात जे कवित्व झाले ते का झाले ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सुरुवातीच्या काळामध्ये माननीय श्री. शिवराज पाटील यांचे नाव पुढे आले. त्यावेळी सौ. प्रतिभाताई पाटील यांचे नाव का आले नाही ? कारण ते नाव डाव्या कम्युनिस्टांना मान्य झाले नाही. काही गोष्टी रेकॉर्डवर यावयास पाहिजेत नाही तर अभिनंदन करताना भारतीय जनता पक्षावर अन्याय होईल. श्री. शिवराज पाटील यांचे नाव डाव्यांना मान्य झाले नाही म्हणून मग त्या ठिकाणी श्री. सुशीलकुमार शिंदे यांचे नाव पुढे आले. श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या नावाला मायावतींनी विरोध केला म्हणून डॉ. करणसिंग यांचे नाव पुढे आले. मी अग्रलेख आणि बातम्या पाहिलेल्या आहेत की, डॉक्टर करणसिंग हे लिटलबिट, मला इंग्रजी वर्तमानपत्रातले वाक्य आठवते...

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, निवडणुकीपूर्वी जे झाले ते आज विसरण्याची आवश्यकता आहे. पूर्वी जे झाले तेच पहिल्यांदा क्लेशकारक आहे. आता राष्ट्रपती पदी निवड झ ाल्यानंतर ते सगळे जुने काढून आणखी पुन्हा एकदा अमूक पर्याय मान्य झाले नाहीत म्हणून हा पर्याय आणला असे म्हणणे बरोबर नाही. आता राष्ट्रपती पदावर निवड झालेल्या व्यक्तीबद्दल असे म्हणणे बरोबर नाही.

**तालिका सभापती** (श्री. उल्हास पवार ) : मला असे वाटते की, सन्माननीय महामहिम राष्ट्रपती पदी निवड झालेल्या सौ. प्रतिभाताई पाटील यांच्याबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव या ठिकाणी चर्चेला येत असताना आपण सर्वांनी त्यांचे अभिनंदन करावे. याबाबतीत राजकीय कॉमेन्ट्स करु नये. या ठिकाणी राजकीय कॉमेन्ट्स करणे टाळलेले चांगले होईल असे मला वाटते.

श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय आबा, आपण जसे सूर्याजी पिसाळ हा आपला शब्द मागे घेतला तसा मी हा शेवटचा शब्द मागे घेतो.

श्री. नारायण राणे : सन्माननीय सदस्यांना या ठिकाणी "आबा" सुध्दा म्हणता येणार नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी या ठिकाणी सन्माननीय श्री. आर. आर. पाटील असा उल्लेख करतो. मी ते आदरपूर्वक बोललो. या ठिकाणी सौ. प्रतिभाताई पाटील यांचे मी अभिनंदन करतो. हे अभिनंदन करीत असताना....

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माझे काही तरी एक नाव नक्की करावे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना आर. आर. पाटील म्हटलेले चालत नाही आणि यांना आबा म्हटलेले चालत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी निवडणूक संपल्यानंतर महाराष्ट्राच्या कन्या सगळ्या राष्ट्राच्या प्रमुख झालेल्या आहेत. या देशामध्ये अनेक प्रश्न आहेत. राष्ट्रपती ही घटनेचे संरक्षण करणारी सर्वोच्च व्यक्ती असते असे मानले गेले तरी मंत्रिमंडळाच्या सल्यानुसारच त्यांना अनेक निर्णय घ्यावे लागतात. आमचे नेते माननीय श्री. पांडुरंग फुंडकर यांनी एक इच्छा व्यक्त केली तीच इच्छा व्यक्त करुन सौ. प्रतिभाताई पाटील या राष्ट्रपती पदी नवनिर्वाचित झालेल्या आहेत त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. शेवटी एकच सांगतो की, सभागृहाचे सन्माननीय नेत्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अतिशय गौरवपूर्ण उल्लेख केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी राष्ट्रद्रोही माणसाला कधीही माफ केले नाही. आम्ही अशी अपेक्षा व्यक्त करतो की, संसदेवरील हल्ल्याप्रकरणी अफझल गुरुला सर्वोच्च न्यायालयाचे जी फाशीची शिक्षा दिलेली आहे त्या फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राष्ट्रपती पदाची शपथ घेतल्यानंतर 15 ऑगस्टच्या पूर्वसंध्येला भाषण करण्यापूर्वी अफझल गुरुला फाशी देण्याच्या फाईलवर माननीय राष्ट्रपती महोदया सही करतील. महाराष्ट्राच्या कन्या असलेल्या, देशाच्या सर्वोच्च पदी निवड झालेल्या आदरणीय महामहिम राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील यांची कारकीर्द भारताचे नाव जगामध्ये उज्ज्वल करणारी होवो. मला असे वाटते की, अमेरिकेच्या पुढच्या निवडणुकीमध्ये श्री. बिल क्लिंटन यांच्या पत्नी श्रीमती हिलरी क्लिंटन अमेरिकेच्या अध्यक्ष होण्याची शक्यता आहे. त्यापूर्वीच अतिशय प्रकल्भ असलेल्या आपल्या लोकशाही व्यवस्थेमध्ये तो मान भारताला आधी मिळाला. एक स्त्री, एक महिला, आदरणीय व्यक्तिमत्व असलेल्या महाराष्ट्राच्या कन्या देशाच्या सर्वोच्च पदी आरुढ झालेल्या आहेत त्याबद्दल हृदयापासून त्यांचे अभिनंदन करतो. त्यांची कारकीर्द या देशाच्या वैभवात, या देशाच्या सांस्कृतिक जीवनात, या देशाच्या सामाजिक जीवनात प्रगती करणारी ठरो अशा शुभेच्छा देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी री. बरवड 15:15

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभने निवडलेले) : सभापती महोदय, सदनाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी जो अभिनंदनाचा ठराव आणलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

माझ्यापूर्वीच्या अनेक वक्त्यांनी श्रीमती प्रतिभा पाटील यांच्या बद्दलची माहिती दिलेली आहे. श्रीमती प्रतिभाताई पाटील ह्या अतिशय शांत, सुशील. त्यानी या राज्यामध्ये विविध पदांवर कार्यरत राहून राज्यातील तळागाळातील लोकांची सेवा केलेली आहे. त्या आमदार, राज्यमंत्री, मंत्री, खासदार होत्या. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या त्या अध्यक्ष होत्या. विरोधी पक्षनेता म्हणूनही त्यांनी प्रभावीपणे काम केलेले आहे. राजस्थानच्या राज्यपाल म्हणूनही त्या कार्यरत होत्या. अशी अनेक पदे भूषवित असताना त्यांनी तळागाळातील जनतेची अविरतपणे सेवा केली आहे. त्यांची राष्ट्रपती पदी निवड झाल्याने म.फुले, सावित्रीबाई फुले,छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आज गौरव झालेला आहे. महिलांचा ख-या अर्थाने सन्मान झालेला आहे. जेव्हा श्रीमती प्रतिभाताई पाटील यांची राष्ट्रपती पदासाठी उमेदवारी जाहीर झाली त्यावेळी त्यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले. त्यांच्या उमेदवारीबद्दल अनेक वादविवाद झाले. परंतु देशाच्या नेत्या आदरणीय सोनिया गांधी या श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या मागे ठामपणे उभा राहिल्या. तसेच आदरणीय श्री. शरद पवार हे देखील त्यांच्या पाठिमागे समर्थपणे ऊभे राहिले. श्रीमती प्रतिभा पाटील यांच्यावर झालेल्या आरोपांचे श्री. शरद पवार यांनी खंडण केले. तसेच आदरणीय श्री. बाळासाहेब ठाकरे हे देखील महाराष्ट्राच्या या सुकन्येच्या पाठिमागे ठामपणे उभे राहिले. त्यामुळे श्रीमती प्रतिभाताई पाटील या राष्ट्रपती पदावर भरघोस मताधिक्याने विराजमान झाल्या. त्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करते. श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी ज्याप्रमाणे या राष्ट्राची, जनतेची, तळागाळातील लोकांची सेवा केली त्याप्रमाणे संपूर्ण देशाच्या विकासाचे आणि देशातील दलित, आदिवासी, महिला यांच्या उन्नतीचे कार्य त्यांच्या हातून घडो आणि त्यामध्ये त्यांना यश लाभो अशा मी त्यांना शुभेच्छा देते. सदनाचे नेते आणि उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या ठरावाला मी समर्थन देते आणि माझे भाषण संपविते.

---

...2..

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज लोकमान्य टिळक यांची जयंती आहे. आज आपण विधानपरिषदेचा 70वा वर्धापनदिन सोहळा साजरा केला आणि अशा या दिवशी महाराष्ट्राच्या विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये महाराष्ट्राची एक महिला राष्ट्रपती पदी विराजमान झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव करीत आहोत. या सभागृहाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या अभिनंदनाच्या ठरवाला मी समर्थन देते.

सभापती महोदय, आज आपण एका संक्रमण काळातून जात आहोत. एका बाजूला स्त्रियांच्या नावावांचा उदो उदो करणे, त्यांचा प्रतिकात्मक नावापुरता वापर करणे अशी प्रवृत्ती दिसत आहे तर दुसरीकडे जगात 189 देशा पैकी 10 देशामध्ये महिला राष्ट्राध्यक्ष किंवा पंतप्रधान नाही, ही वस्तुस्थिती आहे...(अडथळा) .. सभापती महोदय, श्रीमती प्रतिभाताई पाटील ह्या उच्च विद्याविभूषित आहेत. त्यांनी अनेक पदावर काम केलेले आहे. मी त्यांना शुभेच्छा देते. ह्या शुभेच्छा त्यांना देत असताना मी सांगू इच्छिते की, हिन्दुस्थानामध्ये लहान मुलींची संख्या कमी झाल्याचे आपण पहातोय. संपूर्ण जगाच्या विकासाबद्दल जेव्हा चर्चा होते त्यावेळी मिसिंग गर्ल्स कंट्री, अदृश्य होणा-या मुलींचा देश असा हिन्दुस्थान संबंधीचा संदेश आंतरराष्ट्रीय पातळीवर जात आहे.

....नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे......

राष्ट्रपती ही जी व्यक्ती असते, किंवा हे जे पद आहे, ते एका राज्याच्याही वरचे आणि संपूर्ण देशाचे प्रतिनिधीत्व करणारे पद आहे आणि म्हणूनच सन्माननीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना मराठी आणि महिला म्हणून समर्थन देत असतांना खूप मोठया ऐतिहासिक स्वरुपाच्या वादंगाला आम्हालाही तोंड द्यावे लागलेले आहे आणि त्याच्यामध्ये भूमिकेच्या संदर्भामध्ये परत परत वेगवेगळया प्रकाराने उत्तर देत असतांना सुध्दा एका ऐतिहासिक क्षणी मराठी माणसाने एकजूट दाखवून एका व्यक्तीच्या पाठीमागे शिवसेना उभी राहिली पक्षातीत भूमिका घेत असतांना सन्माननीय शिवसेना प्रमुखांचे आभार माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्र्यांनी मानले तसेच, स्वत:श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी देखील त्यांचे आभार मानले आणि आम्ही जी मदत केली ती कर्तव्यभावनेतून केली होती, परंतु त्याची दखल घेण्याइतकी एक सन्मानाची भूमिका आपण सर्व बाकीच्या पक्षांनी घेतली त्याच्याबद्दलही मी त्यांचेही आभार मानते. सन्माननीय प्रतिभाताई पाटील या ज्या महाराष्ट्राच्या तसेच भारताची सुकन्या जशा आहेत, त्याचप्रमाणे संपूर्ण पूढच्या काळामध्ये शिक्षणामधील गळती, आरोग्याचे आणि कुपोषणाचे प्रश्न याच्यामधून त्यांना स्वत:चे कार्य आणि कर्तव्य सिध्द करावे लागणार आहे. मी येथे एवढेच म्हणेन की, या सदनामध्ये अभिनंदन करीत असतांना सन 1975 साली "स्टेटस ऑफ वूमन कमिटी"चा रिपोर्ट जो तयार करण्यामध्ये स्वत: माननीय प्रतिभाताई पाटील यांचा सहभाग होता. पैशाचा प्रश्न, हिंसा, चारित्र्यहनन या तीन गोष्टींमुळे राजकारणात स्त्रियांचे खच्चीकरण केले जाते. केवळ त्या महिला आहेत, म्हणून त्यांच्या कौतुकाचा प्रश्न नाही परंतु महिला असून डावलले गेले नाही हा त्यातल्या त्यात मोठी गोष्ट आहे. महाराष्ट्राच्या ज्या प्रबोधनाच्या परंपरा आहेत, त्या परंपरेमध्ये प्रबोधनकार ठाकरे यांनी कायम वेगवेगळया प्रकारांनी प्रबोधन केलेले आहे. मग तो बालविवाहाच्या प्रश्न असो, सतीचा प्रश्न असो आणि हुंडाबंदीचा प्रश्न असो यासंदर्भामध्ये प्रागतिक भूमिका घेतलेली आहे. प्रबोधनकारांची हिंदुत्वाची भूमिका शिवसेनेची आहे म्हणून हिंदुत्व आणि मराठी एकमेकांच्या विरोधात नसून भारत ही थोर अशा सांस्कृतिक मुल्यांच्या पंरपरा पुढे नेण्याचे आणि महाराष्ट्राचे नाव पुढे नेण्याचे काम प्रतिभाताई पाटील करतील अशाप्रकारची अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपविते.

------

CC - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, महामहीम प्रतिभाताई पाटील या सर्वोच्च पदावरती राष्ट्रपती म्हणून निवडून आलेल्या आहेत, त्यांच्या अभिनंदनाचा ठराव आदरणीय श्री.आर.आर.पाटील यांनी सभागृहाच्या समोर मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. या सभागृहाला कदाचित ही बाब माहिती नसेल की, सन 1973 पासून 1987 पर्यंत श्रीमती अहिल्याताई रांगणेकर यांच्या नेतृत्वाखाली मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षामध्ये काम करणारी मी 1987 ला महामहीम प्रतिभाताई पाटील यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये कॉँग्रेसमध्ये मला घेतले आणि तेथूनच माझा राजकीय कारकीर्दीचा कॉँग्रेस पक्षामधील प्रवास सुरु झाला. आदरणीय श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या पाठिंब्यामुळे देखील मी येथपर्यंत पोहोचले याची सुरुवात माननीय श्री.प्रतिभाताई पाटील यांच्यामुळे झ ाालेली आहे. ज्या दिवशी त्यांचे नाव राष्ट्रपती पदासाठी फायनल झाले त्या दिवशी मला इतक्या उच्चकोटीचा आनंद झाला की, तो मला या ठिकाणी व्यक्त करता येणार नाही. माननीय प्रतिभाताई पाटील यांच्या राष्ट्रपतीपदी झालेल्या निवडीबाबत काही बाबी मला या ठिकाणी सांगाव्याशा वाटतात त्या अशा की, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्वप्न इतके सुंदर असेल हे मला वाटले नव्हते. माननीय प्रतिभाताई पाटील हे खरच फक्त क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्वप्न नसून, महात्मा फुले,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,शाहू महाराजांचे देखील स्वप्न होते. या देशाला घडविण्यामध्ये अर्धा वाटा महिलांचा आहे, आणि त्यांना राजकीय अशा प्रकारची शक्ती देऊन निर्णय प्रक्रियेमध्ये आणून तसेच, सत्तेमध्येही आणून या बांधणीमध्ये त्यांना विश्वासाने खुर्चीवर बसविणे, हे जे स्वप्न यांनी पाहिले होते ते "याची देहि याची डोळा" साकार होतांना मी पाहिले आणि हे सुंदर स्वप्न मला पाहावयाला मिळाल्याबद्दलचा आनंद मी या सभागृहामध्ये व्यक्त करीत आहे. माननीय प्रतिभाताई पाटील या संपूर्ण देशाच्या महिलांचे स्वप्न झालेले आहे. सक्षमीकरणाच्या चळवळीला निश्चितच एक आशावादी स्वरुप आलेले आहे. आपण ज्या अनेक क्रांतिकारी योजना महिलांसाठी राबविल्या त्याच्यामध्ये फार पुढचे पाऊल ज्या देशात स्टेटस ऑफ वूमेन कमिटीच्या रिपोर्ट ची तयारी करण्यासाठी राज्यसभेला आणि लोकसभेला 1975 -1976 पर्यंत वाट पाहावी लागली त्या देशामध्ये एक भगिनी राष्ट्रपती आजझालेली आहे, यापेक्षा सुंदर स्वप्न कोणतेही असणार नाही म्हणून मी त्या सावित्रीला क्रांतिकारी अभिवादन करते आणि माझे दोन शब्द संपविते.

------- यानंतर श्री.कानडे......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, महामहिम राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचा अभिनंदनाचा ठराव उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेब यांनी ठेला आहे त्याबद्दल त्यांना मी धन्यवाद देतो. प्रतिभाताई पाटील या समाजकल्याण मंत्री होत्या. 1972 चा तो काळ होता. झोपडपट्टीमध्ये काम करणारा मी माणूस आहे. त्या काळात जांबुवंतराव धोटे यांनी नागपूर बंदचे आवाहन केले होते. मी माझ्या कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ घेऊन प्रतिभाताई पाटील यांच्याकडे गेलो आणि त्यांना म्हणालो, ताई नागपूर शहरामध्ये झोपडपट्टीमध्ये आपण जवळजवळ 1 लाख ब्रेड वाटतो आहोत. पण आपण झोपडपट्टीतील लोकांना देतो त्यामुळे यांचा एक मेळावा घ्यावा. त्यांनी ताबडतोब त्यावेळचे मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना सांगितले मेळाव्याचे आयोजन करा. 1 ते 6 वर्षांची बालके आणि त्यांना घेऊन त्यांचे आई-वडिल येतील त्यामुळे हा मेळावा 1 ते 2 लाखाचा होईल. 2-3 लाखाचा मेळावा झाला. स्त्री समाजाची संस्कृती,राष्ट्राची प्रतिष्ठा आणि घराण्याची इभ्रत समजली जाते. स्त्रीच्या पदराला डाग लागला तर तो समाज दूषित होऊन जातो. घराणे दूषित होऊन जाते. परंतु प्रतिभाताई पाटील म्हणजे शालिनतेचा शालू,कष्टाचा देव्हारा आणि पावित्र्याची गंगा होय. डोक्यावरचा पदर खाली पडता कामा नये आणि पडला तरी खांद्यावर सांभाळला गेला पाहिजे. खांद्यावरचा पदर खाली ढळला तर अब्रू चव्हाटयावर येते असे साहित्यिक लोक म्हणतात. ताईचा पदर कधी खाली ढळला नाही. मी झ ाोपडपट्टीमध्ये काम करीत असताना ताई माझ्या घरी आल्या. झोपडपट्टीमध्ये आल्यावर त्यांनी मला काम दिले. एका भ्रष्ट अधिकाऱ्याने मोठया ठेकेदाराकडून 5-6 लाखाचे घर घेतले होते. मी तक्रार केली. त्यांनी माझे छोटेसे काम बंद करुन टाकले. मी ताईंकडे आलो त्यांना विनंती केली आणि निवेदन दिले त्यावर त्यांनी लिहिले. नस्ती तात्काळ सादर करा. श्री. सिद्दीकी हे त्या खात्याचे उप सचिव होते. मी वर्षभर चकरा मारीत होतो आणि ताई त्यावर लिहित होत्या नस्ती तात्काळ सादर करा. एका दिवशी माझा संयम सुटला. त्यानंतर तो उप सचिव नमाज पढत होता. नमाज झाल्यावर मी त्यांना म्हणालो, सर ताईंनी अर्जावर तात्काळ सादर करा असे म्हटले आहे. ताई आलेल्या आहेत आता फाईल सादर करा. फाईल घेऊन चला. तो उप सचिव म्हणाला मी आता जेवतो. त्यानंतर त्यांना पुन्हा सांगितले. आता माझ्याजवळ जाण्यासाठी पैसे नाहीत. फाईल घेऊन ताईंकडे चला. त्यावर तो उप सचिव म्हणाला मंत्रीमहोदयांनी सांगितले म्हणून मी फाईल सादर करीत नाही. माझ्या पध्दतीने फाईल सादर करीन. या उत्तराने मी माझ्या पायातील

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 15:25

श्री. रमेश निकोसे...

जोडा काढला आणि त्याच्या केबिनवर 10 जोडे मारले. समाजकल्याण मंत्रालयाचा परिसर घाबरुन गेला. त्या उपसचिवाला कॉलर धरुन मी बाहेर काढले. मंत्रीमहोदयांकडे लोक धावत गेले. प्रतिभाताई पाटील धावत आल्या आणि मला म्हणाल्या निकोसे तुम्ही हे काय करीत आहात ? मी म्हटले आपण 10 वेळेला फाईल पुटअप करा असे सांगितले. परंतु उप सचिव फाईल पुटअप् करीत नाहीत. त्यांनी त्यांच्या पाटील नांवाच्या पी.ए. सांगून मला तिकीट काढून दिले आणि मी त्या उपसचिवाला सोडून दिले. माझ्या घरी टेलिग्राम पडला होता. ताबडतोब विभागीय समाजकल्याण अधिकाऱ्यांना भेटा ऑर्डर इश्यू झाल्या आहेत. डायरेक्टरची ऑर्डर आली. विभागीय समाजकल्याण अधिकारी माझ्या घरी आला होता. ताईंची ही कर्तबगारी होती. अशा त-हेने ताई शालीनतेचा या शालू. कष्टाचा देव्हारा आणि पावित्र्याची गंगा आहे. स्त्री ही राष्ट्राची प्रतिष्ठा आणि घराण्याची इभ्रत आहे. देशाच्या सर्वोच्च त्या गेल्या आहेत मी त्यांना मानाचा मुजरा करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

धन्यवाद.

-------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय नेते श्री.आर.आर.पाटील यांनी महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या अभिनंदनाचा जो ठराव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी आणि ठरावाचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, अनेक बाबींचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात केलेला आहेच. श्रीमती प्रतिभाताई पाटील या प्रतिभावंत आहेत आणि त्यांनी केलेल्या कार्याचा अनेकांनी गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. मी ज्या विदर्भ भागातून येतो त्या विदर्भामध्ये जेव्हा मी सार्वजनिक कार्यात उडी घेतली तेव्हापासून मी श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे कार्य पाहतो आहे. त्यांचे कार्य निश्चितच अजोड आहे. विदर्भाला प्रतिनिधीत्व देण्याचे काम त्यांनी केले. आज देशाच्या सर्वोच्च पदावर त्या विराजमान झाल्या आहेत. युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनीया गांधी या स्वत: महिला असून त्यांनी दुसऱ्या एका महिलेला ही संधी देण्याचे काम केले, हे खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. त्याबद्दल खास करुन विदर्भाचा प्रतिनिधी म्हणून मी श्रीमती सोनीया गांधी यांना धन्यवाद देतो. त्याचबरोबर महाराष्ट्राचे नेते श्री.शरद पवार व शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनाही खास करुन विदर्भाचा प्रतिनिधी म्हणून त्यांना धन्यवाद देतो. आरपीआयचे सर्व सहकारी आणि देशाच्या पातळीवर युपीएच्या सहकारी पक्षांनी आम्हाला सहकार्य केले त्यांनाही विदर्भाचा प्रतिनिधी म्हणून धन्यवाद देतो. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शाहू महाराज यांच्या विचारांना खऱ्या अर्थाने उजाळा देण्याचे काम आमच्या नेत्यांनी केले. आज ज्या प्रवर्गातून आमचे प्रतिनिधी येतात त्या ओबीसी प्रवर्गामध्ये खास आनंद दिसून येतो. मी ज्या ज्या ठिकाणी जातो त्याठिकाणच्या आमच्या ओबीसी प्रवर्गाच्या सहकाऱ्यांमध्ये आनंदाची लाट आल्याचे दिसून येते. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या पातळीवर ही आनंदाची लाट पसरली आहे. श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना जो सन्मान प्राप्त झाला आहे तो निश्चितच देशाचा लौकिक वाढविण्यासाठी, या देशाची प्रतिमा वाढविण्यासाठी कामी येईल. त्यांची कारकीर्द आणखी उजळून निघेल अशी शुभेच्छा व्यक्त करुन पुन्हा एकदा या प्रस्तावाला समर्थन देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय नेते व उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला आहे त्या ठरावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ज्या दिवशी निवडणुकीचा निकाल लागला त्याच दिवशी माझ्यासारख्या अमरावतीच्या एका कार्यकर्त्याला नव्हे तर अमरावतीतील तमाम जनतेला निश्चितपणे आनंद झाला. इतकेच नव्हे तर अभिमानही वाटला. आज अमरावतीची सून या देशाच्या सर्वोच्च पदी विराजमान झाली आहे याचा अभिमान अमरावतीच्या प्रत्येक कार्यकर्त्याला, प्रत्येक जनसामान्य माणसाला आहे. माणूस हा थोडा संकुचित विचार प्रवृत्तीचा असतो. श्रीमती प्रतिभाताई पाटील या महाराष्ट्राची व जळगावची सुकन्या आणि अमरावतीची सून असल्या तरी त्यातल्या त्यात ज्या परिवाराशी लहानपणापासून माझा संबंध आहे, त्या परिवारातील एक महिला, ज्यांना आम्ही काकू म्हणतो, त्या राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यानंतर मला निश्चितपणे वैयक्तिक आनंद झाला आहे. ज्यावेळी माझा राजकारणाशी काही संबंध नव्हता, त्यावेळी या मुंबईचे राजकीय वैभव पाहण्याची संधी मला त्यांच्या माध्यमातून मिळाली होती. त्यांचा पुतण्या आणि मी एकाच कॉलेजमध्ये शिकत होतो. त्याच्यासोबत मुंबईला आल्यानंतर हे वैभव पाहण्याची मला संधी मिळाली. त्या परिवाराशी माझा अतिशय जवळचा संबंध आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता...

सभापती महोदय, राजकारणामध्ये मोठे मन असल्याशिवाय राजकारणी माणूस कधीही मोठा होऊ शकत नाही. माननीय प्रतिभाताई पाटील यांच्या परिवारामध्ये मी लहानचा मोठा झालेला एक कार्यकर्ता आहे. मी वेगळया पक्षात असून सुध्दा त्यांनी माझ्यावर कधीही व्यक्तिगत राग ठेवला नाही. त्यांच्या परिवाराने मला नेहमी मार्गदर्शन करण्याचेच काम केलेले आहे. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत माननीय प्रतिभाताई यांच्या विरुध्द माननीय शेखावत साहेब उभे होते त्यावेळीही त्यांची आणि माझी भेट व्हावयाची तेव्हा सुध्दा त्यांनी माझ्यावर मुलासारखेच प्रेम केलेले आहे. सभापती महोदय, सामाजिक कामामध्ये मला जेव्हा जेव्हा आवश्यकता पडली तेव्हा तेव्हा मला माननीय प्रतिभाताईच्या परिवाराने मार्गदर्शन केलेले आहे आणि भविष्यातही अशाच प्रकारचे मार्गदर्शन मला मिळत राहीन यात शंकाच नाही. सभापती महोदय, राष्ट्रपती पदाची शपथ घेण्याच्या सोहळयाच्या कार्यक्रमाला अधिवेशन सुरु असल्यामुळे मला जाता येणार नाही याची मला खंत वाटत आहे. सभापती महोदय, मी जेव्हा कॉलेजमध्ये शिकत होतो तेव्हा मला राजकारणाचे काहीच माहिती नव्हते. मी राजकारणात त्यावेळेस नवखाच होतो. त्यावेळी माननीय अंतुले साहेबांचे मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर ते मुख्यमंत्रीपद माननीय प्रतिभाताई यांना मिळणार होते व त्या कार्यक्रमासाठी माझा मित्र जो माननीय प्रतिभाताई यांचा पुतण्या आहे त्याच्या बरोबर आम्ही अमरावतीवरुन निघालो होतो परंतु वाटेत बातमी मिळाली की, हा कार्यक्रम रद्द झाला असून वेगळया व्यक्तीची मुख्यमंत्रीपदी निवड झालेली आहे अशी खेदजनक बातमी आम्हाला मिळाली. त्यावेळेस त्यांना महिला म्हणून मुख्यमंत्री होण्यांची संधी मिळणार होती परंतु ती संधी काँग्रेस पक्षाने त्यांना राष्ट्रपती म्हणून त्यांना दिलेली आहे. काँग्रेस पक्षाच्या हातून त्यावेळेस जी चूक झाली होती ती चूक काँग्रेस पक्षाने दुरुस्त केलेली आहे. राष्ट्रपतीपदावर अमरावतीची स्नुषा विराजमान झालेली असल्यामुळे आम्हा अमरावतीकरांना त्याचा विशेष आनंद आहे. मी अमरावतीचा कार्यकर्ता म्हणून, लोकप्रतिनिधी म्हणून एक खंत व्यक्त करतो ती म्हणजे, ज्यावेळेस राष्ट्रपतीपदाची निवडणूक जाहीर झाली तेव्हा पासून महाराष्ट्रातील जळगाव जिल्हयाचा आणि राजस्थानचाच उल्लेख प्रिंट मिडीया आणि इलेक्ट्रॉनिक मिडीयाने केलेला आहे. परंतु अमरावतीचा कोणीही उल्लेख केलेला नाही याचा मला खेद वाटतो. सभागृहाच्या माध्यमातून प्रिंट मिडीया आणि इलेक्ट्रॉनिक मिडीयाने जर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता....

अमरावतीचाही उल्लेख केला तर आमच्या अमरावती जिल्हयातील जनतेला त्याचा विशेष आनंद होईल. अमरावतीचेही नाव संपूर्ण हिंदुस्थानात गेले तर त्याचा आम्हाला विशेष आनंद होईल. माननीय प्रतिभाताई पाटील यांची राष्ट्रपतीपदावर निवड झाल्याबद्दल माननीय उपमुख्यमंत्री यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला त्यावर मला बोलण्याची आपण संधी दिल्यामुळे मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद

------------------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी राष्ट्रपती पदावर निवड झालेल्या सौ.प्रतिभाताई पाटील यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे त्या प्रस्तावास आर.पी.आय.च्या वतीने पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आरपीआयचे अध्यक्ष श्री.रामदास आठवले यांनी सौ.प्रतिभाताई पाटील यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता. शिवसेना प्रमुख माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी सौ.प्रतिभाताई पाटील यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर या देशाचे कायदेमंत्री असताना त्यांनी महिलांना समान संधी मिळावी म्हणून "हिंदू कोड" बिल सादर केले होते. या बिलामुळे महिलांना समान संधी मिळाली असती, परंतु गेल्या 60 वर्षामध्ये महिलांना उच्च पदावर जाण्याची संधी मिळालेली नाही. आज सौ.प्रतिभाताई पाटील यांची भारताच्या सर्वोच्च पदी निवड झालेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न आज पूर्ण झाले असे मला वाटते. त्याचप्रमाणे महात्मा जोतिबा फुले यांचे देखील स्वप्न पूर्ण झाले असेल असे मला वाटते. राष्ट्रपती पदी ताईंची निवड झ ााल्याबद्दल संपूर्ण महिलांन निश्चितपणे आनंद झाला असेल. मी देखील आरपीआयच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो आणि या प्रस्तावाला पाठिंबा देतो. पंतप्रधानपदी देखील महाराष्ट्रातील व्यक्ती असावी अशी शुभेच्छा व्यक्त करतो आणि सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी मांडलेल्या ठरावाला पाठिंबा देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

जय भीम ! जय महाराष्ट्र !

------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी महामहिम राष्ट्रपती सौ.प्रतिभा पाटील यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावाला माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी पाठिंबा दिलेला आहे. तसेच सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनीसुध्दा या प्रस्तावाला उत्स्फूतपणे पाठिंबा दिलेला आहे.

महाराष्ट्राची कन्या आणि तुम्हा आम्हा सर्वांची भगिनी सौ.प्रतिभा पाटील यांचे कार्य जवळपास 40 वर्षे अनेक कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी जवळून पाहिलेले आहे. काही कार्यकर्त्यांनी त्यांच्यासोबत काम देखील केलेले आहे. मी स्वत: गेली 30 वर्षे त्यांना जवळून पाहिलेले आहे. मी 1975 मध्ये विधानसभेवर निवडून आल्यानंतर ताईंचा आणि माझा सातत्याने संबंध येत गेला. अनेक पध्दतीची कुशलता, अत्यंत उत्कृष्ट पध्दतीचे संघटन कौशल्य त्याचबरोबर कुशाग्रबुध्दीमत्ता अशा विविध पैलूंमुळे ताई महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये सतत लोकप्रिय राहिल्या. राज्यमंत्री पदापासून मंत्रिपदापर्यंत काम करीत असताना त्यांनी विविध खात्यांची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळलेला आहे. ही जबाबदारी सांभाळत असताना त्यांनी मंत्रालयलामध्ये तसेच समाजामध्ये आपल्या कामाचा उत्कृष्ट ठसा उमटविला. प्रशासकीय अधिकाऱ्यांवर वचक असावा यादृष्टीने परिपूर्ण अभ्यास करणे, एखाद्या कठीण विषयाचा पाठपुरावा करणे आणि दुर्दम्य इच्छा शक्तीच्या जोरावर प्रयत्नाची पराकाष्टा करुन यश मिळविणे असा ताईंकडे अलौकिक गुण होता. मी ताईंना महाराष्ट्राच्या विरोधी पक्ष नेते पदी सुध्दा पाहिलेले आहे.

यानंतर श्री.पुरी............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

तो 1978-79 चा काळ होता. महाराष्ट्राच्या दृष्टीने तो अत्यंत कठीण काळ होता. त्या काळामध्ये सौ.ताईसाहेब, विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्या म्हणून अत्यंत परखडपणे व अत्यंत जिद्दीने अनेक धोरणांच्या अनुषंगाने त्यावेळच्या सरकारवर अनेक पध्दतीने वैचारिक हल्ले करण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्नशील होत्या. राज्याच्या अनुषंगाने जनसामान्यांचे अनेक अनिर्णित प्रश्न आहेत, जो समाज प्रत्यक्षात सौ.ताईसाहेबांचा केंद्रबिंदू आहे, मग तो असंघटीत समाज असेल, पददलित समाज असेल, सर्वसामान्य समाज असेल, स्त्रिया किंवा लहान मुले असतील त्यांच्या विकासाच्या दृष्टीने त्यांचे सातत्याने प्रयत्न होते. सौ.ताईसाहेबांचे मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांवर अत्यंत चांगले प्रभूत्व आहे. या अनुषंगाने त्यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जे काम केले, त्या कामामध्ये त्यांच्या चांगल्या कामाचा ठसा निश्चितपणे सातत्याने समाज जीवनात उमटलेला आहे. स्व.इंदिराजी, स्व.राजीवजी आणि आजच्या आपल्या नेत्या श्रीमती सोनियाजी या राष्ट्रीय नेत्यांच्यासमोर सौ.ताईसाहेबांचे आत्तापर्यंतचे झालेले काम आदर्शवतच आहे. नंतरच्या काळात त्या राज्यसभेवर निवडून आल्या, त्यानंतर त्या राज्यसभेच्या उपसभापती झाल्या, नंतरच्या काळात त्या अमरावती लोकसभा मतदारसंघातून निवडून आल्या, नंतरच्या काळात त्या सन 2004 मध्ये राजस्थान राज्याच्या राज्यपाल झाल्या आणि आता सुदैवाने महाराष्ट्राच्या एका ऐतिहासिक क्षणाचा विचार केला तर आमच्या घरच्या, आमच्या भगिनी, महाराष्ट्राच्या कन्या या देशाच्या राष्ट्रपती म्हणून देशातील अत्युच्च पदावर निवडून आलेल्या आहेत. आणि खऱ्याअर्थाने महाराष्ट्राच्या राजकीय जीवनामध्ये हा एक फार मोठा ऐतिहासिक क्षण आहे, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. या सदनाच्या माध्यमातून आपण सर्वांनी सौ.ताईसाहेबांचे अभिष्टचिंतन करीत असताना, त्यांचे अभिनंदन करीत असताना राष्ट्रपती म्हणून त्यांच्याकडून काही कामांची अपेक्षा केली तर मला खात्री आहे की, विशेषत: स्त्रियांचा उत्कर्ष, पददलितांस व सर्वसामान्यांस खऱ्याअर्थाने ताकद उपलब्ध होईल. या देशाच्या कानाकोपऱ्यात जो असंघटीत, सर्वसामान्य, कष्टकरी आणि शेतकरी वर्ग आहे, त्यांना त्यांच्या राष्ट्रपतींच्या कालखंडामध्ये केंद्र सरकारच्या माध्यमातून जास्तीत जास्त शक्ती मिळाली पाहिजे व खऱ्याअर्थाने त्यांची आर्थिक सुदृढता झाली पाहिजे, व ती त्यापध्दतीने त्यांच्या काळात होईल अशी मला स्वत:ला खात्री आहे.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

यापेक्षा याठिकाणी आणखी काही न बोलता, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी व विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आहे व त्यास दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिलेला आहे, ही निश्चितच महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवाची बाब आहे.

प्रस्ताव सर्वानुमते एकमताने संमत झाला.

---------

नंतर श्री.रोझेकर....

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी**.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राचे गृहनिर्माण धोरण सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : महाराष्ट्राचे गृहनिर्माण धोरण सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

---------------

**सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.20 वाजता पुन: भरेल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, 4.20 हा आकडा बरोबर नाही. त्यामुळे 4.25 वाजता सभागृह पुन्हा सुरु करावे.

**ाभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक दुपारी 4.21 वाजता पुन: भरेल.

(3.50 ते 4.21 मध्यंतर)

---------------

**यानंतर श्री.बोरले**...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**रायगड जिल्हयातील सेझसंदर्भात शेतक-यांनी सुरु केलेल्या आंदोलनाबाबत.**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. रायगड जिल्हयातील सेझबाबत मी विधानपरिषद नियम 289 अन्वये नोटीस दिली होती. त्यावेळी मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित होते. राज्याचे प्रमुख म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे आश्वासन दिले होते की, नियम 6(1) ची नोटीस लॅप्स कशी होईल, हे आम्ही बघू. मी विधानपरिषद नियम 289 अन्वये नोटीस देऊन प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची मागणी केली होती. त्यावेळी पेण तालुक्यातील जवळजवळ 16 शेतकरी पेण तहसील कार्यालयाजवळ आमरण उपोषणाला बसलेले हाते. काल दिनांक 18 जुलै, 2007 रोजी रायगडच्या जिल्हाधिकारी उपोषणकर्त्यांना भेटण्यासाठी गेल्या होत्या. उपोषणकर्त्या शेतक-यांना आणि जिल्हाधिका-यांना मी सभागृहातील अधिकृत प्रोसिडींग दाखविले. शासनाने कोणतेही आदेश दिलेले नसल्यामुळे माझे प्रयत्न सुरुच राहतील, असे मी जिल्हाधिका-यांना आणि उपोषणकर्त्यां शेतक-यांना सांगितले. गंभीर बाब अशी आहे की, त्यातील तीन उपोषणकर्ते प्रकृती अस्वास्थ्यामुळे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहेत. तसेच, इतर उपोषणकर्त्यांची प्रकृती देखील चिंताजनक आहे. सभापती महोदय, आपण या सभागृहाच्या उच्च पदावर विराजमान आहात. उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेण्याच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या विषयासंबंधी सभागृहामध्ये निवेदन करावे व तसे आपण शासनाला निर्देश द्यावेत, अशी मी आपल्याला विनंती करतो.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी पॉईंट ऑफ इन्फॉरमेशन मांडला आहे. त्यांनी पहिल्या दिवशीच नियम 289 प्रमाणे सूचना दिलेली होती. त्यावेळी झालेल्या चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते. त्यावेळी प्रतिप्रश्न विचारला होता की, मंत्री सांगतात की आम्ही एक कार्यक्रम राबविणार आणि मुख्यमंत्री सांगतात की आम्ही हा कार्यक्रम राबविणार नाही. त्यावेळी या प्रश्नावर चर्चा झाली असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, "मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आहे, मी सांगतो त्याच्यावर विश्वास ठेवता की, जिल्हयाचा कलेक्टर काय सांगतो त्याच्यावर विश्वास ठेवाता". यासंबंधी शासनाने त्वरीत निर्णय घेऊन सूचना जिल्हाधिकारी व उपोषणकर्त्यांपर्यत पोहचण्याची आवश्यकता आहे. म्हणजे तेथील लोकांचे प्राण वाचविणे तितकेच महत्वाचे आहे. याकरिता संबंधित मंत्री महोदयांना कलेक्टरकडे प्रोसिंडींग व योग्य ते आदेश पोहचविण्यास सांगावे म्हणजे हा प्रश्न मार्गी लागेल, हा माझा पॉईंट ऑफ इन्फॉरमेशन आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी फक्त 1-2 प्रश्न विचारावेत. निवेदनावर जास्त प्रश्न विचारले गेले तर निवेदने पूर्ण होणार नाहीत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात आश्वासन देऊन देखील व शासनाने सांगून देखील जमिनी संपादन केल्या जात आहेत. पेण येथे काही लोक उपोषणाला बसले असून तेथे अशांतता निर्माण झालेली आहे. नापिकी असलेली जमीन घेणार असे सांगून ठिकठिकाणी सुपीक जमीन ताब्यात घेण्याचे काम अनौपचारिकरित्या सुरु आहे. माझी सभापती महोदयांना विनंती आहे की, आपण सभापती पदावरुन ऐतिहासिक स्वरुपाचे निर्णय देत असता. एस.ई.झेड.च्या बाबतीत तसाच ऐतिहासिक निर्णय आपण द्यावा ही अपेक्षा आहे. उपोषणकर्त्यांच्या नेत्या व कार्यकर्त्या उल्का महाजन, सुरेखा दळवी, 24 गावाचे लोक व लोकप्रतिनिधी उपोषणासाठी बसले आहेत. वातावरण दिवसेंदिवस तापत आहे, माझा प्रश्न असा आहे की, आपल्याला येथे नंदीग्रामसारखा प्रकार करावयाचा आहे का ? सभापती महोदय, कदाचित या प्रश्नावरील चर्चेला तुम्ही कंटाळला असाल परंतु हा प्रश्न लोकांच्या जीवन मरणाचा आहे. या प्रश्नाबाबत शासनाने कोणती पावले उचचली आहेत ? हे अग्रक्रमाने पहावे. संबंधितांना निर्देश जारी करण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करावे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

**उपसभापती** : एस.ई.झेड च्या प्रश्नाबाबत उद्या सभागृहात निवेदन करावे, असे मी शासनाला निदेश देतो.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत मुख्यमंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिलेले आहे. अधिकाऱ्यांनी त्याची केवळ अंमलबजावणी करावयाची आहे. याबाबत त्वरीत अंमलबजावणी करावी, ही आमची मागणी आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, उपोषणकर्त्यांनी लवकर उपोषण सोडावे ही भावना आहे. त्यादृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केलेल्या निवेदनाला अधिक महत्व आहे. असे असूनही जिल्हाधिकारी सांगत आहेत की, त्यांना कोणतेही आदेश नाहीत व ते जमीन संपादन करण्याचे काम थांबविणार नाहीत. असे होत असेल तर तो या सभागृहाचा व माननीय मुख्यमंत्र्यांचा अपमान आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे वर्तन कायद्याच्या विरोधात आहे. या सभागृहात झालेल्या निर्णयाची जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ अंमलबजावणी केली पाहिजे. जिल्हाधिकारी विरोधात बोलत आहेत, त्यामुळे तेथील परिस्थिती चिघळत आहे. उपोषणकर्त्यांची परिस्थिती अतिशय नाजूक असून तेथील वातावरण बिघडलेले आहे. रायगड जिल्हयातील मंडळींनी वारंवार फक्त शासनाविरुध्द संघर्ष करत रहायचे का ? माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जमीन संपादनाचे काम तात्काळ थांबविले पाहिजे. शेतकऱ्यांना दिलेल्या नोटीसा मागे घेतल्या पाहिजेत. उपोषण सोडण्यासाठी आजच्या आज हालचाल केली पाहिजे. या प्रश्ना सभागृहातील दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या भावना लक्षात घ्याव्यात, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी पॉईंट ऑफ प्रोसिजर काढला आहे तो बरोबर आहे. या ठिकाणी मंत्र्यांनी उत्तर देत असताना निश्चित स्वरूपात त्या प्रश्नाबाबत काही आश्वासन दिलेले असते, काही शब्द दिलेला असतो की, 'आम्ही हे करू'. सभापती महोदय, या सदनामध्ये जेव्हा मंत्री उत्तरे देत असतात त्यावेळेस त्यांचे सचिव, त्यांचा पूर्ण स्टाफ, त्यांच्या खात्यातील अनेक अधिकारी व स्टाफ आजूबाजूला बसलेले असतात. ते याची नोंद घेतात की नाही? आणि घेत असतील तर मंत्र्यांनी या ठिकाणी जे काही निश्चित स्वरूपाचे आश्वासन दिलेले असेल वा शब्द दिलेला असेल तर त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने काही कारवाई करतात की नाही ? याबाबत नेमकी प्रोसिजर काय आहे ते आम्हाला समजले पाहिजे. सभापती महोदय, परवाच्याच दिवशी आपण या सभागृहामध्ये सभापतींच्या सर्वोच्च आसनावरून निर्णय दिला की, 48 तासामध्ये अहवाल सादर करा. परंतु त्या 48 तासांमध्ये त्या झुणका भाकर केंद्रांना उलट नोटीसा देण्याचेच काम सुरू झालेले आहे. सभापती महोदय, त्या दिवशी आपण हा निर्णय देताना मंत्र्यांना विचारले होते की, आपण हे नीट सांगा की आपणास मी देत असलेला निर्णय मान्य आहे की नाही ? त्यावर मंत्र्यांनी सांगितले होते की, आपण सांगता त्याप्रमाणेच केले जाईल. पण प्रत्यक्षात त्याप्रमाणे कारवाई झाली का ? त्याचा अहवाल सादर केला गेला का ? सभापती महोदय, आताही सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्या बाबत देखील असेच झालेले आहे. या ठिकाणी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, 'मी राज्याचा मुख्यमंत्री म्हणून सांगतो आहे ...' असे असे तर मग मुख्यमंत्र्यांचा शब्द या राज्यात शेवटचा आहे की नाही ? त्यांचे सचिव, त्यांच्या खात्याचे सचिव आणि इतर सगळी मंडळी जी येथे बसतात ते कशासाठी ? माननीय मुख्यमंत्री, मंत्री येथे जे बोलतात त्याची अमलबजावणी होणार आहे की नाही ? ती होणार नसेल तर त्याचे येथे बोलणे, सभागृहाला पर्यायाने जनतेला शब्द देणे व्यर्थ होणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडून, मंत्र्यांकडून निश्चित स्वरूपात सभागृहामध्ये काही गोष्टी कबूल करण्यात आल्या तर त्यांचा अमल झाला पाहिजे, त्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या, मंत्र्यांच्या सचिवांनी, खात्याच्या सचिवांनी मंत्र्यांनी येथे दिलेल्या शब्दाची अमलबजावणी होण्यासाठी बाहेर खात्याच्या सर्व अधिकाऱ्यांना ते कळविले पाहिजे. अशी काही प्रोसिजर आहे काय ? याबाबत नेमकी प्रोसिजर काय आहे त्याबाबत आम्हाला आपल्याकडून मार्गदर्शन व्हावे. सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामध्ये सध्या काय परिस्थिती आहे याची आपणालाही कल्पना आहे. आपण येथे जे मान्य

....... एलएल 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

करून घेतो त्याच्या विरूद्ध बाहेर काम होत आहे आणि ते योग्य नाही हे मला आपल्या मुद्दाम लक्षात आणून द्यावयाचे आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी म्हणून सभापती-आसना वरून निर्देश दिल्यानंतर त्या निर्देशांची खिल्ली उडविली जात असेल, पायमल्ली केली जात असेल तर तो केवळ आपलाच अवमान नसून या सभागृहाचा देखील अवमान आहे.झुणका-भाकर केंद्रे सुरू करावीत आणि त्याचा अहवाल 48 तासांमध्ये सादर करावा म्हणून आपण सांगूनही ती केंद्रे तेथे सुरू होत नाहीत. आता या ठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.रावते यांनी जो प्रोसिजर संबंधात मुद्दा मांडला आहे त्याप्रमाणे आपण जे निर्देश येथे दिले त्यांची अमलबजावणी करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी त्याप्रमाणे आदेश निर्गमित करायला पाहिजे, पण प्रत्यक्षात तसे होत नाही. इतकेच नाही तर त्याबाबत तोंडी सूचना देखील दिल्या जात नाहीत. उलट तुमच्या निर्णयाची आम्ही कशी वासलात लावतो हे दाखविण्याचे धाडस काही अधिकारी करीत असतात आणि अशांच्या विरोधात कडक कारवाई केली गेली पाहिजे. सभापती महोदय, रायगड जिल्ह्याचा हा प्रश्न वारंवार या सदनात उपस्थित केला गेला आणि त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले होते. आपण स्वत: याबाबत म्हटले होते की, 'राज्य सरकार हे अंबानी ग्रुप ऑफ अंडरटेकिंग आहे किंवा काय ...' सभापती महोदय, आपण इतकी कडवट टीका केल्यानंतरही राज्य सरकारचे डोळे उघडत नाहीत. किंबहुना उपोषणकर्त्यांकडे देखील दुर्लक्ष केले जात आहे आणि मग या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. गोऱ्हे यांनी म्हटल्याप्रमाणे येथेही नंदीग्राम होण्याची वाट सरकार पाहते आहे का ? आम्ही या सदनामध्ये बसून आणखी काय केले म्हणजे त्याचा सुयोग्य परिणाम होईल ? माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट शब्दात सांगूनही त्याप्रमाणे आदेश निर्गमित केले जात नसतील आणि जमीन संपादनाची कार्यवाही सुरू ठेवली जात असेल तर संबंधितांविरूद्ध कडक कारवाई करणे आवश्यक आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण परवा टीव्ही वर या सेझ संबंधात अत्यंत परखडपणे बोललात, आपले मत व्यक्त केले आहे. त्यावेळी बोलताना आपण एक वाक्य लक्षात ठेवण्याजोगे बोलला होता. त्यावेळी आपण म्हटले होते की, सेझ संबंधी सामान्य माणसाला केंद्रबिंदू ठेवून आपण निर्णय घेतला पाहिजे. आपण तेव्हा चीन बद्दल देखील बोलताना सांगितले की,

....... एलएल 3 ...



KBS/ SBT/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 16:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

चीनमध्ये सर्व जमीन सरकारच्याच मालकीची असल्याने तेथे अशा प्रकारे जमीन संपादन करण्याचा प्रश्न येतच नाही. आपले मत नोंदविताना आपण म्हटले की, याबाबत भारतातील परिस्थिती वेगळी आहे, शेतकरी आणि कश्टकरी डोळ्यासमोर ठेवूनच या संबंधात निर्णय घेतले पाहिजेत, दिले पाहिजेत. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे आपण परवा झुणका-भाकर केंद्रांच्या बाबतीत जे आदेश या ठिकाणी दिले होते ते सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी दाखविलेच आहेत. पण तोही अमलात येत नसेल तर तो केवळ आपलाच नाही तर या सदनाचा देखील अवमान आहे. आपण निर्देश देऊनही झुणका-भाकर केंद्रांना टाळे लावण्याचे आदेश जो अधिकारी काढतो ......

( यानंतर श्री. सरफरे ..... एमएम 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

त्याला एवढे कळते की, तो अधिकारी आपल्या आदेशाला नंतर कात्री लावत असेल तर त्याने सन्मानपूर्वक आपणाकडे येऊन सांगितले पाहिजे की, सभापती महोदय, आपण काल सभागृहामध्ये आदेश दिले. आपण सर्वोच्च पदावरुन पिठासीन अधिकारी म्हणून दिलेल्या आदेशाचे पालन करणे माझे कर्तव्य आहे. परंतु शासनाचे आदेश असल्यामुळे आपण त्याबाबत आम्हाला मार्गदर्शन करावे. परंतु याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावयाचे नाही. या सदनामध्ये झालेल्या सर्वंकष चर्चेनंतर घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावयाची नाही. सर्वोच्च पदावरुन बसून पीठासीन अधिकारी म्हणून आपण दिलेल्या आदेशाचे पालन करावयाचे नाही. प्रशासनासंदर्भात आपण सकाळी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमामध्ये जे गौरवोद्‌गार काढले ते सर्व धुळीमध्ये मिळविणारे होते. आपल्या शुभेच्छा हे अधिकारी जर धुळीमध्ये मिळविणार असतील तर माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या शब्दामध्ये या अधिकाऱ्यांना सांगावे लागेल की, तुम्ही राज्य चालवीत नाही. तुम्ही घोडे आहात आणि आम्ही घोडयावरील स्वार आहोत. आपल्यावर स्वार झालेल्या घोडेस्वाराला तो घोडा उधळून लावू शकतो. त्यामुळे आम्ही नेऊ त्याठिकाणी तुम्ही जायचे, आम्ही चालवू त्या पध्दतीने तुम्ही राज्य चालवावयाचे असे जर आपले अधिकारी सांगत असतील तर सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून अधिकाऱ्यांच्या मुजोरपणावर आपल्याला चर्चा करावी लागेल. आणि म्हणून या उपोषणकर्त्यांच्या बाबतीत संध्याकाळपर्यंत निर्णय झाला पाहिजे . या प्रकरणी आपण आम्हाला न्याय द्याल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये मांडलेल्या भूमिकेच्या संदर्भात निवेदन करण्याकरिता माननीय उद्योग मंत्री श्री. अशोक चव्हाण यांना मी दीड ते दोन तासामध्ये सभागृहामध्ये पाचारण करतो. शासनाची भूमिका मांडण्याकरिता माननीय मुख्यमंत्री उपलब्ध असतील तर ते सभागृहामध्ये उपस्थित रहातील. नाही तर संबंधित खात्याचे मंत्री म्हणून माननीय श्री. अशोक चव्हाण यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहून शासनाची भूमिका स्पष्ट करावी. दुसरे असे की, झुणका भाकर केंद्राच्या संदर्भात मी दिलेले निदेश स्पष्ट होते. त्यानंतर माझ्या निदर्शनास आले त्यामुळे या सार्वभौम सभागृहाचा अवमान, मी दिलेल्या निर्णयाचा अवमान आहे याची मला जाणीव आहे. याकरिता संबंधित खात्याचे मंत्री माननीय श्री. सुनील तटकरे यांनी संध्याकाळी 6 वाजेपर्यंत सभागृहामध्ये उपस्थित राहून मी दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात त्यांची भूमिका स्पष्ट करावी. जेणेकरुन त्यासंबंधी आपल्याला पुढील मार्गदर्शन करता येईल.

DGS/

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यामध्ये अकरावीच्या प्रवेशाचा प्रश्न गंभीर असतांना यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे सिध्दार्थ कॉलेजमध्ये कार्यरत असलेले केंद्र आज संध्याकाळपासून बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचा शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेले या परिसरातील एकमेव कॉलेज आहे. तेव्हा या कॉलेजमधील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र बंद केले जाऊ नये यासंबंधी शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,आपण दिलेल्या निर्णयाबाबत मी आपली आभारी आहे. सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी शासनाचे निवेदन व्हावे अशी माझी विनंती आहे.

श्री सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याव्दारे सदनामध्ये जी माहिती सादर केली आहे ती मी तपासून घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, अकरावीच्या प्रवेशासंदर्भात सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली आहे. 1600 विद्यार्थी असलेले चिनॉय व एल.यु.एम.व्ही. कॉलेज बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याठिकाणी प्रशासक नेमण्याबाबत माननीय शिक्षण मंत्र्यांनी घोषणा केली आहे. त्यामुळे त्या कॉलेजमध्ये एकही ॲडमिशन होऊ दिलेले नाही, सर्व प्रवेश रोखून ठेवण्यात आले आहेत. तेव्हा त्या कॉलेजमध्ये प्रशासक नेमला आहे की नाही याबाबत सभागृहाला माहिती समजली पाहिजे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी या विषयासंबंधी सभागृहामध्ये आश्वासन दिले होते. माझ्या मतदारसंघामधील ही समस्या असल्यामुळे मी देखील या विषयासंबंधी माहिती मिळविण्यास इच्छुक आहे. या विषयाबाबत माननीय सदस्यांनी दोन वेळा आठवण करुन दिलेली असल्यामुळे मी याबाबत फॉलो अप करुन माननीय सदस्यांना माहिती उपलब्ध करुन देतो.

----

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**नियम 93 च्या निवेदनाबाबत**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेचे पहिले निवेदन पुढे ढकलण्याबाबत मंत्री महोदयांचे विनंतीचे पत्र माझ्याकडे आले आहे. त्यानुसार हे निवेदन पुढे ढकलण्यात यावे अशी माझी सदनाला विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. नियम 93 च्या सूचनेवरील पहिले निवेदन पुढे ढकलण्यात येत आहे.

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : आर.ए.पोतदार आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये झालेला गैरकारभार

**मु.शी.** : आर.ए.पोतदार आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये झालेला गैरकारभार याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, यांनी "आर.ए पोतदार आयुर्वेदिक महाविद्यालयामध्ये झालेला गैरकारभार ", या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय पोतदार आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या कारभाराच्या संबंधात चौकशी करण्यासाठी दक्षता समिती नेमली होती, त्यांनी रिपोर्ट दिलेला आहे. निवेदनामध्ये दक्षता समितीने केलेल्या तपासणीतील आक्षेपांच्या संदर्भातील वस्तुस्थिती या ठिकाणी दिलेली आहे. दुसऱ्या पानावर दक्षता पथकाने घेतलेल्या आक्षेपात तथ्य नाही, असे म्हटलेले आहे. ही गंभीर बाब आहे. व्हीजिलन्स कमिटीने निष्कर्ष काढलेले आहेत. त्याप्रमाणे संबंधित अधिकारी भ्रष्टाचारामध्ये गुंतलेले असतील त्यांना 15 दिवसात शासन करणार आहात काय ? डॉ.वहीद यांच्याकडे चार-चार पदांचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे, त्यामुळे ते एकाही पदाला न्याय देऊ शकत नाहीत. ते डीन आहेत. त्यांच्याकडे आयुर्वेदिक संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे, तसेच सहाय्यक संचालक पदाचाही कार्यभार त्यांच्याकडे आहे, इतक्या पदांचा अतिरिक्त कार्यभार देण्याचे कारण काय आहे ? तसेच ते 22 वर्षे एकाच ठिकाणी काम करीत आहेत, त्यांची बदली का करण्यात आली नाही ?

श्री.सुरशे शेट्टी: सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण साहेबांनी पोतदार आयुर्वेदिक कॉलेजच्या संबंधाने प्रश्न उपस्थित केला. हे खरे आहे की, दक्षता कमिटीने या महाविद्यालयातील कारभाराची चौकशी केली. त्यांनी आपल्या अहवालामध्ये काही मुद्दे उपस्थिंत केलेले आहेत, हे खरे आहे. पण काही मुद्यांच्याबाबतीत त्यांनी जे सांगितले, ते बरोबर नाही असे आमच्या विभागाला वाटते. कॉलेजच्या आवारामध्ये आय केअर सेंटर चालू करण्यासाठी जागा दिलेली आहे, त्यासाठी त्यांनी शासनाची परवानगी घेतली नाही, हे खरे आहे. दक्षता समितीच्या अहवालामध्येही सांगितलेले आहे. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण यांना 15 दिवसामध्ये या आयुर्वेदिक महाविद्यालयाची चौकशी करून अहवाल सादर करण्यास तातडीने आजच सकाळी आदेश दिलेले आहेत. दुसरा सन्माननीय सदस्य श्री.वहीद यांच्या संबंधाने मुद्दा उपस्थित केला. या संबंधाने या खात्याचे मंत्री माननीय श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याबरोबर दोन दिवसापूर्वी बैठक झाली. काही अधिकाऱ्यांकडे दोन-तीन पदांचा ॲडीशनल कार्यभार दिलेला आहे, कारण कित्येक वर्षापासून पदांवर नेमणूका झालेल्या नाहीत, त्यामुळे काही सिनियर ऑफीसर्सना ॲडिशनल चार्ज द्यावा लागला. या पदांच्या नेमणुकांचे प्रोसेस सुरु केलेले आहे.अधिष्ठाता, संचालक, सार्वजनिक आरोग्य, संचालक, आयुर्वेद यांचा समावेश करणार आहोत.त्यांच्या बदल्या करू शकतो. डायरेक्टर मेडिकल एज्युकेशन आणि डायरेक्टर आयुर्वेद यांच्या ट्रान्स्फार करण्याबाबतचा निर्णय घेणार आहोत.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत.

**मु.शी.** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत सर्वश्री रामनाथ मोते,संजय केळकर,श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे, यांनी "शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत" नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4...

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या संबंधात 20 तारखेला सभागृहात चर्चा झालेली आहे. सन्माननीय मंत्री श्री.दिलीप-वळसे पाटील यांनी या संबंधाने डिटेल्स उत्तर दिलेले आहे. यापेक्षा काही जास्तीची माहिती पाहिजे असेल तर ती सन्माननीय सदस्यांना द्यायला तयार आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हे खरे आहे की, त्या दिवशी लक्षवेधीच्या माध्यमातून चर्चा झलेली होती. लक्षवेधी सूचना आणि 93 ची सूचना एकत्र चर्चेला घ्यावी,अशी मी विनंती केली होती. परंतु ती विनंती मान्य होऊ शकली नाही. मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, अधिष्ठाता संवर्गातील 6 पदे, प्राध्यापक संवर्गातील 48 पदे, सहयोगी प्राध्यापक संवर्गातील 239 पदे, तर अधिव्याख्याता संवर्गातील 258 पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे भरण्याची कार्यवाही लवकरात लवकर करू असे म्हटलेले आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

परंतु यामध्ये शासनाची अशी अडचण दिसते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून ही दिरंगाई होत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून ही सगळी पदे भरण्याऐवजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून काढून घेऊन शासन स्तरावर ही पदे भरण्याच्या संदर्भात कार्यवाही होईल काय ? कर्नाटकच्या धर्तीवर या सर्व प्राध्यापक, अधिष्ठाता आणि अन्य कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीच्या संदर्भात, वयोमर्यादेच्या संदर्भात आणि अन्य लाभांच्या संदर्भात तो फॉर्म्युला लागू करणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यासंदर्भातील लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी सन्माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्टपणे सांगितले होते की, जी पदे रिक्त आहेत त्यासंबंधी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणी पाठविलेली आहे. त्यामध्ये 1 पद जॉइन्ट डायरेक्टर, डीनची 4 पदे तसेच प्राध्यापक, लेक्चररर्सची पदे आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला वगळून डायरेक्ट रिक्रुटमेंट करण्यासंबंधीचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी मांडला. माननीय मंत्रिमहोदयांनी या सभागृहामध्ये आणि विधानसभा सभागृहामध्ये सांगितले की, आमची इनिशिअल नोट तयार झाली आहे, कॅबिनेट नोट तयार करुन, कॅबिनेटची परवानगी घेऊन असे करण्याचा प्रयत्न करु.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील चर्चेमध्ये दोन विषय आले होते. त्याचे व्यवस्थित स्पष्टीकरणासह माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे अशी विनंती करतो. त्यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पर्व्ह्यूच्या बाहेर काढून ॲटॉनॉमी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्या त्या महाविद्यालयांना आपापल्या पध्दतीने, जसे लागतील त्या पध्दतीने ॲटॉनॉमी दिल्यानंतर प्राध्यापकांची रिक्रुटमेंट करता येईल अशी ॲटॉनॉमी वेगवेगळ्या कॉलेजेसना देणार, विभागीय स्तरावर देणार की, राज्य स्तरावर देणार ? त्याचबरोबर दुसरा महत्वाचा विषय, जो सरकारच्या हातामध्ये आहे तो म्हणजे प्रमोशनचे काम ऑगस्ट महिन्यापूर्वी कोणत्याही प्रकारे पूर्ण केले जाईल काय ? ज्या ठिकाणी रोस्टरचा अडथळा येतो त्या ठिकाणी रोस्टर बदलून उदा. ऑर्थोपेडिक सर्जन किंवा लेक्चररचे पद असेल आणि त्या संवर्गातील उमेदवार मिळत नसेल तर तेथल्या तेथे ते बदलून ताबडतोब रिक्रुटमेंट केली तर सर्जरी होऊ शकतात. अशी तांत्रिक व्यवस्था करावयास पाहिजे. माननीय मंत्रिमहोदयांनी वेळीच या गोष्टीकडे लक्ष देऊन विशिष्ट कालावधीत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

प्रमोशनचे काम करावयास पाहिजे. ते काम कधी पूर्ण केले जाईल ? 31 ऑगस्टपूर्वी ते पूर्ण केले जाईल काय ? ॲटॉनॉमी कशा पध्दतीने दिली जाईल ?

श्री. सुरेश शेट्टी : आता आपण रिक्रुटमेंटसंबंधी चर्चा केली. ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून काढून खात्यामार्फत डायरेक्ट रिक्रुटमेंट करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. ॲटॉनॉमीच्या विषयावर शासनाने काही ठरविलेले नाही. प्रत्येक मेडिकल कॉलेजला ॲटॉनॉमी द्यावी यासंबंधी विचार करावा लागणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सर्व्हिस कंडीशन बद्दल विचारले. स्टेट मेडिकल टिचर्स असोसिएशनचे मेमोरंडम आमच्याकडे आले आहे. त्यामध्ये प्रॅक्टीस, कंसल्टेशन, सर्व्हिस कंडिशन्स, पगारवाढ हे सर्व मुद्दे आहेत. आम्ही हाही विचार करीत आहोत की, सेवानिवृत्तीचे वय जे 60 वर्षे आहे ते पाच वर्षे वाढवून घ्यावयाचे. याचे कारण असे की, आमची जेवढी कॉलेजेस आहेत त्या ठिकाणी चांगले डॉक्टर्स आपल्याला शिकविण्यासाठी मिळत नाहीत. जे आहेत तेच सोडून जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपली जी मेडिकल कॉलेजेस आहेत त्या ठिकाणी आपल्याला चांगले प्रोफेशनल्स.....

श्री. श्रीकांत जोशी : माननीय मंत्रिमहोदयांनी प्रमोशन्स बाबत सांगावे.

श्री. सुरेश शेट्टी : त्यांच्या सर्व्हिस कंडीशन्स विचारात घेऊन मेडिकल कॉलेजसाठी लवकरात लवकर नवीन धोरण जाहीर करणार आहोत..

----

**नियम 93 अन्वयेच्या निवेदनाबाबत**

**उपसभापती** : निवेदन क्रमांक 4 व 5 सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आता सभागृहात नसल्यामुळे ते सभागृहात उपस्थित झाल्यानंतर घेण्यात येतील. निवेदन क्रमांक 6 पुढे ढकलण्यात आले आहे. यानंतर निवेदन क्रमांक 7 घेण्यात येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...3...

**पृ. शी.** : शेतकरी अपघात योजनेअंतर्गत अपघातग्रस्तांचे क्लेम मंजूर न होणे.

**मु. शी.** : शेतकरी अपघात योजनेअंतर्गत अपघातग्रस्तांचे क्लेम मंजूर न होणे याबाबत प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी "शेतकरी अपघात योजनेअंतर्गत अपघातग्रस्तांचे क्लेम मंजूर न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. शिगम ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने शेतक-यांना आणि विशेषत: अपघातग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबियांना मदत व्हावी या दृष्टीने ही फार चांगली योजना हाती घेतलेली आहे. आय.सी.आय.सी. आय. लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीकडे शेतक-यांची जेवढी प्रकरणे गेलेली आहेत त्याप्रकरणा पैकी 10 टक्के प्रकरणे देखील मंजूर करण्यात आलेली नाहीत ही अतिशय गंभीर बाब आहे. खरे म्हणजे या लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीने शासनाची आणि शेतक-यांची फसवणूक केलेली आहे. तेव्हा याबाबतीत शासन या कंपनीवर कारवाई करील काय आणि त्या कंपनीकडे दाखल झालेल्या सर्व प्रकरणाची चौकशी होऊन क्लेमस्ची रक्कम वसूल करण्यात येईल काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : आय सी आय सी आय लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीकडे 2005मध्ये शेतक-यांसाठी अपघात विमा योजना दिली गेली. 8 कोटी 10 लाख एवढी रक्कम प्रिमियमच्या माध्यमातून त्या कंपनीकडे भरण्यात आली. त्या कपंनीकडे 3724 दावे प्राप्त झाले होते त्यापैकी 616 दावे मंजूर करण्यात आले. 6 कोटी 16 लाख रु. रक्कम त्या कंपनीने शेतक-यांपर्यन्त पोहोचविली. त्या कंपनीने उर्वरित दाव्याबाबत समाधानकारक निर्णय घेतलेला नाही, शासनाची फसवणूक केलेली आहे असे म्हणणे कितपत योग्य आहे हा प्रश्न आहे.शासनाने कबाल इन्शुरन्स कंपनीला विमा सल्लागार म्हणून नेमलेले आहे. ही कंपनी ब्रोकरचे काम करते. म्हणजे इन्शुअर्ड व्यक्तीसाठी ही कंपनी काम करते. त्या कंपनीने 3200 केसेस तपासलेल्या आहेत. शासनाने या आय सी आय सी लोंबार्ड कंपनीवर केस दाखल करण्याचे काम हाती घेतलेले आहे.

श्री. अरविंद सावंत : 3724 विमा दाव्यांपैकी फक्त 616 दावे या लोंबार्ड कंपनीने मंजूर केलेले आहेत. या कंपनीचा अनुभव अतिशय वाईट आहे. निवेदनाच्या परिच्छेद क्रमांक 2 मध्ये असे म्हटलेले आहे की, आय सी आय सी आय लोंबार्ड जनरल इन्शुरन्स कंपनीने वेगवेगळी कारणे दर्शवून अथवा तोकड्या कारणास्तव नाकारलेल्या विमा प्रस्तावांबाबत पाठपुरावा करुनही प्रतिसाद मिळालेला नाही. ही लोंबार्ड कंपनी लबाड कंपनी आहे. महाराष्ट्र शासनाने या कंपनीला कोणत्याही प्रकारची कामे देऊ नयेत यासाठी या कपंनीला काळया यादीत घातले जाईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : या कंपनीचा अनुभव विचारात घेता आपण राज्य ग्राहक मंचाकडे तक्रार नोंदवित आहोत. या कंपनीला शासनाचे कोणतेही काम मिळू नये यासाठी तिला काळ्या यादीत टाकावे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ती सुध्दा कारवाई केली जाईल.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मराठवाड्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातून पीएच.डी. अथवा एम.फील करण्यासाठी नांव नोंदविलेल्या विवेकानंद चव्हाण याचा प्राध्यापक वर्गाकडून होत असलेला मानसिक छळ

**मु. शी.** : मराठवाड्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातून पीएच.डी. अथवा एम.फील करण्यासाठी नांव नोंदविलेल्या विवेकानंद चव्हाण याचा प्राध्यापक वर्गाकडून होत असलेला मानसिक छळ याबाबत श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "मराठवाड्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातून पीएच.डी. अथवा एम. फील करण्यासाठी नांव नोंदविलेल्या विवेकानंद चव्हाण याचा प्राध्यापक वर्गाकडून होत असलेला मानसिक छळ" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4..

श्री. दिवाकर रावते : श्री. विवेकानंद चव्हाण हा बंजारा समाजाचा युवक आहे. त्याने एम.अे.ला 515 गुण मिळवून सुवर्ण पदक पटकावलेले आहे. हा अत्यंत गरीब घरातील युवक आहे. सांगायला लाज वाटते की, या युवकाच्या वडिलांनी दारोदारी भीक मागून त्याला एम.फिल करण्याचे ठरविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातून एम.फील करण्यासाठी श्री विवेकानंद चव्हाण याने नाव नोंदवले. त्यावेळी प्रभारी म्हणून जे प्राध्यापक असतात त्यांनी विवेकानंद चव्हाण याला भारतीय वंजारा समाजाचे हित हा विषय दिला. त्यानंतर तीन महिन्यांनी सांगितले की, या विषयाच्या ऐवजी तू माहूर परिसरातील स्थापत्य विषयाचा अभ्यास कर. त्यानंतर दोन महिन्यांनी त्याला पुन्हा असे सांगितले की, या विषयाच्या ऐवजी स्वामी विवेकानंद यांचे राष्ट्रवादी विचार या विषयावर एम.फिल कर. आता प्राध्यापकांनी सांगितल्यामुळे आणि एम.फील त्यांच्या हातात असल्यामुळे त्यांचे ऐकणे भाग असते.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

पुन्हा त्याला असे सांगितले की,आता हा विषय नको आणि स्वामी विवेकानंद हा देखील विषय नको त्यानंतर एक महिन्यामध्ये सांगितले की, तू तुझा विषय निवड आणि तो काय करावयाचे ते तू तूझे ठरव. या विद्यापीठाने श्री.विवेकानंद चव्हाण याला " आर्य समाजाचे मराठवाडयातील कार्य " या विषयावर संशोधन करावयाला सांगितले. वारंवार एका गरीब विद्यार्थ्याला ज्याला दुर्दम्य शिकण्याची इच्छा आहे,त्याने एम.ए.मध्ये सुवर्णपदक मिळविले असतांना देखील त्याच्या मार्गामध्ये आडकाठी निर्माण करण्याचा प्रयत्न या ठिकाणी होत आहे. तरीदेखील या गरीब व हुशार विद्यार्थ्याने जिद्दीने का होईना प्रशिक्षक बदलले आणि दुसरीकडे जाऊन आपली एम.फील ही पदवी संपादन केली आणि त्याच्यानंतर त्याला पी.एच.डी. करावयाची होती परंतु त्याच्यामध्येही त्याच्याबद्दल एवढा आकस होता संबंधितांना की बस्स ! पी.एच.डी.पदवी संपादन करण्याच्या त्याच्या मार्गामध्ये अनेक प्रकारे आडकाठी निर्माण केली गेली. या सर्व जाचाला कंटाळलेल्या श्री.विवेकानंद चव्हाण या युवकाने कुलगुरुंना पत्र लिहिले की, "हा छळवाद मला आता असहय होत आहे" मी त्यामुळे आत्महत्या करीन. त्यासंदर्भातील हा प्रस्ताव येथे आलेला आहे. या प्रस्तावाला आलेले उत्तर खूप विचित्र आहे. याच्यामध्ये ते जे शिंदे होते म्हणजे प्रा.शिंदे,विभाग प्रमुख यांनी सांगितले की, मानसिकदृष्टया हा तरुण अस्थिर असावा. अरे ! जो विद्यार्थी एम.ए.ला सुवर्ण पदक मिळवितो व एम.फील करण्यासाठी वारंवार विषय बदलूनही मोठया जिद्दीने एम.फील.होतो व पी.एच.डी.ची कास धरतो तो विद्यार्थी मानसिकदृष्टया अस्थिर कसा असू शकतो ? यासंदर्भात मला एवढेच म्हणावयाचे आहे की, या संदर्भामध्ये शेवटी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केलेली आहे आणि कुलगुरुंनी याा संदर्भात जी चौकशी समिती नेमलेली आहे. डॉ.बी.एस.वाघमारे, श्री.संतोष एस.पाटील, डॉ.एस.एन.दाते कशासाठी ? पुन्हा एकदा शासनाला सांगतो की, या सदनामध्ये मराठीचा ठराव हा शासनाच्या अधिकृत मान्यतेने झालेला आहे. तरीसुध्दा ही नावे याप्रकारे जर या प्रस्तावाच्या स्वरुपामध्ये देण्यात येणार असतील तर तो या सभागृहाचा अवमान आहे त्यावरही मी हक्कभंगाची सूचना देईन. मराठी ही आपली राज्यभाषा आहे आणि अशाप्रकारे अधिका-यांनी आपली नावे ही मराठीमध्ये का लिहू नये ? तरीसुध्दा हे गाफीलपणे बघितले जाते या अधिका-यांच्या या कार्याबाबत मी निषेध नोंदवून हे लवकरात लवकर सुधारावे याकरिता मी आग्रही भूमिका घेतो. श्री.संतोष एस.पाटील हे एस. म्हणजे कोण ? हे सांगा ना तुम्ही मला हे सर्व शासनाने काढलेल्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

अध्यादेशाच्या विरोधामध्ये आहे, म्हणून यासंदर्भात संबंधित मंत्र्यांवर हक्कभंगाची सूचना लागू करावी का ? त्यासंदर्भातील माझे निर्णय मी घेईन आणि याबाबतीत मी काहीही करावयाला कमी करणार नाही यासंदर्भात प्रत्येकवेळेला सुधारावयाला सांगावयाचे परंतु सुधारण्याची तुमची तयारीच नाही. यासंदर्भात कुलसचिवांनी दिनांक 17.7.2007 रोजी सदर प्रकरण सविस्तर टिप्पणीसह मा.कुलगुरुंना सादर केले असता मा.कुलगुरुंनी " सदर प्रकरणात शिक्षक संघटनेच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीची बैठक बोलवावी व चौकशी करावी " असे निदेश दिलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकरण समितीकडे पुढील चौकशीस्तव वर्ग करण्यात आले आहे. गरिबीतून हालअपेष्टा काढून शिकावयाचे याची कोण जाण असतांना देखील सुध्दा या विद्यार्थ्याची छळवणूक होत आहे, या संदर्भामध्ये शासनाची नक्की भूमिका काय आहे ? यासंदर्भात संबंधित विभागप्रमुखांवर तातडीने कारवाई करणार का ? किवा शासन यासंदर्भामध्ये नेमकी कोणती भूमिका स्वीकारणार आहे ? यासंदर्भात मी माननीय राज्यपालांना देखील एक पत्र लिहिलेले आहे. राज्यपालांचे मला कळत नाही. आजवर अनेक विषयांच्या संदर्भात माननीय राज्यपालांना पत्र लिहिले परंतु त्या पत्राचे उत्तर तर सोडाच पण पत्र पोहोचल्याची साधी पोचपावती पण आपल्यापर्यंत येऊन पोहोचत नाही, ही परिस्थिती आहे, या राज्यामधील यासंदर्भातील सर्व प्रवृत्ती ही राज्यपालांच्या कार्यालयापार्यंत जाऊन पोहोचलेली आहे. तुमचा जो गौरव आहे तुमच्या सरकारचा तो तेथपर्यंत पोहोचलेला आहे असे वाटत आहे. पोलिसांचा यासंदर्भातील अहवाल काय आहे ? या संदर्भामध्ये शासनाची कोणत्या स्वरुपाची भूमिका राहणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रस्ताव या ठिकाणी उपस्थित केला तो फार गंभीर अशा स्वरुपाचा प्रस्ताव आहे. सकाळी यासंदर्भात अधिका-यांसोबत बसून ब्रिफींग घेतांना मला वाटले की, हा जो गोल्डमेडलीस्ट विद्यार्थी आहे, त्याला या युनिव्हर्सिटीच्या प्रोफेसरांनी खूप त्रास दिलेला आहे. याबाबत मी एक सांगू इच्छितो की, युनिव्हर्सिटी ही एक ऑटोनॉमस बाडी आहे आणि शासन म्हणून आम्ही युनिव्हर्सिटीच्या प्रत्येक गोष्टीत हस्तक्षेप करीत नाही परंतु हा जो इन्सिडंट घडलेला आहे तो अतिशय गंभीर आहे. यासंदर्भातील पोलीस स्टेशनच्या अहवालामध्ये असे सांगितले आहे की, हा जो श्री.विवेकानंद चव्हाण नावाचा गोल्ड मेडलीस्ट विद्यार्थी आहे, तो संपूर्ण युनिव्हर्सिटीमध्ये फर्स्ट



JPK/ SBT/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ...... 16:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी......

आलेला आहे, त्याला युनिव्हर्सिटीमधील प्रोफेसरांकडून खूप त्रास झालेला आहे त्याचे पोलीस स्टेशनमधील जे रिपोर्ट आहे ते देखील अत्यंत स्पष्ट आहेत या रिपोर्टनुसार यापैकी कोणावरही जर काहीही कारवाई केली नाही तर शासनाला संबंधितांवर कारवाई करण्याचे

यानंतर श्री.कानडे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KGS/ MAP/ MAP/ 17:00

श्री.सुरेश शेट्टी ....

मुंबई विद्यापीठ कायदा कलम 8(4) अनुसार शासनाला अधिकार आहेत. असे जर काही घडले तर शासन त्यामध्ये हस्तक्षेप करु शकते. म्हणून कलम 8(4) अनुसार आजच शासनाने संबंधित खात्याच्या उपसचिवांना चौकशी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत आणि चौकशी करण्यास सांगितलेले आहे. विद्यापीठाचे जे अधिकारी यामध्ये दोषी असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई शासनाकडून केली जाईल.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, कलम 8(4) अनुसार कारवाई सुरु केलेली आहे. या प्रकरणामध्ये प्राध्यापक किंवा विभाग प्रमुख आहे त्यांच्यावर केलेल्या आरोपांचा खुलासा करताना निवेदनात असे म्हटले आहे की, हा विद्यार्थी मानसिकदृष्टया अस्थिर असावा आणि तो काहीही करु शकतो असे म्हटले आहे. असे उत्तर शासनाच्या निवेदनातून येणे हे अत्यंत चुकीचे आणि आक्षेपार्ह आहे. मेडिकल सर्टिफिकेट घेऊन मानसिकदृष्टया अस्थिर आहे असे म्हणणे वेगळे. परंतु तसे न करता विभागप्रमुख आणि प्राध्यापकांनी असे म्हणणे म्हणजे विद्यार्थ्यावर अन्याय करणारे आहे. म्हणजे वस्तुस्थितीची शहानिशा न करता निवेदन आलेले आहे. अशा प्रकारे फार मोठा चुकीचा पायंडा पाडला जाईल हे लक्षात घ्यावे. एखाद्याला मानसिकदृष्टया अस्थिर आहे असे म्हणणे वेगळे आणि तो मानसिकदृष्टया अस्थिर असावा आणि तो काहीही करु शकतो असे म्हणणे हे अत्यंत आक्षेपार्ह आहे. हे वाक्य निवेदनातून वगळण्यात यावे. त्याचप्रमाणे कलम 8(4) अन्वये जी चौकशी सुरु केलेली आहे ती किती दिवसात पूर्ण होईल ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याप्रकरणाची चौकशी पाच दिवसात पूर्ण करुन विद्यापीठातील आणि विभागातील जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे निवेदनात जो चुकीचा मजकूर छापला गेला आहे त्याबद्दल मी दिलगीरी व्यक्त करतो.

-------

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील अपुऱ्या सुविधा.
**मु.शी.**: अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील अपुऱ्या सुविधांबाबत श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील अपुऱ्या सुविधा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे. )

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## निवेदनानंतर

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना मी पहिला प्रश्न विचारु इच्छितो की, शासनाने या सूचनेसंदर्भात जे निवेदन केले आहे त्याबाबत काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, याबाबत जे निवेदन केलेले आहे त्यामध्ये सर्व काही व्यवस्थित चालले आहे असे दाखविले आहे. आजच इ मराठी टीव्हीवरील बातम्यांमध्ये या रुग्णालयाचे डीन यांनी स्वत: सांगितले की रुग्णालयातील 50 डॉक्टरांनी सामुदायिक राजीनामे दिलेले आहेत. त्यांची पगारवाढीची मागणी आहे. त्याचप्रमाणे औषधांची मागणी आहे. ऑपरेशन थिएटर बंद आहे त्यामुळे शस्त्रक्रिया होत नाहीत. जनरेटर बंद असल्यामुळे रुग्णांना तपासता येत नाही. अशा प्रकारचे निवेदन देऊन 50 डॉक्टरांनी राजीनामे दिलेले आहेत. शासनाने मात्र निवेदनात सर्व काही आलबेल आहे असे दाखविले आहे. हे उत्तर सदनाची दिशाभूल करणारे आहे. अत्यंत गंभीर अशी ही बाब आहे. माझा प्रश्न असा आहे की, 50 डॉक्टरांचे निवेदन प्राप्त झाले आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे रुग्णालयाच्या डीननी इ टीव्हीला मुलाखत दिलेली आहे. मी स्वत: याबाबतीत डीनना भेटलो आणि त्यांनी त्यांच्या हस्ताक्षरात लिहून दिलेले आहे की, "All operation theatres are in working condition. Three hundred major operations are done per month I.C.U., Unit, Blood Bank Unit and C.T. Scan unit is functional and everything is functional."

सभापती महोदय, शासनाकडून जे निवेदन केले जाते ते अधिकाऱ्यांकडून माहिती घेतल्यानंतर केले जाते. मग डीन असोत किंवा विभाग प्रमुख असोत त्यांच्याकडून माहिती घेऊन निवेदन केले जाते. यामध्ये काही चूक झाली असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करु.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 50 डॉक्टरांनी राजीनामा दिल्याची सूचना डीनकडे आली आहे काय ?

(नंतर श्री.भोगले...

अग्रेषित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ 17:05

नियम 93 चे निवेदन क्रमांक-7 सुरु...........

श्री.सुरेश शेट्टी : राजीनामा पत्रे अद्यापपर्यंत विभागाकडे आलेली नाहीत.

श्री.दिवाकर रावते : अधिष्ठाता यांच्याकडे 50 डॉक्टरांनी राजीनामा पत्र दिले आहे. हे त्यांनी मान्य देखील केले आहे. त्यामुळे मंत्रीमहोदयांनी नक्की माहिती घेऊन उत्तर द्यावे. अन्यथा हे निवेदन राखून ठेवावे. चुकीची माहिती देत असाल तर मला या संदर्भात हक्कभंगाचा प्रस्ताव आणावा लागेल.

श्री.सुरेश शेट्टी : निवेदन राखून ठेवण्याची गरज नाही. मी उत्तर देत आहे. विभागाकडे आतापर्यंत कोणाचाही राजीनामा प्राप्त झालेला नाही. मी स्वत: दूरचित्रवाणीवर आणि वृत्तपत्रामध्ये या संदर्भातील बातम्या ऐकल्या व वाचल्या आहेत. नांदेड येथील रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे कर्मचारी राजीनामा देणार आहेत असा त्यांचा मुद्दा होता. वर्क कण्डिशनबद्दल मी यापूर्वीच सांगितले आहे. त्यांच्या ज्या मागण्या आहेत त्या संदर्भात शासन लवकरच निर्णय घेणार आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :पैठण येथील नाथसागर जलाशयाचे व संत ज्ञानेश्वर उद्यानाचे संपूर्ण क्षेत्र पक्षी अभयारण्या म्हणून घोषित होणे

मु.शी. :पैठण येथील नाथसागर जलाशयाचे व संत ज्ञानेश्वर उद्यानाचे संपूर्ण क्षेत्र पक्षी अभयारण्य म्हणून घोषित होणे याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल यांनी ""पैठण येथील नाथसागर जलाशयाचे व संत ज्ञानेश्वर उद्यानाचे संपूर्ण क्षेत्र पक्षी अभयारण्य म्हणून घोषित होणे" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SGB/ SBT/ MAP/ 17:05

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, पैठण शहर संपूर्णपणे उद्ध्वस्त होण्याची शक्यता आहे यामुळे लाखो लोकांचे मोर्चे निघत आहेत. 10 कि.मी.च्या आजूबाजूचा परिसर इको सेन्सिटिव्ह झोन करण्याच्या संदर्भात शासनाने प्रस्ताव दाखल करावा यासाठी सुप्रीम कोर्टाने चार महिन्याचा वेळ दिला होता. परंतु शासनाने दखल घेतली नाही. पक्ष्यांना रहायला देणार आणि 2000 वर्षापूर्वीचे पैठण उभे करणार आहेत. तिथे काहीही करता येणार नाही याची सिंचन विभागाला वन विभागाने कल्पना दिली आहे. परंतु शासन दिरंगाई का करीत आहे? संपूर्ण शहर पॅनिक झाले आहे. लोकांना गाव सोडून जावे लागणार, परंतु पक्ष्यांना रहायला मिळणार आहे अशी भयावह स्थिती आहे. पक्षी अभयारण्य जायकवाडी धरणाला घोषित करण्याची 86 ची सूचना होती. त्याबाबत संघर्ष सुरु आहे. त्या 86 च्या सूचनेला डिनोटीफाय करण्याचा विचार सुरु आहे का? 10 हजार हेक्टरवर शेतकऱ्यांनी पेरा केलेला आहे. सुप्रीम कोर्टाने डायरेक्शन्स दिल्या असून 10 कि.मी.च्या आजूबाजूचा परिसर इको सेन्सिटिव्ह झोन करण्याच्या प्रस्तावाला शासन कसे सामोरे जाणार आहे? कायदेशीर दृष्टीकोनातून संपूर्ण झोन डिनोटीफाय करण्याच्या दृष्टीने शासनाने काय कारवाई करण्याचे ठरविले आहे?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात 1986 साली अधिसूचना निघाली असून नाथसागर पक्षी अभयारण्य घोषित झाले आहे. यानंतर जाहीर सूचना व हरकती मागविल्यानंतर त्याची चौकशी होऊन अहवाल जातो. त्यानंतर फायनल अधिसूचना निघेल, ही समाधानाची आणि त्यातल्या त्यात आशादायक बाब आहे. माननीय पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली इंडियन वाईल्ड लाईफच्या बोर्डाची 21.10.2002 रोजी बैठक झाली. त्या बैठकीमध्ये असे ठरविण्यात आले की, राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्य यांच्या 10 कि.मी.च्या अंतरामध्ये इको सेन्सिटिव्ह झोन जाहीर करावा. या संदर्भात पुन्हा केंद्र शासनाकडून राज्य शासनाला कळविण्यात आले. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सांगितले की, शासनाने चार महिन्याच्या आत निर्णय घ्यावा. केंद्र शासनाने तसा प्रस्ताव मागविला आहे. आता केंद्र सरकारने असे कळविले आहे की, राज्य शासनाने प्रस्ताव पाठविला नाही तर केंद्राकडून सु-मोटो निर्णय घेतला जाईल. तसा निर्णय घेतला तर राज्याला ते अडचणीचे होणार आहे. मागील 15 दिवसात या संदर्भात सर्व लोकप्रतिनिधींची व मंत्रीमहोदयांनी एकत्रित बैठक घेण्यात आली. या संदर्भात त्रयस्थ

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते........

म्हणून यशदाकडून पूर्ण अभ्यास करुन घ्यायचा निर्णय घेण्यात आला. 10 कि.मी.चा परिसर इको सेन्सिटिव्ह झोन केला तर ते चुकीचे होते हे वन खात्याचे मत आहे. त्याकरिता जलसंपदा विभागाकडून प्रस्ताव गेलेला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

पैठण येथील नाथसागर जलाशयाचे व संत ज्ञानेश्वर उद्यानाचे संपूर्ण क्षेत्र पक्षी अभयारण म्हणून घोषित झालेले आहे. नाथसागर पूर्णपणे पक्षी अभयारण्यातून वगळण्यात यावे तसेच ज्ञानेश्वर उद्यान हे सुध्दा पक्षी अभयारण्यातून वगळयात यावे, असे दोन प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत. यासंदर्भात दोन्ही प्रस्ताव कॅन्सल करणे, अभयारण्य काढून टाकणे शक्य होणार नाही. यासंदर्भात अधिक सविस्तर माहिती यशदा कडून घेतली जात आहे. तसेच नाथसागरचे डेडवॉटर 10 कि.मी. पर्यंत जात असते. मी स्वत: त्या ठिकाणी गेलेलो आहे. हे धरण सपाटीवर असल्यामुळे डेडवॉटर लांबपर्यंत गेलेले आहे. या ठिकाणच्या नाथसागरामुळे 140 गावे विस्थापित झालेली आहेत. या ठिकाणची जमीन खूप चांगली सुपीक आहे. डेडवॉटर कमी झाले की, या ठिकाणी शेतकरी जमीन कसतात. तसेच या ठिकाणी मासेमारी करणे बंद करण्यात आलेली आहे. इको सेन्सिटीव्ह झोन झ ाले तर सिंचन विभागाचा मोठा प्रश्न तयार होईल, पाणी उपसण्यात अडचणी निर्माण होतील व त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतील. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याशी आम्ही स्वत: सहमत आहोत. त्यामुळे यासंदर्भात प्रस्ताव देण्याचे काम यशदाकडून केले जात आहे. यात सूचना अशी आहे की, याबाबत डेडवॉटर व इको सेन्सिटीव्ह झोन या विषया पुरतीच मर्यादित माहिती न देता पक्षी अभयारण्याच्या बाबतीत सुध्दा माहिती द्यावी. इको सेन्सिटीव्ह झोन या ठिकाणी न करता पक्षी अभयारण्य राहावे यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात तसेच सीएसई कमेटीकडे मत व्यक्त करणार आहोत. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर आपल्या राज्याचे माननीय मुख्यमंत्री या विषयाच्या संदर्भात उद्या बैठक घेणार आहेत त्यामध्ये आपल्या सूचना जरुर मांडल्या जातील. कारण इको सेन्सिटीव्ह झोन तयार झाला तर या ठिकाणी मोठा प्रश्न उभा राहण्याची शक्यता असल्यामुळे आम्ही विचापूर्वक योग्य त्या स्टेप्स उचलणार आहोत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी अतिशय महत्वाचा विषय उपस्थित केलेला आहे. या ठिकाणी इको सेन्सिटीव्ह झोन तयार झाला तर या ठिकाणच्या नागरीकांना जीवन जगणे मुश्कील होऊन त्यांचे जीवन उध्वस्त होतील. यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, या गंभीर प्रश्नावर केंद्र सरकापर्यंत, माननीय

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

पंतप्रधानांपर्यंत या विषयाच्या संदर्भात भूमिका पोहचत नाही असे मला वाटते. केंद्र सरकारपर्यंत आपल्या व्यथा न जाणे हे दुर्दैव आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, यासंदर्भात हायकोर्टाचा निर्णय घेतला असेल, सुप्रीम कोर्टाचे डायरेक्शन असेल परंतु माझी अशी विनंती आहे की, आपण या विषयाच्या संदर्भात यशदाकडून अहवाल मागविलेला आहे. परंतु हे सर्व करीत असतांना या ठिकाणी इको सेन्सिटीव्ह झोनच्या संदर्भात केंद्रशासनाने आणि वन खात्याने निर्णय घेऊन शिक्का मोर्तब केले तर त्याचा काही उपयोग होणार नाही. या प्रकल्पामुळे जनतेचे जीवन उध्वस्त होणार आहे. वाईल्ड लाईफ असले पाहिजे या मताचे आम्ही सुध्दा आहोत परंतु यासाठी या ठिकाणच्या माणसांना तेथून बाहेर जावे लागत असेल तर ते योग्य होणार नाही. त्यामुळे यशदाचा अहवाल येण्याच्या आत जर केंद्र सरकारने या प्रकल्पाबाबत शिक्का मोर्तब केले तर काही उपयोग होणार नाही. त्यामुळे हा प्रकल्प होऊ नये, या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाचा विरोध आहे अशी भुमिका जर आपण केंद्राकडे मांडली तर त्याचा काही तरी उपयोग होऊ शकेल. यासंदर्भात माझी आपल्याला विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्राला सांगावे की, याविषयाच्या संदर्भात जोपर्यंत आमच्याशी चर्चा होत नाही तोपर्यंत या प्रकल्पाच्या संदर्भात निर्णय करु नये आणि क्लिअरन्स देऊ नये. केंद्रसरकार यासंदर्भात निर्णय घेणार नाही यासंदर्भात पाऊल उचलणे आवश्यक आहे. त्यामुळे आपण यशदाचा अहवाल येईपर्यंत न थांबता यासंदर्भात केंद्र सरकार निर्णय घेणार नाही, यासाठी त्वरीत पाऊल उचलणे आवश्यक आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, नाथसागरच नाही तर महाराष्ट्रातील अनेक अभयारण्य सभोवतालचे क्षेत्र इको सेन्सिटीव्ह झोन करण्याची गरज नाही, असे आम्ही केंद्र सरकारला कळविले आहे. यासंदर्भात केंद्रसरकारला दिनांक 31.3.2007 तसेच 20.7.2007 रोजी कळवलेले आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते.............

(अडथळा ) सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न सिरीअस आहे हे मान्य केलेले आहे. सन्माननी सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, या प्रकल्पामुळे संपूर्ण जनजीवनावर वाईट परिणाम होणार आहे. त्यांनी सांगितले की सर्व अभयारण्य सरसकटपणे करा. महाराष्ट्राच्या वतीने वन विभागाने सांगितले की, आम्हाला असे एकाही ठिकाणी करता येणार नाही. तसे का करु शकत नाही याचा देखील रिपोर्ट पाठविलेला आहे. त्यानंतर पुन्हा एक मिटींग झाली त्या मिटींगमध्ये सांगण्यात आले की, त्रयस्थामार्फत अभ्यास करुन अभयारण्य कॅन्सल करा. असा आपण प्रस्ताव करु शकत नाही. आपण क्षेत्र कमी करु शकतो. दहा कि.मी.क्षेत्रापर्यंत इको सेन्सिटीव्हची गरज नाही असे आपण पटवून देऊ शकतो. हे क्षेत्र  इको सेन्सिटीव्ह झोन झाला अशा प्रकारची वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे. पाण्याच्या योजना बंद होणार अशी सुध्दा बातमी आली होती. ही सर्व कात्रणे माझ्याकडे आहेत. परंतु त्या कात्रणावर न जाता आपल्याला स्थेप घेऊन राज्याच्यादृष्टीने आणि विशेषत: नाथसागर व औरंगाबादचा सप्लाय होत आहे व दोन्ही बाजूची 140 गावे विस्थापित झालेली आहेत, तेथील पाईप लाईन्स आहेत, नळ योजना आहेत त्या कव्हर करावयाच्या असतील तर त्यासाठी शासन अभ्यासपूर्ण परिपूर्ण प्रस्ताव पाठविणार आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील केंद्रीय मंत्र्यांची मदत घेणार आहोत.  या संदर्भात मागील 2 तारखेला दिल्लीमध्ये बैठक होती परंतु ती काही कारणास्तव रद्द झाली. 1986 साली झालेले हे अभयारण्य आपल्याला रद्द करता येणार नाही. फायनल नोटीफिकेशन झालेले नाही. त्यामुळे आपल्या सर्वांच्या ज्या हरकती आहेत, त्यावर चर्चा करु. या संदर्भातील सुनावणी तर होणार आहेच. परंतु त्या दरम्यान  या संदर्भातील अहवाल देण्यासाठी आपण "यशदा" संस्थेला सांगितलेले आहे. त्याठिकाणी "यशदाची" टीम गेलेली आहे. पाणी सोडून शिल्लक राहिलेले जे डेडवॉटर राहते तेवढ्या पुरतेच हे पक्षीय अभयारण्य करावयाचे आहे. खाली गावात आणि वरती करायचे नाही हा निर्णय आपण घेणार आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जर शासन या बाजूचे असेल तर बॅकवॉटरच्या जमिनी मोकळ्या होतात आणि आपण 11 महिन्यांच्या लीजने शेतकऱ्यांना देतो. हा निर्णय दोन वर्षापासून बंद करण्यात आला आहे. तेव्हा हा निर्णय या वर्षापासून ताबडतोब सुरु करणार काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भातील फायनल नोटीफिकेशन कव्हर करावे लागेल. परंतु आपण सध्या प्लीड करीत आहोत. आपण पूर्वी तसे करीत होतो. परंतु आता सुप्रीम कोर्टात केस सुरु असताना वेगळे काही करणे बरोबर होणार नाही. आपल्याला सीईसीकडे जायचे आहे. तेव्हा आपली केस स्ट्रॉंग राहावी यासाठी आपण थांबलेलो आहोत. या संदर्भात निर्णय झ ाल्यानंतर वर्षानुवर्षेचा प्रश्न सुटेल.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने आपणास अखेरची संधी दिलेली आहे. ते म्हणणे मान्य झाले तर सु-मोटो निर्णय घेणार आहे याचे मी पत्र आपणास दाखवितो. तेव्हा आपण सुप्रीम कोर्टात चांगला वकील नेमावा अन्यथा आपल्या हातून केस निघून जाईल. त्यासाठी सरकार काय कारवाई करणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आपण अगोदरच आपले मत कळविले आहे. आपण अभ्यास करुन तसेच त्रयस्थ कमिटीमार्फत रिपोर्ट तयार करुन नेमके किती क्षेत्र पाहिजे हे कळविले आणि कोर्टाला तसे सिध्द रुन दाखविण्यासाठी पुरावे जमा करण्याचे काम चालू आहे. वन विभाग लोकांबरोबर आहे, आम्ही त्यास विरोध करीत नाही. तेव्हा या संदर्भात आता काही म्हणणे योग्य होणार नाही. या संदर्भात उद्या मिटींग आहे त्यामध्ये निर्णय होईल. आपणास सुध्दा या बैठकीला बोलाविले जाईल.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 च्या सूचना**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी यांनी "अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यातील पेढी धरण प्रकल्पाचे कामामुळे तेथील शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी जाण्याने ते विस्थापित होणार असून प्रथम पुनर्वसन व मग धरण या शासनाच्या घोषणेनुसार पनर्वसनाचा पत्ता नसल्याने तेथील महिलांनी सुरु केलेले आमरण उपोषण" या विषयावर स्थगन प्रस्तावाची सूचना दिली आहे. हा स्थगन प्रस्तावाचा विषय होत नसल्याने मी त्याला अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शासनाने आजच निवेदन करावे.

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 17:20

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबईतील गोरेगांव आरे वसाहतीत 27 आदिवासी पाडयातील शेकडो बालके कुपोषणाच्या तिस-या टप्प्यावर असणे, नुकतेच त्यापैकी दोन बोलकांचा झालेला मृत्यू, सदर कुपोषित बालकांना तात्काळ औषधोपचार व पौष्टिक अन्न देण्याची आवश्यकता व त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष," या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी " शैक्षणिक अभ्यासक्रमात शारीरिकदृटया अपंग असलेल्या विद्यार्थ्यांसाठी 3 टक्के जागा राखीव ठेवण्याची अट असताना व त्यानुसार कु.वर्षा पाटील ही 800 जागा असलेल्या एम.एस.सी. रसायनशास्त्र या अभ्यासक्रमासाठी प्रवेशपात्र असताना मुंबई विद्यापीठातर्फे अपंगासाठी राखीव जागा नसल्याचे तिला सांगण्यात येणे तसेच त्यानंतर तिला मुंबईऐवजी बोर्डी येथील कॉलेजात प्रवेश देणे," या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पॉप्यूलेशन स्टडी या संस्थेने केलेल्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणात मुंबईतील 40 टक्के बालके कुपोषित असल्याची माहिती उघडकीस आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, केशवराव मानकर, मधुकर चव्हाण यांनी "सन 2001 पासून 2007 पर्यंत विदर्भातील 3070 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे शासनाच्या अहवालात प्रसिध्द होणे, राज्य शासनाच्या आकडेवारीनुसार 3070 पैकी 1636 आत्महत्यांची प्रकरणे अपात्र झाल्याचे घोषित होणे, राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे या संबंधात केंद्राकडून निधी येण्यास उशीर होत असल्याचे नमूद करणे, यासंबंधातील रक्कम राज्य शासनाने योग्य प्रकारे खर्च न केल्याबद्दल केंद्र

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**......

सरकारने आयबीचे पथक राज्यामध्ये पाठविलेले असणे, शेतकऱ्यांच्या आत्म्हत्येबाबत राज्य सरकार गंभीर नसल्याबाबत न्यायालयाने व्यक्त केलेले मत शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास राज्य शासनास आलेले अपयश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "महिला बचत गट प्रक्रिया ही महिला सक्षमीकरण व गाव विकास साधणारी प्रक्रिया असणे, या कामामध्ये अमरावती जिल्हा बचत गट चळवळीत अग्रेसर असणे, मात्र अमरावती जिल्हयातील प्रकल्प संचालक, श्री.चंद्रकांत गुडेवार यांनी मार्गदर्शक सूचनांचा विचार न करता प्रेरिकांची नियुक्ती करणे, परिणामी प्रेरिका व संस्था यामध्ये भांडणे सुरु होणे, त्यामुळे अनधिकृत प्रेरिकांची नियुक्ती रद्द करण्याची मागणी, या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील, जयंत प्र.पाटील यांनी "कोल्हापूर जिल्हयातील 24 शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणाला व शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे केलेल्या आत्महत्या, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा शासनाने करुनही मदत न मिळणे, यासंबंधात दिनांक 6.7.2007 रोजी जिल्हाधिकारी कचेरीसमोर करण्यात आलेले धरणे आंदोलन, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांत निर्माण झ ालेली नैराश्याची भावना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "वांद्रे पूर्व येथील म्हाडा इमारतीमधील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयात दिनांक 1 मे,2007 रोजी लागलेली आग, या आगीत झोपडपट्टी पुनर्वसन योजनासंबंधातील महत्वाची कागदपत्रे जळून खाक

..3....





**उपसभापती**.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होणे, परिणामी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुरावे नष्ट होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---------

..4....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 व 2 बाबत.**

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक 1 व 2 पुढे ढकलण्यात येत आहेत, त्या चर्चेसाठी नंतर घेण्यात येतील.

------

..5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गेल्या 17 वर्षापासून 31 सहकारी सूतगिरण्यांची कामे रखडल्यामुळे 200 कोटी रुपये अडकून पडणे

**मु. शी.** : गेल्या 17 वर्षापासून 31 सहकारी सूतगिरण्यांची कामे रखडल्यामुळे 200 कोटी रुपये अडकून पडणे यासंबंधी सर्वश्री सुधाकर गणगणे, संजय दत्त, गोंविदराव आदिक, चंद्रकांत रघुवंशी, धनाजी साठे, रमेश निकोसे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी, सय्यद पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" गेल्या 17 वर्षापासून 31 सहकारी सूतगिरण्यांची कामे रखडलेली असणे, असे असताना सरकारने मदतीपोटी दिलेले 200 कोटी रुपये अडकून पडलेले असणे, परिणामी राज्य सरकारकडून आर्थिक मदत देण्यास होत असलेली दिरंगाई आणि भागभांडवल जमा करण्यास संचालक मंडळास येत असलेल्या अडचणींमुळे राज्यातील सूतगिरण्या बंद पडण्याच्या मार्गावर असणे, असे असताना ग्रामीण भागाचा औद्योगिक विकास स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध करुन देणे, कापूस उत्पादक व विणकर यांना व्यावसायिक लाभ मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने सूतगिरण्यांना आर्थिक मदत करण्याचे धोरण आखणे, मात्र या धोरणाकडे शासनाने पाठ फिरवल्याने सहकारी तत्वावर सुरु करण्यात येणा-या गिरण्यांचे भवितव्य अंध:कारमय होणे, परिणामी जनमानसात उमटत असलेली तीव्र प्रतिक्रिया, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर ( वस्त्रोद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, राज्यातील सर्व सूतगिरण्यांच्या प्रश्नांसंदर्भात ही लक्षवेधी सूचना आहे. गेल्या 17 वर्षामध्ये अनेक सूतगिरण्यांना राज्य सरकारने परवानगी दिलेली आहे. परंतु त्यांच्या उभारणीकरिता राज्य सरकारने पाहिजे तसा प्रयत्न न केल्यामुळे आज राज्यातील सूतगिरण्या संकटात सापडलेल्या आहेत. आज सूतगिरण्यावाल्यांना असे वाटत आहे की, सूतगिरण्या सुरु होण्याच्या दृष्टीने आता 17 वर्षे निघून गेलेली आहेत, परंतु अजूनही सूतगिरण्या सुरु होत नाहीत. त्या केव्हा सुरु होणार ? आपण 64 सूतगिरण्या सुरु करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. हा कार्यक्रम किती सूतगिरण्यांसंबंधीचा असून त्या किती वर्षाच्या आतमध्ये सुरु होतील ? याबाबतीत कालबध्द काही ठोस कार्यक्रम राज्य शासनाने हाती घेतला आहे काय ? व त्या सूतगिरण्या किती कालावधीत सुरु होतील ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, कापूस उत्पादक क्षेत्रांमध्ये सूतगिरण्यांच्या संख्येत वाढ होण्याच्या दृष्टीने शासनाने जरुर धोरण स्वीकारलेले आहे. राज्य शासनाने 1:9 प्रमाणे भागभांडवल द्यावयाचे आहे. 8 व्या व 10 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये एकूण 64 सूतगिरण्यांची अर्थसहाय्यासाठी शासनाने निवड केलेली आहे. अशा सूतगिरण्या उभ्या करण्याच्या दृष्टीने शासन सहकार्य करीत आहे. या सूतगिरण्या ज्याप्रमाणे भागभांडवल जमा करतील, त्याप्रमाणात त्यांना शासनाकडून भागभांडवल दिले जाते. सूतगिरण्यांसाठी उपलब्ध निधीप्रमाणे भागभांडवल दिले जाईल. तसेच उर्वरित निधीसाठी राज्य बँक व एन.सी.डी.सी. या वित्तीय संस्थांकडून रक्कम उपलब्ध करुन द्यावयाची आहे. याकरिता राज्य बँकेकडे आणि एन.सी.डी.सी.कडे प्रस्ताव पाठवित आहोत. तसेच, जसे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होतील तसे भागभांडवल उपलब्ध करुन दिले जाईल.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, 17 वर्ष झालेले आहेत, या सूतगिरण्यांना परवानगी देण्यात आली आहे, पण एवढी वर्षे उलटून गेल्यानंतरही एक विशेष पॅकेज, ज्याप्रमाणे पश्चिम महाराष्ट्रामधील साखर कारखान्यांना दिलेले आहे, सबसिडी दिली आहे, महत्वाचे कार्यक्रम दिलेले आहेत, अर्थसहाय्य दिलेले आहे, त्याप्रमाणे या नवीन सूतगिरण्यांना, त्यांची उभारणी पूर्ण करण्याकरिता एक विशेष कार्यक्रम, कालबद्ध कार्यक्रम शासन देईल काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर :सभापती महोदय, मी सांगितल्याप्रमाणे ही योजना शासनानेच प्रस्तावित केलेली आहे. पाच टक्के भागभांडवल स्वत: सूतगिरण्यांनी जमा करावयाचे आहे, 45 टक्के राज्य शासन देणार आहे व उर्वरित 50 टक्के कर्जासाठी राज्य सहकारी बँक किंवा एन.एस.डी.सी.कडे राज्य शासनामार्फत प्रयत्न करण्यात येणार आहेत. सूतगिरण्यांनी स्वत:चे पाच टक्के भांगभांडवल जमा केल्यानंतर, बांधकामाची प्रगती लक्षात घेऊन राज्य शासन त्यांचा हिस्सा देणार आहे व या सूतगिरण्या पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न करणार आहे.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, प्रश्न विचारण्यामागील हेतू हा आहे की, ज्या सूतगिरण्यांनी त्यांनी जमा करावयाचे भागभांडवल जमा केलेले नाही, अशा सूतगिरण्यांची नोंदणी राज्य शासन रद्द करणार काय ? जर नोंदणी रद्द करणार नसाल तर अर्धवट राहिलेल्या ज्या सूतगिरण्या आहेत त्यांना एखादी योजना लागू करुन पूर्णत्वाकडे नेणार काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, यासंबंधी पुन्हा एकदा अभ्यास करु. यापूर्वी सुध्दा ज्या सूतगिरण्यांची नोंदणी झाली आहे व ज्यांनी 50 टक्क्यांपेक्षा कमी बांधकाम केले आहे अशा सूतगिरण्या डिरजिस्टर्ड केलेल्या आहेत. आपली जर विनंती असेल तर या सूतगिरण्या कशा पात्र होऊ शकतात याबाबत प्रयत्न करण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या सूतगिरण्यांनी पाच टक्के भागभांडवल जमा केलेले आहे त्यांना शासनाने मॅचिंग शेअर कॅपिटल दिलेले नाही. अशा सूतगिरण्यांना तातडीने भागभांडवल देण्याची व्यवस्था शासन करणार काय ? त्याचप्रमाणे राज्य सहकारी बँकेने सूतगिरण्यांना आठ वर्षापूर्वी 200 कोटी रुपये दिलेले आहेत, ज्याची आता 600 कोटी रुपयांची थकबाकी आहे. शासनाने या कर्जाला हमी दिलेली आहे, तेव्हा ही थकबाकी राज्य शासन राज्य सहकारी बँकांना देणार काय ?

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, थकबाकीबाबत बँकेकडून शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत विचार करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य सहकारी बँकेने शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता नाही, कारण राज्य शासनाने हमी दिलेली आहे. राज्य शासन आणि राज्य सहकारी बँक यांच्या दरम्यान अनेक बैठका झाल्या आहेत. त्याचप्रमाणे माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तरही माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेले नाही. ज्या सूतगिरण्यांनी पाच टक्के भाग भांडवल जमा केलेले आहे त्यांना शासनाने मॅचिंग शेअर कॅपिटल दिलेले नाही, ठराविक सूतगिरण्यांना असे भागभांडवल देण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य, श्री.सुधाकर गणगणे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. ज्या ठिकाणी कापूस पिकतो त्या भागातील सूतगिरण्यांना मॅचिंग शेअर कॅपिटल देण्याऐवजी जेथे कापूस पिकत नाही तेथील सूतगिरण्यांना दिलेले आहे. यासंदर्भात शासन काय करणार आहे ?

डॉ.एम.पी.हिराणी : सभापती महोदय, विदर्भाच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचा व ज्वलंत प्रश्न सन्माननीय सदस्य, श्री.सुधाकर गणगणे यांनी उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्य, श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या ठिकाणी कापूस पिकत नाही तेथील सूतगिरण्यांना शेअर कॅपिटल दिले जाते व जेथे कापूस पिकतो तेथील सूतगिरण्यांना शेअर कॅपिटल दिले जात नाही. माझ्या यवतमाळ जिल्हयामध्ये पाच-सहा सूतगिरण्यांना खिरापत वाटावी त्याप्रमाणे दहा कोटी, पंधरा कोटी रुपये वर्षानुवर्षांपासून दिलेले आहेत. त्यांनी इमारती बांधून ठेवल्या आहेत. माजी मंत्री, श्री.माणिकराव ठाकरे यांनी दारव्हा तालुक्यात भव्य इमारत बांधून ठेवली आहे. वाशिममध्ये देखील इमारत बांधून ठेवलेली आहे, वणीचे पूर्वीचे सन्माननीय सदस्य, श्री.कासावार यांनी जागा घेऊन ठेवली आहे. माझी अशी विनंती आहे की, शासन त्यांच्या निवेदनात असा उल्लेख करते की, सूतगिरणी उभी करण्यासाठी 53 कोटी रुपये लागतात. शासनाने सूतगिरणीची कॉस्ट काढली आहे. सूतगिरण्यांनी पाच टक्के भागभांडवल स्वत: जमा करावयाचे आहे, 45 टक्के भागभांडवल शासन देणार आहे. आमचा आग्रह आहे की, ज्या सूतगिरण्यांनी अशा प्रकारचे भागभांडवल जमा केलेले आहे अशा सूतगिरण्या वेगळया काढा. या सूतगिरण्यांना पूर्णत्वाकडे नेण्याकरिता जेवढे भागभांडवल शासनाने देणे अपेक्षित आहे ते प्राधान्याने का दिले जात नाही ? या सूतगिरण्या पूर्णत्वाकडे नेणे, हे शासनाचे कर्तव्य आहे.

यानंतर श्री.बोरले.........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी ..........

सभापती महोदय, या पंचवार्षिक योजनेमध्ये वस्त्रोद्योग क्षेत्राकरिता केंद्र शासनाने 12 हजार कोटी रुपये दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने कापूस उत्पादक पट्टयामध्ये ज्या ठिकाणी शेतक-यांच्या जास्त आत्महत्या होत आहेत त्या ठिकाणी जे अपूर्ण प्रकल्प आहेत ते प्राधान्याने पूर्ण करावयास हवेत. अशी आवश्यकता नाही की, सर्व प्रकल्पांना शासनाने 4-8 कोटी द्यावेत आणि शासना जवळचे पैसे खिरापतीसारखे वाटून टाकावेत. ज्या सूतगिरण्यांनी स्वत:चे भागभांडवल जमा केलेले आहे, ज्यांनी इच्छाशक्ती प्रदर्शित केलेली आहे त्याची तपासणी करुन अशा सूतगिरण्या पूर्ण करण्याकरिता प्राधान्याने संपूर्ण भागभांडवल देऊन उभे करणे ही सध्या विदर्भाची गरज आहे. जर ही गरज गांभीर्याने शासनाने पूर्ण केली तर आज विदर्भामध्ये कापूस मोठया प्रमाणावर पिकतो त्याला फार मोठा मार्केटिंगचा आधार मिळेल आणि त्या आधारामुळे आज होणा-या शेतक-यांच्या आत्महत्या थांबू शकतील. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, विदर्भामध्ये ज्या अपूर्ण सूतगिरण्या आहेत, विशेष करुन यवतमाळ जिल्हयामध्ये ज्या अपूर्ण आहेत त्यांना पूर्ण करण्याकरिता प्राधान्याने शासकीय भागभांडवल देऊन फायनान्शिअल इन्स्टीटयुटकडून 50 टक्के वित्तीय सहाय्य मिळवून देण्याची कार्यवाही शासन तातडीने करणार काय ? सहकारी तत्वावर चालणा-या ज्या सूतगिरण्या बंद पडलेल्या आहेत त्यामध्ये विदर्भात जास्त सूतगिरण्या आहेत, हे आम्ही कबूल करतो. त्या काळामध्ये आम्ही त्या सूतगिरण्या चालवू शकलो नाही, आज टेक्सटाईल सेक्टरमध्ये बूम आहे. तुम्ही ज्या ठिकाणी जाल त्या ठिकाणी सूतगिरण्या, कापड गिरण्या तयार होत आहेत. आमचे असे म्हणणे आहे की, आता वेळ बदललेली आहे. सहकारी क्षेत्रातील सूतगिरण्यांना हातभार लावून त्यांना पुन्हा उभे करण्याची गरज आहे. अशा सूतगिरण्यांना सुरु करण्यासाठी हातभार लावण्याचा शासन प्रयत्न करणार काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी असा प्रश्न विचारला होता की, सरकार मॅचिंग शेअर कॅपिटल देणार काय ? शासनाने गतवर्षी सन 2006-07 मध्ये 202 कोटी रुपयाचे भागभांडवल वाटलेले आहे. सन 2007-08 मध्ये 127 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सूतगिरण्यांनी त्यांच्या सभासदांकडून जेवढे भागभांडवल जमा केले

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ........

आहे तेवढे भागभांडवल शासन बजेटमधून देण्याचा प्रयत्न करीत असते. यात विदर्भ आणि मराठवाडयाला प्राधान्य देण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य, डॉ.एन.पी.हिराणी यांनी श्री.माणिकराव ठाकरे यांच्या सूतगिरणीचा उल्लेख केला. त्या सूतगिरणीच्या सभासदांचे शेअर कॉन्ट्रीब्युशन अत्यंत कमी आहे आणि त्या प्रपोर्शनेटमध्ये शासनाने कॉन्ट्रीब्युशन दिलेले आहे. विदर्भ आणि मराठवाडयातील सूतगिरण्या जर पुढे येत असतील तर त्यांना प्राधान्याने मॅचिंग शेअर कॅपिटल आणि कर्ज प्रकरणासाठी मदत करण्याची शासनाची तयारी आहे. या अधिवेशनानंतर ज्या सूतगिरण्या उभ्या राहू शकतात त्यांची स्क्रुटिनी करुन सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांची एक बैठक नागपूर येथे आयोजित करण्यात येईल.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, बंद झालेल्या सूतगिरण्यांसाठी शासनाने काही कार्यक्रम तयार केलेला आहे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, ज्या गिरण्या प्लॅनमधून वगळण्यात आल्या, ज्या गिरण्या बंद झाल्या, ज्या गिरण्या स्वत:चे शेअर कॅपिटल जमा करु शकल्या नाहीत, फक्त नोंदणी केली होती, त्या गिरण्यांना पर्यायी प्रकल्पामध्ये जाण्याची शासनाने परवानगी दिलेली आहे. ज्याप्रमाणे प्रस्ताव येतील त्याप्रमाणे त्यांना मान्यता देऊ.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, जे साखर कारखाने बंद झाले होते त्या सर्व साखर कारखान्यांना पुन्हा रिवाईज करण्याची कार्यवाही सुरु आहे. जे साखर कारखाने रिवाईज झाले नाहीत त्यांचे ऑक्शन केले जाते. ज्या सूतगिरण्या चालविण्यास स्वत: सक्षम असतील त्यांना शासन साखर कारखान्याप्रमाणे मदत करणार आहे काय ? ज्या सूतगिरण्या तशा प्रकारची कारवाई करण्यास असमर्थ आहेत त्या सूतगिरण्या, साखर कारखान्यांप्रमाणे ऑक्शन करुन पुन्हा सुरु करण्यात येतील काय ?

यानंतर श्री.गागरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सूतगिरण्या सुरु करण्यासाठी शासनाचा पहिला प्रयत्न राहिल व त्या दृष्टीने स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. यातून काही पर्याय निघाले नाही तर सूतगिरण्या विक्री किंवा बंद करण्याचा विचार करण्यात येईल.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बेसखेड ते बेलोरा (ता.चांदूर बाजार) या रस्त्याचे अपूर्ण काम.

**मु.शी.** : बेसखेड ते बेलोरा (ता.चांदूर बाजार) या रस्त्याच्या अपूर्ण असलेल्या कामासंबंधी सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" बेसखेड ते बेलोरा (ता.चांदूर बाजार) या रस्त्याचे बांधकाम गेल्या दोन-तीन वर्षांपासून सुरु असताना ते पूर्ण होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी स्वखुशीने दिलेल्या जमिनीवर यावर्षी ताबा घेऊ पेरा करणे, बेलोरा गावाजवळ हा रस्ता सध्या अस्तित्वात असलेल्या चांदूर बाजार-बेलोरा रस्त्याच्या नदीवरील उंच पुलाला जवळच्या व सरळ मार्गाने जोडण्याऐवजी नदीच्या काठाकाठाने दूरच्या मार्गाने जोडण्याच्या तांत्रिकदृष्टया अत्यंत चुकीच्या कामावर हजारो रुपयांचा खर्च होणे, जुलैच्या पहिल्या आठवडयात आलेल्या जोरदार पुरामुळे नदीच्या काठाकाठाने केलेले रस्त्याचे बांधकाम पुरामुळे बाधीत होणे, "मोठा पुर आल्याच्या अवस्थेत रस्त्याचे बांधकाम उंच असल्यास नदीचा गावाकडील बांध फुटून गावात पाणी शिरेल व रस्त्याचे बांधकाम ठेंगणे घेतल्यास रस्ता पुरामुळे वाहून जाईल, त्यामुळे रस्त्याचे बांधकाम नदीच्या पलीकडील काठाने घेण्याची ही कृती तांत्रिकदृष्टया अत्यंत चुकीची असणे, असे असूनही काम सुरु राहिल्यास पावसाळयात पुरामुळे वर्षा-दोन वर्षात गावाकडील बांध फुटल्यास किंवा बांधलेला रस्ता वाहून गेल्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित कोणत्या अधिकाऱ्याची असेल हे निश्चित करुन ठेवावे" अशी स्पष्ट पूर्व सूचना विधानमंडळ सदस्यांनी दिनांक 13 मे 2005 रोजी व 7 एप्रिल 2006 रोजी वेगवेगळी पत्रे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाला लिहूनसुध्दा याबाबत काळजी न घेतली जाणे, हजारो रुपयांचा निधी वाया जाणे, लक्षावधी रुपयांचा निधी वाया जाण्याची निर्माण झालेली स्थिती, बेसखेड ते बेलोरा रस्ता थेट, सरळ व जवळच्या मार्गाने बेलोरा गावाजवळ उंच पुलाला ताबडतोबीने जोडण्याची आवश्यकता, पूर्वसूचना देऊनही तांत्रिकदृष्टया चुकीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया".

.....2

श्री.राणा जगजितसिंह पाटील (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....4

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत. पण हे निवेदन आपण काळजीपूर्वक पाहिले तर असे दिसते की, मी विचारलेल्या निम्म्या मुद्दयांना उत्तरेच दिलेली नाही. शासनामध्ये आय.ए.एस.दर्जाचे अधिकारी असतात, ते 2-2 वर्षे विधानमंडळ सदस्यांच्या पत्रांवर कार्यवाही करीत नाही याचे काही उत्तरसुध्दा देत नाही. मी माननीय सभापती महोदयांकडे तक्रार केली होती. आता सभागृहात आपल्याकडे दोन तक्रार पत्राच्या प्रती दिलेल्या आहेत. बेसखेड ते बेलोरा या रस्त्याजवळ गावाच्या बाजूने पुरसंरक्षण हवे आहे. पुलावर जवळून येणारा रस्ता हा नदीच्या दुसऱ्या बाजूने आणला जात आहे. हा रस्ता उंच करणे गरजेचे आहे. मी लक्षवेधीमध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, "मोठा पूर आल्याच्या अवस्थेत रस्त्याचे बांधकाम उंच असल्यास नदीचा गावाकडील बांध फुटून गावात पाणी शिरेल व रस्त्याचे बांधकाम ठेंगणे घेतल्यास रस्ता पुरामुळे वाहून जाईल" सध्या हा रस्ता वाहून गेलेला आहे. "रस्त्याचे बांधकाम नदीच्या पलीकडील काठाने घेण्याची ही कृती तांत्रिकदृष्टया अत्यंत चुकीची आहे असे असूनही काम सुरु राहिल्यास पावसाळयात पुरामुळे वर्षा-दोन वर्षात गावाकडील बांध फुटल्यास किंवा बांधलेला रस्ता वाहून गेल्यास त्याबाबतची जबाबदारी निश्चित कोणत्या अधिकाऱ्याची असेल हे निश्चित करुन ठेवावे" असे पत्र मी दोन वर्षापूर्वी लिहिलेले आहे. सदरील रस्ता 6-7 ठिकाणी फुटलेला आहे. याकरिता ही लक्षवेधी मांडलेली असूनही लक्षवेधीच्या निवेदनात काहीही स्पष्ट उत्तर दिलेले नाही. सभापती, अध्यक्ष, विधिमंडळ सदस्यांचे काही पत्र आले तर ते कचऱ्याच्या टोपलीत टाकायचे म्हणून शासनाने अधिकाऱ्यांना काही परवानगी दिलेली आहे का ? काल दिवसभर मी या रस्त्याजवळ होतो. तेथे दिसले की, रस्ता वाहून गेलेला आहे. लक्षवेधीच्या निवेदनात इतके गमतीदार उत्तर दिले आहे तो सांगतो, "या रस्त्याच्या बांधकामावर कोणताही खर्च करण्यात आलेला नाही". रस्ता बांधला परंतु पैसे खर्च झालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच यामध्ये पुढे म्हटले आहे की, "बेलोरा गावाला जोडयाकरिता स्थानिक नागरीक व शेताच्या आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या मागणीनुसार अंदाजे 200 मीटर पुढे तात्पुरती लेव्हल धुऱ्याने नदीकाठाने कमी रुंदीचा तात्पुरता रस्ता बेलोरा गावाला जोडण्यात आला आहे". परंतु या कामावर

.....5



PNG/ MAP/ KGS/

प्रा.बी.टी.देशमुख ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोणताही खर्च करण्यात आलेला नाही. सभापती महोदयांना माझी विनंती आहे की, आपल्या मतदारसंघामध्ये या अधिकाऱ्यांचे युनिट घेऊन जावे म्हणजे आपल्याकडेही कोणताही खर्च न करता कामे करता येईल. या रस्त्याचे अत्यंत घाणेरडे काम झालेले आहे. येथे सार्वजनिक बांधकाम विभागाचा हाय लेव्हल ब्रिज आहे. निवेदनामध्ये म्हटले आहे की, "बोराडा ते बेलोरा रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मंजूर झाला आहे, या प्रस्तावित रस्त्याला बेसखेडा ते बेलोरा हा रस्ता पंप हाऊस जवळील जंक्शन जवळ जोडला जात असल्याने त्या जंक्शनपर्यंत बेसखेडा ते बेलोरा रस्त्याचे मातीकाम पूर्ण करण्यात आलेले आहे."  सभापती महोदय, मी प्रथम या निवेदनातील उत्तरे रेकॉर्डवर घेणार आहे व नंतर प्रश्न विचारणार आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री. गागरे नंतर --- 17:40

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, दिनांक 13.5.2005 आणि दिनांक 10.4.2006 ही दोन्ही पत्रे प्राप्त झालेली आहेत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, खरे म्हणजे ही माहिती लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्येच द्यायला पाहिजे होती. पण ती त्यात न देता आता मान्य केली आहे. यातील दिनांक 13 मे 2005 चे पत्र हे कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अमरावती यांना लिहिलेले आहे आणि दुसरे पत्र दिनांक 10.4.2006 चे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., अमरावती यांना लिहिलेले आहे. त्या पत्रांद्वारे सूचना देऊनही, सांगूनही त्याकडे दुर्लक्ष केल्यानंतर आता सदरचा बांध वा पूल वाहून केला आहे तर मग त्याबद्दल त्या दोन अधिकाऱ्यांच्या विरूद्ध आपण काय कारवाई केली आहे आणि केली असेल तर ती विधानमंडळ सदस्यांना कळविली आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या बाबतीत कारवाई केली गेली आहे मा9ा ती कार्यवाही सदस्यांना कळविली गेली नाही हे निश्चितच आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हे जे दोन सज्जन अधिकारी आहेत त्यातील एक आयएएस आहेत. त्यांनी या पत्रांसंबंधात कार्यवाही काय केली हे दोन वर्षात संबंधित सदस्यांना कळविलेले नाही. शेवटी पावसामुळे तो पूल वाून गेला म्हणून मग मी ही बाब सभागृहात आणली आहे. त्या अधिकाऱ्यांकडे माहिती घेण्यासाठी चकरा मारण्याची माझी प्रवृत्ती नाही. तेव्हा त्या दोन्ही अधिकाऱ्यांनी विधीमंडळ सदस्यांनी पाठविलेल्या पत्राची दखल घेऊन योग्य ती कारवाई केली नाही, किंवा कारवाई केली असल्यास ती सदस्यांना कळविली नाही त्याबद्दल खात्याचे मंत्री म्हणून तुम्ही त्यांच्यावर काय कारवाई केली आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या संबंधात माहिती देण्यापूर्वी मला या बाबतची थोडी पार्श्वभूमी सांगणे गरजेचे वाटते ...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ती सर्व पार्श्वभूमी सांगावयाची असेल तर ती अगोदरच या निवेदनामध्ये आपण का दिली नाही ? खरे म्हणजे आपणास जे काही सांगावयाचे होते, ते या निवदेनामध्ये अगोदरच आपण सांगितले पाहिजे होते. पण ते आपण सांगितले नाही. आणि आता येथे पार्श्वभूमी सांगू इच्छित आहात. ही काय पद्धत आहे ? या पुरामध्ये काही लोक वाहून गेले आहेत. दोन माणसे वाहून गेली आहेत. सभापती महोदय, माझा मुद्दा स्पेसिफिक आहे. आपले अधिकारी इतके मुजोर आहेत की, विधानसभेच्या अध्यक्षांनी फोन केल्यानंतरही तो फोन

........ झेडझेड 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. देशमुख .....

अटेंड केला जात नाही. मला ही बाब ठाऊक असल्याने मी या संबंधात संबंधित अधिकाऱ्यांना फोन केलाच नाही तर सरळ पत्र लिहिले. पण त्यावर देखील त्यांनी काहीच कारवाई केली नाही. आणि हे तुम्ही येथे सांगितले आहे. तर त्याबद्दल तुम्ही त्यांच्यावर काय कारवाई केली आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : त्या पत्रांवर कारवाई केली नाही असे मी सांगितलेले नाही. मी असे म्हटले आहे की, त्यांनी केलेली कारवाई सदस्यांना कळविली गेली नाही हे निश्चित आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : कार्यवाही कळविली नाही हे बरोबर आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, ही बाब चुकीची आहे. म्हणूनच त्याबाबत चौकशी करून, आवश्यक तर त्यांच्यावर त्याबद्दल कारवाई करून त्याचा अहवाल सभागृहासमोर ठेवला जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही बाब चुकीची आहे तर त्याबद्दल त्यांचेवर काय कारवाई केली आहे ? चौकशी कधी करायची असते ? तर एखादी बाब चुकीची आहे किंवा नाही असा प्रश्न पडतो तेव्हा. आता आपण हे मान्य केले आहे की, हे चुकीचे आहे. तर मग त्याबद्दल काय कारवाई आपण केली आहे ? त्यासाठी चौकशी करण्याची गरज आहे का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : झाले ते चुकीचे आहे हे मान्य असले तरीही समोरच्याला त्याबाबत त्याचे म्हणणे काय आहे हे मांडण्याची संधी आपण देत असतो आणि त्याप्रमाणे त्याला संधी देऊन मग आवश्यक ती कारवाई आपण करू.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा थेट प्रिव्हिलेजचा विषय आहे. त्या ठिकाणी ही जमीन तेथील शेतकऱ्यांनी दान म्हणून दिली होती. आता त्यावरील रस्त्याच्या निकृष्ट बांधकामाबाबत त्यांची चौकशीची मागणी आहे. या सर्व कामांबाबत तेथील वृत्तपत्रांमधून अनेकदा बातम्या आलेल्या आहेत. केवळ दोन कि.मी.चा हा रस्ता आहे तो पंपापर्यंतचा रस्ता तरी आपण पूर्ण केला आहे काय ? दान दिलेल्या जमिनीवर तो रस्ता आपण केला नाही म्हणून शेवटी त्या शेतकऱ्यांनी त्या रस्त्याच्या जमिनीवर पेरणी केली आहे, नाही तरी ती जमीन त्यांनीच दान दिलेली होती. तर ते काम करण्यात काय अडचण होती ?

....... झेडझेड 3 ...



KBS/ MAP/ KGS/ श्री. गागरे नंतर --- 17:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्याला आधीच सांगितले आहे की, आज सकाळी या संबंधात माहिती घेताना खात्याच्या अधिकाऱ्यांकडून मला याची जी पार्श्वभूमी सांगण्यात आली ती मी आपल्याला येथे सांगू इच्छितो. साधारणत: 2004 साली याला प्रशासकीय मान्यता मिळाली असून मार्च 2006 मध्ये निधीचा पुरवठा झाला होाहे. साधारणपणे 2.30 कि.मी.चे मातीकाम पूर्ण झाले आहे ...

प्रा. बी.टी.देशमुख : तो रस्ता जेथपर्यंत आहे म्हणजे पंपापर्यंत करेक्ट आहे ...

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगतात तेथपर्यंतचे मातीकाम केले गेले आहे. पुढील काम काही केलेले नाही. हे काम एमआरइजीएसमध्ये मर्ज करण्यात आले आहे. त्यामुळे मातीकाम झाले होते ते पावसामध्ये वाहून गेले. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 3ए 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील...

आपण ज्या रस्त्याविषयी म्हणत आहात त्यावर पैसे खर्च केले नाही. तो रस्ता पूर्ण केला नव्हता फक्त त्याचे तात्पुरते लेव्हलिंग केले होते...

प्रा. बी. टी.देशमुख : हा रस्ता आपण फुकट केला काय? शासनाने रस्ता फुकट केल्याचे आपण कधी पाहिले आहे काय? ही सरकारची फुकट सर्व्हिस आहे काय? साडे पाच हजारामध्ये रस्ता बांधावयाचा आणि दहा हजाराचे बिल काढावयाचे. आणि त्यामध्ये सापडले तर सांगावयाचे की, रस्ता फुकट बांधून दिला आहे. आपण सभागृहामध्ये जे सांगता ते आम्ही ऐकावयाचे काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सकाळी अधिकाऱ्यांकडून ब्रिफिंगच्या वेळी मला जे सांगण्यात आले ते मी याठिकाणी नमूद केले आहे. जी माहिती उपलब्ध आहे ती मी सांगत आहे. माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर मी त्याचे उत्तर देईन.

प्रा. बी. टी. देशमुख : मी पॉईंटेड प्रश्न विचारला आहे. सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराने आपले समाधान झाले असेल तर मी खाली बसतो. नाही तर मंत्रिमहोदयांनी पुन्हा निवेदन सादर करावे.

**उपसभापती** : आपले समाधान हाच माझा संतोष आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत तात्काळ उत्तर देण्यास मी तयार आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : माझा पॉईंटेड प्रश्न आहे. आपण पंप हाऊसपर्यंत म्हटलेले बरोबर आहे. आपण नदीमध्ये केलेल्या फुकट कामासंबंधी मी म्हणत नाही. परंतु माननीय नामदार श्री. छगन भुजबळ यांच्या विभागामार्फत मंजूर झालेल्या रस्त्याला जोडून पंप हाऊसपर्यंतचे रस्त्याचे काम दोन महिन्यात व्यवस्थितरित्या पूर्ण केले जाईल असे आपण आश्वासन द्याल काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, पावसाळा संपल्यानंतर दोन महिन्याच्या आत रस्त्याचे काम व्यवस्थित केले जाईल. आणि संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी करुन एक महिन्यात अहवाल मागविला जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांचा आभारी आहे. परंतु याठिकाणी त्यांच्या अधिकाऱ्यांनी निवेदनामध्ये जे लिहून द्यावयाचे ते आपण वाचावयाचे हे बरोबर नाही. आपण सुरुवातीला वाचल्यानंतर आता निवेदन दुरुस्त केले ही फुकट सर्व्हिस आहे काय?

**उपसभापती** : माननीय सदस्यांचे समाधान झाले काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

प्रा. बी. टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांकडून महत्वाचे उत्तर यावयाचे राहिले आहे. माझे असे म्हणणे आहे की, बोराडा ते बेलोरा या रस्त्याचे काम डिपार्टमेंटने सुरु केले आहे. बेसखेड ते बेलोरा हा रस्ता बेलोरा गावाजवळ थेट पूलापर्यंत जोडण्याची कारवाई दोन महिन्यात पूर्ण केली जाईल काय.?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी याबाबत माहिती घेतली. 22 फूटाचा हा ओ.डी.आर. रस्ता आहे. त्याचे काम याच पध्दतीने पावसाळा संपल्यानंतर दोन महिन्यात पूर्ण केले जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना मी शेवटचा प्रश्न विचारतो. यामध्ये फुकट सर्व्हिस दिली जाता कामा नये म्हणून त्यांना आपण सस्पेंड केले पाहिजे. आपण फुकट सर्व्हिस देऊन नदीमध्ये रस्ता बांधला त्याला हात लावता कामा नये. तो संपुष्टात आणला पाहिजे. ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काहीही काम केले नाही, उलट त्यांनी या कामाला पाठिंबा दिला त्यांच्या बाबतीत आपण चौकशी करतो असे सांगितले. ही चौकशी आपण केव्हा पूर्ण करणार?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, 15 दिवसाच्या आत चौकशी पूर्ण करण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

पृ.शी. : राज्यातील कृषी क्षेत्रात झालेल्या अधोगतीमुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष

मु.शी.: राज्यातील कृषी क्षेत्रात झालेल्या अधोगतीमुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष यासंबंधी सर्वश्री अरविंद सावंत, दिवाकर रावते, सुरेश जेथलिया, गोपीकिसन बाजोरिया, श्रीमती नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, संजय दत्त, गोविंदराव आदिक, धनाजी साठे, सुधाकर गणगणे, रमेश निकोसे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्षवेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"देशात सर्व क्षेत्रात आघाडीवर असलेले प्रगत व संपन्न महाराष्ट्र राज्य हे कृषि क्षेत्रात पिछाडीवर जावून राज्यातील कृषि उत्पादनात 6.66 टक्क्यावरुन 0.10 टक्के इतकी झालेली घसरण, परंतु या राज्याची लोकसंख्या मात्र 2 टक्क्यांनी वाढत असून लोकसंख्येच्या मानाने धान्य व कृषि उत्पादनात हे अत्यंत तुटीचे प्रमाण असणे, राज्यातील कृषि क्षेत्रातील अधोगती ही शासनाने शेती व शेतकऱ्यांकडे केलेल्या अक्षम्य दुर्लक्षाचे फलित असणे, शेती व कृषि विकासासाठी अत्यावश्यक असणाऱ्या सुविधा पुरविण्याबाबत राज्य शासन गंभीर नसल्याने या राज्याच्या कृषि क्षेत्राची व कृषि उत्पादनाची दिवसेंदिवस होत असलेली अधोगती, कृषि क्षेत्रावर दुर्लक्ष केल्याने या राज्यातील व विशेषत: विदर्भातील हजारो शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्त्या, राज्यातील जनता उपासमारीत लोटली गेल्याने व शासनाचे शेतीकडे दुर्लक्ष होत असल्याने शेतकरी व जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता कृषि क्षेत्रातील व कृषि उत्पन्नातील पिछाडी भरुन काढण्याबाबत शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या राज्याच्या बळीराजाने, शेतकऱ्याने या देशामध्ये कृषि उत्पादकता वाढविली. किंबहुना या देशाला शेती उत्पादनामध्ये स्वावलंबी बनविण्याचे काम केले आहे तो शेतकरी आज विपन्नावस्थेमध्ये आहे. आपणास कल्पना आहे की, मध्यंतरीच्या काळात राज्यामध्ये शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणावर आत्महत्त्या केल्या आहेत. तेव्हा या विषयावर आम्हाला चर्चा मागावयाची होती. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी विस्तृत व रोमँटीक असे उत्तर दिले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरू...

सभापती महोदय, शेतकऱ्याच्या शेती मालाला रास्त भाव न मिळाल्याने, बी-बियाणे, किटक नाशके यांचे वाढणारे भाव, बोगस बियाणे त्यातून होणारे अनेक तोटे, निसर्गाचा प्रकोप या सगळयातून शेतकऱ्यांमध्ये विपन्नावस्था निर्माण झाली. निवेदन वाचल्यानंतर आणखी वैषम्य वाटले. महाराष्ट्राचा कृषी विकास दर्शविणारा तक्ता पाहिला तर गेल्या दशकात कृषी विकासाचा दर 6.66 इतका आहे, या दशकामध्ये तो 0.10 इतका आलेला आहे. यामध्ये प्रचंड घसरण झालेली आहे. पर्जन्यमानावर आधारित असलेले शेतीचे क्षेत्र 83 टक्के आहे. म्हणजे गेल्या दशकामध्ये किंवा त्याच्या अगोदरच्या दशकामध्ये देखील आपण आजवर शेतीच्या दृष्टीने जेवढ्या म्हणून जलसंधारणाच्या योजना घेतल्या, मोठमोठी धरणे बांधली किंवा कृष्णा खोऱ्यामधून पाणी मिळणारे असो. परंतु आजही कोरडवाहू शेतीवर शेतकऱ्यांना जगावे लागत आहे. बिहारमध्ये गेल्या दशकामध्ये मायनर्स 1.71 इतका विकासाचा दर होता तो या दशकात 3.51 वर आलेला आहे. म्हणजे बिहारने प्रगती केली इतकेच नाही तर...

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, खरे तर या विषयावर चर्चा घ्यावी. लक्षवेधी सूचनेवर ठराविकच प्रश्न उपस्थित करता येतात.

श्री.बाळासाहेब थोरात : चर्चेला माझी तयारी आहे. हा विषय चर्चेला घेऊन त्यावर सविस्तर बोलण्यासारखे आहे. या लक्षवेधीचे रुपांतर चर्चेमध्ये केले तर माझी त्यास हरकत नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे आणि सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांची याला संमती आहे काय ?

श्री.सुधाकर गणगणे : आमची हरकत नाही.

श्री.संजय दत्त : आमची हरकत नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हा विषय प्रस्तावाच्या रुपाने चर्चेला आला तर त्यावर सविस्तर बोलता येईल. तो प्रस्ताव केव्हा घेता येईल ते सांगावे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यामध्ये अनेक विषय आलेले आहेत. नद्या जोड प्रकल्पाचा विषय आहे, केंद्राने मदत दिलेली आहे, देशाच्या माननीय कृषी मंत्र्यांनी भरपूर मदत केलेली आहे. त्या मदतीचा शोध घ्यायचा असेल तर या विषयावर चर्चा झाली पाहिजे. यासंबंधातील धोरण समजून घ्यावयाचे असेल तर सविस्तर चर्चा करणे आवश्यक आहे.

**उपसभापती** : सभापती महोदयांच्या मान्यतेसाठी हा विषय ठेवण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : या विषयावर चर्चा मान्य झाली नाही तर पुन्हा लक्षवेधी सूचना चर्चेला आणावी, अशी विनंती आहे.

---

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**पृ. शी.** : नाशिक शहर व परिसरामध्ये अतिवृष्टीमुळे काविळ, विषाणू, संसर्गजन्य आजार, दमा व श्वसन मार्गाच्या आजारांच्या रूग्णांमध्ये झालेली वाढ.

**मु. शी.** : नाशिक शहर व परिसरामध्ये अतिवृष्टीमुळे काविळ, विषाणू, संसर्गजन्य आजार, दमा व श्वसन मार्गाच्या आजारांच्या रूग्णांमध्ये झालेली वाढ यासंबंधी सर्वश्री वसंत पवार, जितेंद्र आव्हाड, गुरूनाथ कुलकर्णी, श्रीमती फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" दिनांक 30 जून 2007 पासून नाशिक शहर व परिसरात अतिवृष्टी होत असल्याने काविळ, विषाणू, संसर्गजन्य आजार, दमा व श्वसन मार्गाच्या आजारांच्या रुग्णांमध्ये झालेली वाढ, नाशिकच्या विविध रुग्णालयात मोठ्या प्रमाणात रुग्ण दाखल होत असणे, परिणामी तेथील नागरिकांत पसरलेले भितीचे व तीव्र चिंतेचे वातावरण, साथीच्या रोगांना आळा बसण्यासाठी ठिकठिकाणी किटकनाशक यंत्रणेमार्फत धूर फवारणी तसेच किटक नाशक औषधे फवारणी करण्याची नितांत आवश्यकता, तसेच सर्व रुग्णालयातून खबरदारीची उपाययोजना करण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. "

डॉ.विमल मुंदडा ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाने माझे समाधान झाले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. माझ्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देत असताना मी माननीय मंत्रिमहोदयांना म्हणालो होतो की, डॉक्टर मंडळींनी राजीनाम्याबाबत काही दिले आहे काय तर त्यांनी असे सांगितले की, काही आलेले नाही. माझ्याकडे डीनकडून राजीनाम्याचा फॅक्स आलेला आहे. मी असे म्हटले की, हक्कभंग आणावा लागेल. मी हक्कभंग दिला तर त्याला आपण मान्यता द्यावी.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 व 2 बाबत**

**उपसभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 व 2 वरील लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य नितीन गडकरी व इतर सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी विनंती केली आहे की, त्यांना बैठकीला जावयाचे असल्यामुळे या लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात याव्यात. या लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा घेण्यात येतील.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MAP/

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : मराठी लोकनाट्य तसेच चित्रपट कलावंतांना शासनाकडून मिळणाऱ्या मानधनात वाढ होण्याची आवश्यकता

**मु. शी.** : मराठी लोकनाट्य तसेच चित्रपट कलावंतांना शासनाकडून मिळणाऱ्या मानधनात वाढ होण्याची आवश्यकता याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" मराठी लोकनाट्य तसेच चित्रपटाच्या माध्यमातून आयुष्यभर लोकांचे मनोरंजन व समाजप्रबोधन करणाऱ्या कलावंतांना उतारवयात उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन राहात नाही. शासनाकडून मिळणाऱ्या अत्यंत तुटपुंज्या म्हणजेच दरमहा 500 रुपये मानधनातून एकवेळचे जेवणही भागविता येत नाही. परिणामी राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या गाढवाचं लग्न या हजाराहून अधिक प्रयोग झालेल्या अजरामर विनोदी नाटकात गंगीची भूमिका करणाऱ्या प्रभाताई शिवणेकर या वृध्द कलावंतीणीला गोळ्या-बिस्किटे विकून उदरनिर्वाह करावा लागत असल्याची बाब मे, 2007 मध्ये उघडकीस आली आहे. परिणामी कलारसिक आणि जनतेने व्यक्त केलेली हळहळ. शासनाकडून कलावंताना मिळत असलेल्या मानधनात वाढ होण्याबाबत कलारसिक आणि सर्वसामान्य जनतेकडून अनेक वर्षापासून करण्यात आलेली मागणी, मात्र शासनाचे त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. या सार्वजनिकदृष्ट्या महत्वाचा विषय मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे."

सभापती महोदय, आपण कलाप्रेमी आहात. आपण नेहमी कलावंतांना प्रोत्साहन देत असता. मी मुद्दाम आपल्याला विनंती करतो की, याबाबतीत आपण स्पष्ट निर्देश द्यावेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MAP/

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी ज्या कलावंतीणीचा उल्लेख केला त्यांना मी माझ्याकडून 5 हजार रुपयांचा धनादेश आपल्याकडे सुपूर्द करतो. तो धनादेश आपण त्यांना द्यावा. राज्य शासनाने याची तात्काळ दखल घेऊन पुढील कार्यवाही करावी.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आपण याबाबतीत कालमर्यादा घालून द्यावी.

**उपसभापती** : तात्काळ कार्यवाही करावी असे म्हटल्यानंतर शासन उद्यापासून सुध्दा कार्यवाही करील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण धनादेश देण्याचे जाहीर केले परंतु सन्माननीय सदस्य सुध्दा काही देणार आहेत काय ?

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी त्यामध्ये पाच हजार रुपये देतो.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मालवण तालुक्यातील देवबाग, तळाशी, देवगड तालुक्यातील तांबळडेग, वेंगुर्ला तालुकयातील शिरोडा येथील वेळागर या सर्व गावांवर समुद्र व खाडी यांनी अतिक्रमण केल्यामुळे संरक्षक बंधारा बांधण्याची मागणी.

**मु. शी.** : मालवण तालुक्यातील देवबाग, तळाशी, देवगड तालुक्यातील तांबळडेग, वेंगुर्ला तालुक्यातील शिरोडा येथील वेळागर या सर्व गावांवर समुद्र व खाडी यांनी अतिक्रमण केल्यामुळे संरक्षक बंधारा बांधण्याची मागणी याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यावरील समुद्राचे अतिक्रमण झालेली मालवण तालुक्यातील देवबाग, तळाशी, देवगड तालुक्यातील तांबळडेग, वेंगुर्ला तालुक्यातील शिरोडा येथील वेळागर या सर्व गावात समुद्र व खाडी यांनी अतिक्रमण केले आहे. या अतिक्रमणामुळे शेतकऱ्यांचे माड, बागायती व घरे वाहून जात असून अजूनही वाहून जाण्याची शक्यता आहे. याकरिता समुद्राच्या अतिक्रमणासाठी संरक्षक बंधाऱ्याची तेथील ग्रामस्थांनी वेळोवेळी संबंधितांकडे मागणी केली तरी याबाबत कोणतीच कार्यवाही झाली नाही. काही ठिकाणी संरक्षक बंधाऱ्यांची कामे निधीअभावी अपूर्णावस्थेत आहेत. तसेच शिरोडा वेळागर या पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणी असलेली लोकवस्ती, माड-बागायत, या ठिकाणी समुद्राच्या अतिक्रमाणामुळे नारळाची झाडे वाहून गेली व मोठ्या प्रमाणत जमिनीची धूप झाली असून तेथील घरांनाही धोका निर्माण झाला आहे. शासन कोकणाचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करण्याकरिता प्रयत्नशील असतानाही याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. तरी याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MAP/

श्री. परशुराम उपरकर ....

सभापती महोदय, परवा माननीय पुनर्वसन मंत्र्यांनी उत्तर देत असताना सांगितले की, अशी जी झाडे वाहून गेली त्यांना नुकसानभरपाई दिली गेली नाही. त्यांनी दिलेले आदेश त्या ठिकाणी पोहोचलेले नाहीत. कालपरवा शेतकरी भेटले असता त्यांनी सांगितले की, तलाठी पंचनामा करण्यासाठी गेलेले नाहीत. म्हणून मी हा विषय या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे.

----

....6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MAP/

**पृ. शी.** : आखाडा बाळापूर येथील विरशैव (लिंगायत) समाजाकरिता स्मशनभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी.

**मु. शी.** : आखाडा बाळापूर येथील विरशैव (लिंगायत) समाजाकरिता स्मशनभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी याबाबत प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य प्रा. शरद पाटील, यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" आखाडा बाळापूर येथील विरशैव (लिंगायत) समाजाकरिता स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी सतत जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली व कळमनुरी तहसील कार्यालय यांचेकडे दि. 15.3.2001 पासून (सतत 6 वर्षापासून) वेळोवेळी मागणी करुन सुध्दा आजपर्यंत "शिवा विरशैव मोक्षधाम" योजनांची अंमलबजावणी संबंधित अधिकाऱ्यांकडून झालेली नसल्यामुळे स्मशानभूमीचा प्रश्न अद्याप कायम आहे. सदर प्रश्न न सुटल्यास आखाडा बाळापूर ग्रामपंचायतीच्या आवारात किंवा येथील आठवडी बाजारात अंत्यंविधी करण्यात येईल असा इशारा देऊनही त्याची दखल घेण्यात आलेली नाही. याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन निर्णय घेण्याच्या आवश्यकतेबाबत मी या विशेष उल्लेखाव्दारे मागणी करीत आहे.

----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 18:00

**पृ.शी.**: बुलडाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील दिवठाणा गावच्या श्रीमती कमला इंगळे यांना पंतप्रधान पॅकेजमधून दिलेला चेक न वटणे

**मु.शी.**: बुलडाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील दिवठाणा गावच्या श्रीमती कमला इंगळे यांना पंतप्रधान पॅकेजमधून दिलेला चेक न वटणे याबाबत श्री. दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एक विशेष उल्लेखासंबंधी सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पंतप्रधान पॅकेजच्या निमित्ताने रोज आपल्याला एक एक कथा ऐकायला मिळत आहेत. अमरावतीमध्ये एक चेक परत गेल्याची घटना घडली. दुस-या घटनेमध्ये चेक देण्यामध्ये चूक करणा-या अधिका-यावर कारवाई करण्याचे संकेत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिले असून त्यासंबंधी जिल्हाधिका-यांना देखील खुलासा विचारलेला आहे. या घटनांपेक्षाही गंभीर घटना मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मांडीत आहे. माननीय राज्यमंत्री महोदय हे बुलडाणा जिल्हयाचे पालकमंत्री आहेत. ही घटना बुलडाणा जिल्हयातीलच असल्यामुळे या प्रकरणी त्यांनी उत्तर देण्यासाठी एक महिन्याचा वेळ न लावता आजच्या आजच उत्तर दिले तर बरे होईल.

बुलडाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील दिवठाणा या गावचा एक शेतकरी दिनांक 6 ऑगस्ट 2006 रोजी झालेल्या अतिवृष्टीमध्ये वाहून गेला. त्याची पत्नी श्रीमती कमला इंगळे यांना पंतप्रधान कार्यालयाकडून 30.11.3006 रोजी 1 लाख रुपयांचा डिमांड ड्राफ्ट क्रमांक 1251548 पाठविण्यात आला. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, जनपथ शाखा, नवी दिल्ली या बँकेचा तो डिमांड ड्राफ्ट होता. हा ड्राफ्ट जिल्हाधिकारी कार्यालयाला मिळाला. निवासी उपजिल्हाधिका-यांनी तो ड्राफ्ट 6.1.2007 रोजी तहसिलदारांकडे पाठविला. हा डिमांड ड्राफ्ट तहसिलदार कार्यालयामध्ये

..2..

(श्री. दिवाकर रावते...

पडून राहिला. या ड्राफ्टची 6 महिन्याची मुदत संपल्यामुळे श्रीमती कमल इंगळे यांना पैसे मिळू शकले नाही. तो ड्राफ्ट बाद झाला. संबंधित महिलेला एक लाख रुपायाची आर्थिक मदत मिळू शकली नाही. पंतप्रधान पॅकेजचे पैसे एका खात्या ऐवजी दुस-या खात्यातून दिल्यामुळे संबंधितावर कारवाई झाली. आता या प्रकरणी दिल्लीहून बँकेचा डिमांड ड्राफ्ट आल्यानंतर मृत शेतक-याच्या पत्नीपर्यन्त तो जाणीपूर्वक पोहोचू दिला नाही असे दिसते. आज राज्यामध्ये शेतकरी आत्महत्या करीत आहेत. कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. खरे म्हणजे पुरामध्ये वाहून गेलेल्यांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री निधीतून पैसे द्यावयास पाहिजेत. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांच्यासाठी पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केलेले आहे. श्रीमती कमला इंगळे हिला पंतप्रधान पॅकेज मधून एक लाख रुपयाची मदत दिलेली आहे. परंतु या महिलेला वेळेवर डिमांड ड्राफ्ट न दिल्यामुळे तिला मदतीपासून वंचित राहावे लागले आहे. ज्या जिल्हयातील हे प्रकरण आहे त्या जिल्हयाचे माननीय राज्यमंत्री हे पालकमंत्री आहेत. तेव्हा आत्महत्याग्रस्त भागातील शेतक-यांबद्दल दाखविलेल्या बेपर्वाइ बाबत शासन तातडीने कोणती कारवाई करणार आहे. श्रीमती कमला इंगळे या महिलेला हे शासन एक लाख रुपये केव्हा देणार अशी विचारणा मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे वस्तुस्थिती तपासून घेण्यात येईल. मी सदनाच्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, महापुरामध्ये मृत झालेल्या व्यक्तींना महाराष्ट्र शासनाकडून 1 लाख रुपये आणि पंतप्रधान निधीतून सुध्दा एक लाख रुपये दिलेले आहेत. आत्महत्या झालेल्या शेतक-यांच्या वारसांना जसे एक लाख रुपये दिले जातात तसे महापूरामध्ये वाहून गेलेल्या आणि मृत झालेल्या लोकांच्या वारसांना पंतप्रधान निधीतून मदत दिलेली आहे. ही घटना माझ्या जिल्हयातील आहे. म्हणून ज्या कोणी अधिका-याने याबाबतीत हलगर्जीपणा दाखविला असेल त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि हा डिमांड ड्राफ्ट ज्याच्याकडे मुदत संपेपर्यन्त पडून होता त्यांना ताबडतोब, उद्याच्या उद्या सस्पेंड केले जाईल.

श्री. दिवाकर रावते : धन्यवाद.

---

...नंतर कु. खर्चे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : माननीय तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

**सन 2007 - 2008 खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.**

**तालिका सभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चा आज व उद्या दिनांक 24 जुलै, 2007 रोजी घ्यावयाचे ठरले आहे. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक सदस्याने भाषण करतांना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व उद्याकरिता असलेल्या बाकीच्या सर्व मागण्या यावरील चर्चा उद्या पूर्ण करावी लागेल. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

**विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या.**

**तालिका सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

(1) मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक - ए - 2,ए-4,ए-5,ए-6,बी-3,बी-7, जे-1,एन - 2,क्यू -3,

(2) सहकार,पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - सी -5,व्ही -2, व्ही -3,व्ही - 5.

(3) जलसंपदा ( कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामडळ वगळून ) आणि लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक -आय-3,आय-5.

3E -2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती**.........

(4) वस्त्रोद्योग,माजी सैनिकांचे कल्याण व रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - व्ही -3,जी-1,जी-5,ओ-5,ओ -7,ओ-8,ओ-9.

(5) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक -जी-1,जी-5,ओ-5, ओ-7,ओ-8,ओ-9.

(6) उद्योग व खनिकर्म,सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्य पूरक मागण्या - अे-4,के-7,के-10,झेडडी-1,झेडडी-2,झेडडी-5.

(7) पणन,रोजगार हमी योजना,संसदीय कार्य व महिला व बाल विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या - ओ-3,व्ही-2,एक्स-1.

(8) राज्य उत्पादन शुल्क,पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - बी-2,के-4,यू-4.

(9) वने मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - सी-7,सी-10.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



JPK/ SBT/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ...... 18:05

**औचित्याच्या मुद्दयाबाबत.**

श्री.दिवाकर रावते : माननीय सभापती महोदयांनी असे सांगितले की, आज या सदनामध्ये जी दोन महत्वाची निवेदने आहेत, ती आज संध्याकाळपर्यंत करावीत अन्यथा माननीय मंत्रिमहोदय श्री.तटकरे साहेबांनी येथे यावे आणि त्यांची भूमिका मांडावी.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकररावजी रावते आपला निरोप माननीय मंत्री महोदयांना दिलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : आज सभागृह चालू असतांना मी दिलेला नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मी स्वत:हून मागे घेतला कारण त्यावर संध्याकाळपर्यंत निवेदन करण्यात येईल, असे सकाळी सांगण्यात आले होते. यासंदर्भातील शासनाची भूमिका लवकरात लवकर आम्हाला कळली पाहिजे.

**तालिका सभापती** : संबंधित मंत्री महोदयांना निरोप देण्यात आलेला आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : ही चर्चा सुरु होण्यापूर्वी मी असे सांगू इच्छितो की, आता संध्याकाळचे सहा वाजलेले आहेत, म्हणून ही चर्चा साधारणपणे किती वाजेपर्यंत चालणार आहे व आपण सभागृहाची वेळ किती वाजेपर्यंत वाढविणार आहात ?

**तालिका सभापती** : साधारणपणे आपले सायंकाळच्या सहा वाजेपर्यंत चर्चेकरिता बसण्याचे ठरलेले होते. चर्चेची वेळ प्रथम अर्धा तास किंवा एक तास वाढविण्यात येईल. तूर्त सभागृहाची वेळ एक तासाकरिता वाढविण्यात येत आहे. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री.मधुकर सरपोतदार :सभापती महोदय, यापूर्वी यासंदर्भात माझा एक हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती** : ज्या सन्माननीय सदस्यांना या चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे, त्यांनी आपली नावे द्यावीत.

( सभागृहातील सन्माननीय सदस्य आपण नावे अगोदरच दिलेली असल्याचे सांगतात. )

**तालिका सभापती** : ठीक आहे, या ठिकाणी आतापर्यंत माझ्याकडे एकूण दहा सन्माननीय सदस्यांची नावे या चर्चेत भाग घेण्यासाठी आलेली आहेत. सदर नावांमध्ये सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील आणि इतर अशी दोन नावे वाढलेली आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, आज सभागृहामध्ये विधेयके चर्चेला घेण्यात येणार आहेत का ?

श्री.मधुकर सरपोतदार : यासंदर्भात माझा एक हरकतीचा मुद्दा आहे तो असा आहे की, नियम 230 अन्वये आमच्या नावे एक पत्रक पाठविण्यात आलेले आहे. सभागृहात पुरवणी मागण्यांवर चर्चा व्हायची असेल तर कोणत्या खात्याची चर्चा पहिल्या दिवशी आणि कोणत्या खात्याची चर्चा दुस-या दिवशी याविषयीचे माहितीपत्रक माननीय सदस्यांना कमीत कमी दोन दिवस अगोदर दिले जाते. यावर्षी हे परिपत्रक आज सकाळीच आमच्या पिजन होलमध्ये टाकण्यात आले. या चर्चेकरिता तयारी करतांना कशा पध्दतीने करावयाची आणि त्यासाठी त्यांनी नियम 230 चा आधार घेतलेला आहे. पत्रक काढणा-यांना मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, हया पुरवणी मागण्या सादर कधी झाल्या ? त्यानंतर जे या सदनाचे काम चालू आहे, त्याअनुषंगाने त्याच्यावर जर चर्चा करावयाची असेल तर ते कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे, अमुक अमुक दिवसापासून चर्चेला सुरुवात करावयाची असते. परंतु त्याची आगाऊ माहिती सर्व सदस्यांना खातेनिहाय दिली जाते. त्या अनुषंगाने कोणत्या खात्याची आणि कोणत्या मंत्र्याची चर्चा कोणत्या दिवशी होईल याविषयीचे माहितीपत्रक देण्याची जबाबदारी कोणावर आहे ? हा माझा हरकतीचा मुद्दा आहे आणि त्यानीच अशा प्रकारचे पत्रक काढून आपली जबाबदारी ही संस्थेवर टाकण्याचा जो प्रयत्न केलेला आहे तो योग्य नाही. नियम 230 चा असा अर्थ होत नाही.

डॉ.नीलम गो-हे : सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे तो अतिशय योग्य आहे. आम्ही या चर्चेकरिता गुरुवारपासून मुद्दे काढून ठेवले परंतु केवळ कोणत्या दिवशी कोणते डिपार्टमेंट असणार आहे ही माहिती नसल्यामुळे सर्व मुद्दे एकत्र आले. आज सकाळी बसल्यापासून आजची डिपार्टमेंट वेगळी आणि उद्याची वेगळी असे आम्हाला करावे लागलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी तयारी करावी, अशी आपण अपेक्षा करतो परंतु सदस्यांना तयारी करावयाला वेळच देणार नसाल तर आम्ही आमचे मुद्दे कसे मांडणार ?

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री. उल्हास पवार) : माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. परंतु प्राप्त झालेल्या माहितीनुसार 20 जुलै,2007 रोजी प्रत्येक सदस्याच्या पिजनहोलमध्ये मागण्यांवरील चर्चेसाठी घ्यावयाचे विभाग आणि कोणत्या दिवशी ते विभाग चर्चेला येतील याची माहिती दिलेली आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ही माहिती पिजनहोलमध्ये आजच आम्हांला मिळाली आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांना कदाचित माहिती मिळाली नसेल. परंतु मला ही माहिती 20 जुलै रोजी मिळालेली आहे ही वस्तुस्थिती खरी आहे.

**तालिका सभापती** : मी यापूर्वीच सांगितल्याप्रमाणे 20 तारखेला यासंदर्भातील माहिती पिजनहोलमध्ये दिलेली आहे. यामध्ये जर काही चूक झाली असेल तर त्याची दखल घेतली जाईल आणि ती दुरुस्त केली जाईल. काही माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, आम्हांला माहिती मिळाली आहे. आताच माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हेही सांगत आहेत की माहिती मिळाली आहे. परंतु प्रत्येक सदस्याच्या पिजनहोलमध्ये माहिती पोहोचविली जाईल याची नोंद घेण्यात येईल. कारण काही माननीय सदस्यांनी मान्य केले आहे आणि काही माननीय सदस्यांनी मान्य केलेले नाही. त्यामुळे याची दखल घेतली जाईल आणि योग्य ती दुरुस्ती केली जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नियम 230 आहे त्या नियमाचा जो आधार दाखविला जात आहे त्याबद्दल माझ्या मनात साशंकता आहे. पावसाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्या मांडल्या आहेत. या मागण्यांवर आज आणि उद्या म्हणजे दिनांक 23 आणि 24 जुलै अशी दोन दिवस चर्चा होणार आहे. आज सकाळी 9.30 वाजता कामकाज सुरु झालेले आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये मी नेहमी हा विषय मांडत असतो. सगळया सदस्यांना वेठीस धरण्याची पध्दत सुरु झालेली आहे. विधानमंडळाचे अधिवेशन जास्तीत जास्त लवकर कसे संपविता येईल हा विचार करुन कामकाज सुरु केले जाते. सुट्टयांचा विचार केला तर या अधिवेशनात 11-12 दिवसच कामकाज होणार आहे. 3 आठवडयांचे अधिवेशन म्हणजे 15 दिवस कामकाज झाले पाहिजे. परंतु हा कालावधी कमी करुन 11-12 दिवस कामकाज चालविले जाते आणि त्याला कामकाज सल्लागार समितीमध्ये मान्यता दिली जाते. त्यावेळी सांगितले जाते की, खालच्या सदनाचे

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

कामकाज अमुक एका दिवशी संपणार आहे त्यामुळे या सदनाचे कामकाज देखील त्याप्रमाणे करु या. कामकाज सल्लागार समितीचे कामकाज ज्या पध्दतीने चालते ते पाहिल्यानंतर मला वाटते की ते योग्य नाही. सदनाचे काम अभ्यास करुन चालले पाहिजे. या सदनात वेगवेगळे विषय उपस्थित केले जातात....

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ 18:15

श्री.मधुकर सरपोतदार...........

त्याचा अभ्यास करुन त्यावर माननीय सदस्यांना आपापली मते स्पष्ट शब्दात मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. आता वाचनाची संधीच दिली जाऊ नये अशा घाईगर्दीने कामे उरकली जात आहेत हे योग्य नाही. याबद्दलची नाराजी मला स्पष्ट करावयाची आहे, असो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन 2007-2008 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.**

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक- 1 ते 12 चा समावेश पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आलेला आहे. त्यातील काही महत्वाच्या बाबींसंबंधी मी माझे विचार मांडणार आहे. बाब क्र.5 वर कै.बा.सि.मर्ढेकर यांचा पुतळा उभारण्यासाठी शासनाने तरतूद केली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. आतापर्यंत फक्त चर्चा चाललेली होती. परंतु यावेळी प्रत्यक्षात स्मारक उभे करण्यासाठी रु.25 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. कै.मर्ढेकर हे थोर साहित्यिक होते. त्यांचा जास्तीत जास्त चांगला पुतळा उभारण्याचे काम लवकरात लवकर पूर्णत्वास जाईल यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावा असे मला सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-6, पृष्ठ क्रमांक-5 वर कै.बालगंधर्व यांचा पुतळा उभारण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. एका थोर कलावंताचा हा सन्मान होतो आहे. शासन पुतळा उभारणार आहे त्या संदर्भात मला सूचना करावयाची आहे, शासनाने कृपया याची नोंद घ्यावी. भविष्यकाळात या पुतळयांचे संरक्षण, देखभाल व स्वच्छता राखण्यासाठी काय व्यवस्था केली जाणार आहे यासाठी सुध्दा आताच तरतूद करण्यात यावी आणि पुतळयांचे संरक्षण करावे. पुतळयांना कोणी चपलांचे हार घालतात. अशी विकृती महाराष्ट्रात फार वाढत चालली आहे. विकृतीला दिशा नसते हे लक्षात घेतले पाहिजे. विकृती कोणाच्याही बाबतीत होऊ शकते. छत्रपती शिवप्रभू ही लहान व्यक्ती नाही. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला चपलांची माळ घातली जाते ही विकृती नाही तर काय आहे? अशी मनोवृत्ती वाढत चालली आहे. महाराष्ट्रात परप्रांतातून फार मोठया प्रमाणात लोक येतात. ज्यांचे या देशावर प्रेम नाही अशी माणसे येतात आणि समाजा-समाजामध्ये संघर्ष निर्माण व्हावा, त्यांच्यात भांडणे व्हावीत आणि आपण मजा बघावी अशा उद्देशाने काही लोक मुद्दाम असे कृत्य घडवून आणतात आणि त्यात सर्वसामान्य माणसे बळी पडतात. यादृष्टीने दक्षता घेण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-7 अन्वये मुंबई, नागपूर, औरंगाबाद येथील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाच्या कार्यालयांसाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे ही फार

..3..



SGB/ SBT/ MAP/ 18:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

चांगली गोष्ट आहे.  जवळजवळ 40 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.  न्यायालयांची अवस्था आपण तपासून पाहिली तर अतिशय भयानक स्थिती असल्याचे दिसून येईल. न्यायालयाच्या इमारती सुसज्ज असण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-8 अन्वये हेलिकॉप्टरची दुरुस्ती आणि विमानामध्ये सुरक्षा यंत्रणा बसविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे.  मला शासनाला प्रश्न विचारावयाचा आहे की, ज्यावेळी हेलिकॉप्टर खरेदी केली जाते त्याच वेळी सुरक्षा यंत्रणा कशा पध्दतीची आवश्यक आहे, आधुनिक तंत्रज्ञान वापरले आहे की नाही हे बघण्याची आवश्यकता होती.  हेलिकॉप्टर म्हटले की, सुरक्षा यंत्रणा आवश्यक आहे.  आजच्या दहशतवादी राजकारणामध्ये याची नोंद सरकारने अगोदरच घेण्याची आवश्यकता होती.  प्रथम खरेदी करावयाची आणि नंतर त्यात सुरक्षा यंत्रणा बसवायची हा उद्देश चांगला नाही हेच मला सांगावयाचे आहे.  यापुढे याबाबत काळजी घेण्याची नितांत आवश्यकता आहे.  या बाबीकरिता रु.2.15 कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. तरतूद जरुर करावी.  जे हेलिकॉप्टरमधून प्रवास करतात ते सुरक्षित असले पाहिजेत.  त्यांचा जीव अतिशय मौल्यवान आहे म्हणून ते हेलिकॉप्टरमधून जातात.  त्यांचा जीव सांभाळण्याची जबाबदारी शासनाची आहे.  हेलिकॉप्टर किंवा विमाने खरेदी करतानाच काळजी घेण्याची आवश्यकता आहे अशी माझी शासनाला सूचना आहे.

सभापती महोदय, बाब क्र.9 मध्ये पुणे आणि मुंबई येथील राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयाच्या नुतनीकरणासाठी 50 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.  हा खर्च विधिमंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी ही पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार....

आपण राज्य माहिती आयोगाची स्थापना केली आहे त्यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. आपल्या राज्याचा कारभार चांगला नसल्यामुळे अनेक लोक पैसे भरुन माहिती घेत असतात परंतु त्यांना अशा प्रकारची माहिती त्वरित मिळत नाही त्यामुळे जनतेला त्वरित माहिती उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने राज्य माहिती आयोगासाठी अधिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 10 वर माझे विचार मांडणार आहे. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉप प्रतिष्ठान यास सहायक अनुदान म्हणून 10 लक्ष रुपयाचे देण्यात आलेले आहे. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ हे मराठवाडयातील आदरणीय व्यक्तिमत्व होय. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉप यांच्या देखरेखीखाली अनेक लढे लढले गेले त्यामध्ये हैद्राबादच्या मुक्ती संग्राम लढा सुध्दा येतो. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉप यांचे प्रतिष्ठान उभे करावयाचे असेल तर ते चांगल्या प्रकारे उभे केले गेले पाहिजे तसेच या प्रतिष्ठानची चांगल्या प्रकारे देखभाल व्हावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 11 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्य अल्पसंख्यांक आयोगाच्या आस्थापनेवर नवीन पदे निर्माण करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. अल्पसंख्यांक आयोगामध्ये अनेक अल्पसंख्याक समाज येतो. अल्पसंख्यांक आयोगाच्या संदर्भात माझ ी सूचना आहे की, सामाजिक बांधिलकी आणि देश निष्ठा हे निकष पदे देतांना लावावीत. यामध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असणा-यांना मदत देऊ नये अशी माझी नम्र सूचना आहे

सभापती महोदय, आता मी बाब क्रमांक 12, माहिती व प्रसिध्दी विभागाच्या चित्रपटांची निर्मितीमध्ये "दिलखुलास" ही मराठी मालिका तयार करण्यासाठी 5 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. यासंदर्भात आमच्या समितीसमोर एक पार्श्वभूमी आली होती ती अशी की, एका आयएएस अधिका-याने अशाच प्रकारे 12 कोटी रुपयांचा अपहार केला होता. आता ही व्यक्ती नोकरीमधून निवृत्त झाली असून हे पैसे कसे मिळवावेत यासाठी आमची कमिटी प्रयत्न करीत आहे. त्यामुळे अशाच प्रकारचा अपहार पुन्हा होणार नाही याची दखल घ्यावी अशी माझी नम्र सूचना आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 20, गृह विभागाच्या संदर्भात पोलीस शिपाई, नाईक व पोलीस हवालदार यांची सुधारित वेतन श्रेणीची थकबाकी देण्यासाठी 46,12,55,000 रुपयांची तरतूद

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

करण्यात आलेली आहे. शासनाने यासंदर्भात अगोदरच घोषणा केली परंतु प्रत्यक्षात अंमलबजावणी कधी केली? त्यामुळे यासंदर्भात मला शासनाला विनंती करावयाची आहे की, आपल्याला जी कृती करावयाची असेल ती खुशाल करा परंतु घोषणाबाजी आणि प्रसिध्दी करु नका. घोषणाबाजी केली तर त्यासाठी लवकरात लवकर अंमलबजावणी करा व लोकांना त्यामुळे टीका करण्याची संधी मिळणार नाही याची काळजी घ्या. आपण पोलीस दलाच्या संदर्भात जी घोषणा केली त्यामुळे पोलीस दलात एक संभ्रम निर्माण झाला होता. "टू बी ऑर नॉट टू बी" अशी परिस्थिती निर्माण झाली होती. प्रत्यक्षात पगारात वाढ होणार की, पगार कमी होणार अशी भिती मध्यंतरी पोलीस दलात निर्माण झाली होती. त्यामुळे अशा प्रकारचा संभ्रम टाळण्यासाठी अशा प्रकारच्या घोषणा करु नयेत, केल्याच तर त्यासाठी प्रथम तरतूद करा व मगच घोषणा करा. घोषणा करावयाची आणि दोन वर्ष त्यासाठी तरतूदच करावयाची नाही हे योग्य नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...........

बाब क्रमांक 21, पृष्ठ क्रमांक 19 - पोलीस शिपाई, नाईक व पोलीस हवालदार यांच्या सुधारित वेतनमानाची थकबाकी देण्याकरिता 12 कोटी 45 लाख इतक्या रकमेची पूरक मागणी करण्यात आलेली आहे.

बाब क्रमांक 22, पृष्ठ क्रमांक 19- राज्यातील सर्व होमगार्डकरिता गणवेष खरेदी करण्यासाठी 4 कोटी 12 लाख 97 हजार इतक्या रमकेची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. ही अतिशय चांगली बाब आहे. होमगार्डकडे दुर्लक्ष होत आहे. पूर परिस्थिती असो,दंगल असो, राज्यात कोणताही कठीण प्रसंग आला तर होमगार्डला पाचारण केले जाते. तेव्हा अशा संस्थेस प्रथम युनिफॉर्म पुरविण्याची आवश्यकता होती. यापुढेही त्यांना वेळेवर युनिफॉर्म वेळेवर द्यावेत असे नम्रपणे सुचवावेसे वाटते.

बाब क्रमांक 26, पृष्ठ क्रमांक 21 - देशांतर्गत जल वाहतुकीच्या विकासासाठी 7 कोटी 25 लाख, 35 हजार इतक्या रकमेची पूरक मागणी सादर केलेली आहे.

विधी व न्याय विभागाची बाब क्रमांक.......

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रमपत्रिकेत विधी व न्याय विभागाचा उल्लेख नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, विधी व न्याय विभाग माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे व सुरुवातीलाच माननीय मुख्यमंत्र्यांचे नाव दिलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे असलेल्या खात्यांची नावे दिली जात नाहीत.

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे यांना एक निवेदन करायचे आहे. त्यांनी ते करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विशेष आर्थिक क्षेत्राबाबत..

**मु.शी.**: विशेष आर्थिक क्षेत्राबाबत सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी उपस्थित केलेला औचित्याचा मुद्दा

श्री.नारायण राणे ( महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुसरुन पुढील निवेदन करतो.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सायंकाळी 4.25 वाजता औचित्याच्या मुद्याद्वारे एसईझेड 6 (1) च्या संदर्भात एक मुद्दा उपस्थित केला होता.....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि आम्ही सर्वांनी हा मुद्दा उपस्थित केला होता....

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आहे ती सांगतो. विशेष आर्थिक क्षेत्र 6 (1)- आज दिनांक 23.7.2007 रोजी सायंकाळी 4.25 वाजता विरोधी पक्ष नेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याद्वारे माननीय उद्योगमंत्री व माननीय महसूल मंत्री यांनी दोन तासात निवेदन करावे असे माननीय सभापतींचे निर्देश आहेत.....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये एसईझेड संदर्भात सूचना दिली होती. त्याबाबत खुलासा करावा अशा पध्दतीचे निर्देश माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी दिले होते. खरे म्हणजे 6.00 वाजेपर्यंत खुलासा करावयाचा होता. माननीय विरोधी पक्ष नेते सुध्दा सभागृहात उपस्थित झालेले आहेत.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यासंबंधी सकाळी आम्ही सूचना दिली होती, त्यावर माननीय सभापती महोदयांनी निर्देश दिले होते की, आज संध्याकाळपर्यंत याबाबतीत निवेदन करावे. माननीय सभापती महोदयांच्या निर्देशाचे पालन होत नसेल तर....

श्री.नारायण राणे : निवेदन करण्यासाठीच मी आलेलो आहे.

**तालिका सभापती** : याबाबतीत मंत्रिमहोदयांना खुलासा करावयाचा आहे, असे त्यांनी स्वत:हूनच मला कळवलेले आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, 4.25 वाजताच्या औचित्याच्या मुद्याच्या बाबतीतील नोटीस माझ्याकडे आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सकाळी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या सहीने आम्ही नियम 289 खाली सूचना दिली होती.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यानी औचित्याच्या मुद्याद्वारे हा मुद्या उपस्थित केला होता. त्याबाबतची नोटीस मला सायंकाळी 6.05 वाजता मिळाली. याबाबतीत मी खालच्या सभागृहामध्ये जे निवेदन केले, तेच निवेदन मी या सभागृहात करीत आहे. यासंदर्भातील निवेदन मी सायंकाळी 6.25 च्या आत सभागृहात करीत आहे.

सभापती महोदय, विशेष आर्थिक क्षेत्र हे केंद्र शासनाचे नवीन धोरण असून देशात व राज्यात उद्योग वाढावेत, येथे नवीन प्रकारचे व्यवसाय यावेत, नवीन तंत्रज्ञान यावे, येथे मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध व्हावेत, राज्याचा जी.डी.पी. वाढावा या हेतून हा निर्णय केंद्र शासनाने दिनांक 23 जून,2005 रोजी घेतला होता. त्यानंतर राज्य सरकारने या धोरणाला अनुसरुन वेगवेगळया सवलती या उद्योगासाठी देऊन या राज्यात विशेष आर्थिक क्षेत्र उभारण्यासाठी उद्योजकांना जेव्हा आमंत्रित केले तेव्हा आतापर्यंत 108 अशाप्रकारचे उद्योग किंवा एस.ई.झेड. या राज्यात येऊ पाहत आहेत. त्यासाठी आवश्यक असलेली जमीन सन 1894 च्या कायद्यानुसार संपादित करुन द्यावी, असे ठरविले आहे. परंतु यासंदर्भात ज्यावेळी अनेक राज्यांनी तक्रारी केल्या, त्यामध्ये आपले राज्यही आहे, त्यावेळी केंद्र सरकारने दिनांक 1 जून,2007 ला राज्य सरकारला कळविले होते की, आपण जागा संपादित करीत असताना कलम 4/1, 5/1 ची

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे......

कार्यवाही सुरु करीत असताना कलम 6/1 च्या कार्यवाहीपर्यंत जा आणि थांबा, पुढची कार्यवाही करु नका, अशाप्रकारच्या सूचना केंद्र सरकारने राज्य सरकारला दिल्या होत्या. रायगडच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर रायगडमधील जी 45 गावे एस.ई.झेड.शी संबंधित आहेत, त्या गावांना कलम 4/1, 5/1 ची नोटीस देऊन कलम 6/1 ची प्रक्रिया तेथे सुरु आहे. आता कलम 6/1 ची कार्यवाही करुन थांबा, असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. याठिकाणी मी सदनाला सांगू इच्छितो की, आजमितीपर्यंत या 45 गावांपैकी किंवा रायगडमधील एस.ई.झेड.साठी एकही एकर जमीन शासनाने ताब्यात घेतलेली नाही आणि शेतकऱ्यांनीही ती दिलेली नाही. कलम 5/1 ची कार्यवाही म्हणजे, शेतकऱ्यांकडून हरकती मागविल्या जातात व त्यांची हरकत असेल, शेतकऱ्यांना जमीन द्यावयाची नसेल तर आपण संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतो. जबरदस्तीने कुठलीही जमीन संपादित होत नाही. त्यावेळी बाजारभाव काय असेल, शेतकऱ्यांना जमीन द्यावयाची आहे की नाही ? हे आम्ही पाहतो. सार्वजनिक उपक्रमासाठी किंवा एस.ई.झेड.साठी आवश्यक तेवढे क्षेत्र नोटीफाय केले जाते. परंतु कलम 6/1 नुसार जागा घेण्याची प्रक्रिया होत नाही. त्यासाठी कलम 11 पर्यंतची कार्यवाही पूर्ण करावी लागते. शेतकरी त्यांची जमीन वाटाघाटीने देओ अगर न देओ तो त्यांचा प्रश्न आहे. परंतु कलम 6/1 म्हणजे जमीन ताब्यात घेतली असे नाही. आम्ही फक्त कलम 6/1 ची नोटीस देऊन थांबणार आहोत. केंद्र सरकारचे पुढील आदेश येईपर्यंत आम्ही त्यापुढे जाणार नाही. रायगडचे जे शेतकरी आहेत, त्यांच्या हिताचे असेल तर ते उद्योजकांशी वाटाघाटी करतील. मग, त्यांना 10 लाख रुपये, 15 लाख रुपये, 1 लाख रुपये जे मागावयाचे असतील, तो शेतकरी आणि उद्योजक यांचा प्रश्न आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.........

त्या ठिकाणी सरकार मध्ये पडणार नाही, शेतक-यांचे हित बघितले जाईल, त्यांच्या हिताचा निर्णय घेतला जाईल. आम्ही भूसंपादन अधिनियमातील कलम 6/1 ची कार्यवाही करुन थांबणार आहोत. यामुळे शेतक-यांच्या जमिनीचा ताबा शासनाकडे येणार नाही किंवा शेतक-यांचे पझेशनही जाणार नाही, असा त्याचा अर्थ आहे.

श्री.जयंत प्र. पाटील :सभापती महोदय, नियम 289 अन्वये मी सभागृहात ज्यावेळी चर्चेची मागणी केली होती त्यावेळी सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, कलम 6/1 ची नोटीस काढल्यानंतर जर शेतक-यांनी विरोध केला तर ॲटोमेटिक ॲक्विझिशनची ती नोटीस लॅप्स होते. मंत्रीमहोदयांना माझी विनंती आहे की, पुढील काळात या सभागृहात आपण एस.ई. झ ोड.बाबत चर्चा करणार आहोत. आज त्या ठिकाणी पंधरा शेतकरी उपोषणाला बसले आहेत व त्यातील चार शेतक-यांची परिस्थिती फार वाईट आहे. रायगडच्या जिल्हाधिकारी उपोषणकर्त्यांकडे गेल्या होत्या, त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, ॲक्विझिशन चालू ठेवण्यात येणार आहे, नोटीस मागे घेतली जाणार नाही, ॲक्विझिशन करावे लागेल. आम्ही उपोषणकर्त्यांना विनंती केली की, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिलेले आहे, मी त्यांना सभागृहातील कार्यवृत्त नेऊन दाखविले, परंतु त्यांनी असे सांगितले की, आमचा यावर विश्वास नाही, जिल्हाधिका-यांनी येऊन सांगितले पाहिजे. म्हणून आम्ही जिल्हाधिका-यांना तेथे जाण्याची विनंती केली, परंतु जिल्हाधिका-यांनी उलटेच सांगितले. अशी एक संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. पुढील कार्यवाही शासनाने थांबविली आहे, शेतक-यांशी वाटाघाटी होणार आहे, परंतु आमचा वाटाघाटीला विरोध आहे. ही सर्व चर्चा होणार आहे ती नंतर होणार आहे. आज शेतकरी उपोषणाला बसले आहेत, त्यांचे उपोषण सोडविण्याच्या बाबतीत शासनाने तातडीने उपाययोजना केली पाहिजे, ही आमची मागणी आहे. तीन उपोषणकर्त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, त्यांचा जीव धोक्यात आला आहे, त्यात एका महिलेचाही समावेश आहे व त्या महिलेचे वय 70 वर्षांचे आहे. बाकी सर्व चर्चा आपण नंतर करु, आज आम्हाला शासनाकडून असे आश्वासन हवे की, उपोषणकर्त्यांचे उपोषण सुटले जाईल अशी भूमिका शासनाच्या वतीने घेऊन तशा प्रकारचे प्रयत्न करण्यात येतील.

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे. मी सुरुवातीलाच म्हणालो की, कलम 4/1 च्या नोटिसीनंतर कलम 5/1 ची नोटीस दिली जाते. कलम 5/1 च्या नोटिसीचा अर्थ असा आहे की, जर शेतक-याला जमीन द्यावयाची नसेल तर तो प्रस्ताव लॅप्स होतो. त्यामुळे पुढे जाण्याचा प्रश्न नाही. शेतक-यांच्या सहमतीशिवाय आपण जमीन भूसंपादित करीत नाही, त्यामुळे तो प्रश्न नाही व पुढे कलम 6/1 ची नोटीस देण्याची आवश्यकताच उरत नाही. कलम 5/1 ची नोटीस दिल्यानंतर जर शेतक-याने असे सांगितले की, मला जमीन द्यावयाची नाही तर पुढे कलम 6/1 ची नोटीस देण्याचा प्रश्न येत नाही. त्यामुळे सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी बरोबर सांगितले आहे. आपल्या मुद्याला माझे असे उत्तर आहे की, सरकार कलम 6/1 ची नोटीस देते म्हणजे जमीन ताब्यात घेत नाही. जिल्हाधिका-यांनी जे सांगितले ते चुकीचे आहे. त्यांनी काय सांगितले ते मला माहीत नाही, आपल्याव्दारे ते मी ऐकले आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, कलम 6/1 ची नोटीस देतो याचा अर्थ जमीन संपादित करीत नाही. जमिनीचे भूसंपादन होण्यासाठी कलम 9, 10 व शेवटी 11 ची म्हणजेच ॲवॉर्ड डिक्लेअर करण्याची कार्यवाही करावी लागते. ॲवॉर्ड डिक्लेअर झाला म्हणजे भूसंपादन झाले असे समजले जाते. परंतु, आम्ही या सर्व कार्यवाहीपर्यन्त जाणार नाही. मी जिल्हाधिका-यांनाही सूचना देतो, सन्माननीय सदस्यांकडे शेतक-यांनी जर संपर्क साधला तर त्यांनीही सांगावे की, कलम 6/1 च्या नोटीसपर्यन्त आम्ही थांबणार आहोत, याचा अर्थ जागा संपादित केलेली नाही. उद्या शेतक-यांची जमीन संपादन करण्याच्या दृष्टीने उद्योजक काय देणार आहेत, या वाटाघाटी जर त्यांना रास्त वाटल्या तर ते जमीन देतील. येथपर्यन्तच थांबावे, असे केंद्र सरकारने सांगितले आहे. अशा प्रकारचे शासनाचे धोरण स्पष्ट आहे. विधानसभेमध्ये मी हेच उत्तर दिले आहे. शेतक-यांना उद्ध्वस्त करुन कोणताही प्रकल्प शासनाला आणावयाचा नाही. शेतक-यांची सहमती असल्याशिवाय, कामगारांची सहमती असल्याशिवाय भूसंपादन करण्यात येणार नाही. नोक-या मिळत असतील तरच एस.ई.झेड.आणू. परंतु, या माध्यमातून फोर मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्रानंतर गुजराथने एस.ई.झेड.प्रकल्प आणला, त्या ठिकाणी 50 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक या माध्यमातून होत आहे, त्यांचे अर्धे काम होत आले आहे.

यानंतर श्री.बोरले..........

अशुध्दप्रत/प्रसिध्दीसाठी नाही

GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ........ 18:40

श्री.नारायण राणे ........

गुजरातमध्ये भारतीय जनता पक्षाचे राज्य आहे. माननीय श्री.नरेंद्र मोदी हे गुजरात राज्याचे मुख्यमंत्री आहेत. गुजरातमध्ये 50 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय......

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी परिपूर्ण खुलासा केलेला आहे, त्या व्यतिरिक्त तुम्हाला काही सांगावयाचे आहे काय ?

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आंदोलन सुरु होऊन 5-6 दिवस झालेले आहेत. 4 उपोषणकर्त्या शेतक-यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी जिल्हाधिकारी वेगळी भूमिका मांडतात. सभागृहातील सदस्यांचे असे म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये जी माहिती देतात, त्या माहितीवर विश्वास ठेवून शासनाने आदेश दिले पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील सकाळपासून हा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित करीत आहेत. 5(1) च्या नोटीसला जर शेतक-यांनी विरोध केला तर 6(1) ची नोटीस देण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही, असे माननीय महसूल मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु जिल्हाधिका-यांनी अशा प्रकारे उपोषणकर्त्यांसमोर स्टेटमेंट करणे म्हणजे आगीत तेल ओतण्यासारखे नाही काय ? एखादा माणूस जीवानिशी गेला तर जनप्रक्षोभ निर्माण होऊ शकतो. माननीय महसूल मंत्र्यांनी जिल्हाधिका-यांना फॅक्स पाठवून ही कारवाई थांबवावी. शेतक-यांचा 5(1) च्या नोटीसला विरोध असेल तर त्याची नंतर छाननी करावी आणि 6(1) अन्वये नोटीस दिली असेल आणि लोकांचा विरोध असेल तर ही कारवाई स्थगित करावी. 11 च्या नोटीस पर्यंत शासन जाणार नाही, अशा प्रकारचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये केलेला आहे, त्याबद्दलची माहिती जिल्हाधिका-यांपर्यंत जाण्याची आवश्यकता आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्या दिवशी असे सांगितले की, मी महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री आहे, त्यावेळी आपण सभागृहामध्ये उपस्थित होतात. मुख्यमंत्री म्हणून मी जे निवेदन करतो त्यावर तुम्ही विश्वास ठेवणार की जिल्हाधिकारी जे सांगतात त्यावर विश्वास ठेवणार, असा प्रश्न माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये विचारला होता. या अनुषंगाने शासनाकडून जिल्हाधिका-यांना सूचना गेल्या पाहिजेत. कोणत्याही परिस्थितीत आंदोलन पुढे जाणार नाही, शासनाने दिलेल्या माहितीमुळे आंदोलनकर्त्यांचे

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .......

समाधान होईल या पद्धतीने हा प्रश्न हाताळावा. आंदोलन लवकरात लवकर कसे संपेल यादृष्टीने महसूल मंत्री महोदयांनी प्रयत्न करावेत. गैरसमज होऊन त्यातून एखादे आंदोलन व्हावे व त्यातून बेकसूर माणसे मरावीत, अशा प्रकारची भावना येथे कोणाचीच असणार नाही आणि तशी ती असू नये या भावनेने मी माननीय महसूल मंत्री महोदयांना विनंती करतो आणि त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न करावा.

श्री.उषाताई दराडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आधी जे स्टेटमेंट केलेले आहे त्यावर माझा हरकतीचा मुद्दा आहे. सेक्शन 4, 5 आणि 6 म्हणजे भूसंपादन नाही, हे वाक्य अत्यंत बेकायदेशीर आहे. विशेष भूसंपादनाच्या कायद्यामध्ये कलम 4, 5 आणि 6 आहेत. जेव्हा कोणतीही जमीन फॉर एनी परपज संपादित केली जाते त्यावेळी ती फाईल सेक्शन 4 पासून इनिशीएट होते. त्याला शासनाचा नंबर पडतो आणि त्यानंतर सेक्शन 4 प्रमाणे जमिनी नोटीफाय होतात, गॅझेटमध्ये येतात. सेक्शन 6 प्रमाणे सुध्दा जमिनी नोटीफाय होतात, गॅझेटमध्ये येतात. त्यानंतर जर शेतक-यांनी विरोध केला असेल तर ती जमीन सार्वजनिक हिताच्या कामासाठी संपादित केली असे इंटरप्रिटेशन केले गेले तर, सुप्रिम कोर्टाचे अनेक सायटेशनस् असे आहेत की, तुम्हाला कम्पल्सरी जमिनीचा ताबा घेता येतो. तुम्ही शेतक-यांच्या गैरहजेरीत जमिनीचा ताबा घेता. सेक्शन 9 प्रमाणे नोटीस दिली आणि उत्तर आले नाही तर तुमच्यावर बंधन नाही की, तुम्ही उत्तराची वाट बघावी. तुम्ही सेक्शन 10 प्रमाणे चौकशी कराल, सेक्शन 11 प्रमाणे निवाडा कराल, त्यावेळी त्या शेतक-याची जमीन जाऊन तो भिकारी झालेला असेल आणि शासन त्या जमिनीचे मालक झालेले असेल. म्हणून सेक्शन 4, 5 व 6 प्रमाणे भूसंपादनाची कारवाई केलेली नाही, अशा पद्धतीचे वक्तव्य करणे बरोबर नाही. मला माननीय महसूल मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, सेक्शन 4, 5 व 6 हे भूसंपादनाच्या कारवाई संदर्भातीलच कलम आहेत. सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे शासनाने शेतक-यांचा विश्वास संपादन करावा. भूसंपादनाच्या कायद्याच्या संदर्भात सुप्रिम कोर्टाचे असे डायरेक्शन्स आहेत की, जर शेतक-यांची सहमती नसेल तर त्यासंदर्भात प्रोसिडींग इनसिएट करण्याचा शासनाला कोणताही अधिकार असत नाही. शेतक-यांची सहमती फार महत्वाची आहे. म्हणून माझे एकच निवेदन आहे की, सेक्शन 4, 5 व 6 प्रमाणे भूसंपादन केले नाही या वाक्याला माझा विरोध आहे.

यानंतर श्री.गागरे .......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना मी सांगू इच्छितो की, याबाबत मंत्री महोदयांनी अगोदरच सांगितले आहे की, शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय कोणताही निर्णय घेतला जाणार नाही.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या विषयाबाबत मी स्पष्टीकरण देऊ इच्छितो म्हणजे माननीय सभापतींना रुलींग देण्यासाठी सोपे होईल. मी सुरुवातीस सांगितले आहे की, 1894 च्या कायद्यानुसार रायगडमध्ये जमीन संपादनाची प्रक्रिया सुरु केलेली आहे. ही सेक्शन 4/1 व 5/1 ची प्रक्रिया आहे. यातील सजेशन व ऑब्जेक्शनबद्दलही मी बोललो आहे. "या कायद्यातील सेक्शन 6 पूर्ण झाले म्हणजे शासनाने जमीन संपादीत केली असे होत नाही" असे वाक्य मी बोललो आहे. सेक्शन 4, 5 व 6 भूसंपादनाचे नाही असे मी म्हणालो नाही. सेक्शन 4, 5, 6 ही 1894 च्या कायद्यातील तरतूदच आहे. परंतु सेक्शन 6/1 नुसार शासनाने जागा ताब्यात घेतली असे समजू नका किवा संपादीत केली असे समजू नका. कारण शासन येथेच थांबणार आहे. यानंतर शेतकरी व उद्योजक यांनी चर्चा व वाटाघाटी कराव्यात. जमीन द्यायची किंवा घ्यायची हे त्यांच्यावरच डिपेंड आहे. जर यामध्ये शेतकऱ्यांचा फायदा होत असेल तर त्यांनी करुन घ्यावा. सभागृहात या विषयावर मोठी चर्चा चालू असती तर एस.ई.झेड. म्हणजे काय ? ते का व कशासाठी हवे आहे ? याबद्दल मी अधिक माहिती मी दिली असती. एस.ई.झेड.वर मी बराच वेळ बोलू शकतो. परंतु याबाबत मी सांगू इच्छितो की, मी खालच्या सभागृहात बसलो होते, तेथे पुरवणी मागण्यावर चर्चा चालू होती व 6.05 वाजता मला नोटीस मिळाली व मला सांगण्यात आले की, वरच्या सभागृहात 6.25 वाजेपर्यंत निवेदन केले पाहिजे. केवळ 20 मिनिटामध्ये निवेदन तयार होऊ शकत नाही म्हणून मी स्वत: येथे उपस्थित राहून तोंडी स्पष्टीकरण केले आहे. सभागृहात आल्यानंतर बोलण्यासाठी मी चिठ्ठी दिली आहे व सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे बोलत असल्यामुळे मी गप्प बसलो.

सभापती महोदय, एस.ई.झेड. बाबत शासनाची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. आता सभागृहातील माझे बोलणे पूर्ण झाल्यानंतर मी खाली जाऊन संबंधित कलेक्टरला सांगणार आहे की, तुम्ही सेक्शन 6 च्या पुढे जाऊ नये. तसेच जागा ताब्यात घेतो वगैरे अधिकचे काही बोलू नये. केंद्र शासनाने सांगितल्यानुसार शासन फक्त त्या प्रक्रियेपर्यंत जाऊन थांबणार आहे. जागा ताब्यात

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

श्री.नारायण राणे .....

घेणे किंवा संपादीत करणे तसेच सेक्शन 9,10,11 ची अंमलबजावणी करणे हे काम शासन करणार नाही. याबाबत मी ताबडतोब कलेक्टरला सांगणार आहे परंतु उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेणे हे तेथील लोकप्रतिनिधींवर अवलंबून आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहातील हा संदेश संबंधित उपोषणकर्ते व शेतकऱ्यांपर्यंत पोहचावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, उपोषण कोणत्याही एका पक्षाचे नसून सर्वपक्षीय लोक उपोषणाला बसले आहेत.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट आहे. सन्माननीय सदस्यांनी व तेथील नेत्यांनी याबाबत समजूतीची भूमिका घेऊन सरकारलाही मदत करावी आणि तेथील शेतकऱ्यांनाही मदत करावी. त्याप्रमाणे आपली भूमिका पार पाडावी, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : माझी सर्वांना विनंती आहे, माननीय मंत्री महोदयांकडे आपण मर्यादीत खुलासा मागितला होता. 20 मिनिटामध्ये येथे येऊन त्यांनी खुलासा केलेला आहे. यानंतर विविध उपप्रश्नांची चर्चा करुन या विषयास फाटे फोडणे योग्य नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला कोणताही उपप्रश्न विचारावयाचा नाही परंतु सेक्शन 6/1 च्या सुसंगतीबद्दल बोलायचे आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात आश्वासन दिल्यानंतरसुध्दा कलेक्टर तेथे जाऊन सांगतात की, भूसंपादनाची कार्यवाही सुरु ठेवली जाणार आहे. या विषयावर त्या दिवशी सभागृहात चर्चा चालू असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, "मुख्यमंत्री खरे बोलत आहेत की कलेक्टर खरे बोलत आहेत हे तुम्ही ठरवावे". त्या दिवशी मुख्यमंत्र्यानी सभागृहात स्टेटमेंट केल्यानंतर .....

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

आणि आता माननीय महसूल मंत्र्यांनी येथे स्टेटमेंट केले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्टेटमेंटबाबत ज्याप्रमाणे कलेक्टरने स्टेटमेंट केले त्याचा अनुभव घेता महसूल मंत्र्यांच्या स्टेटमेंटला देखील कलेक्टर वाटाण्याच्या अक्षता लावणार नाहीत यावर आम्ही विश्वास कसा काय ठेवावयाचा ? तेव्हा निदान आता महसूल मंत्र्यांनी तेथील कलेक्टरला आदेश देऊन तेथील उपोषण कर्त्यांना लेखी लिहून दिले तर ते आपले उपोषण संपवू शकतात. आपल्या वतीने कलेक्टरने त्या उपोषणकर्त्यांना लिहून द्यावे की, सेक्शन 6(1) च्या कारवाई पुढे जाऊन आम्ही कारवाई करणार नाही. तरी आपण तसे आदेश देणार का ?

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना तसेच सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की आता येथून, या सदनातून बाहेर गेल्यानंतर माननीय मंत्री कलेक्टरना आदेश देऊ शकतील. त्यासाठी आपण मंत्री महोदयांना काही वेळ हा दिला पाहिजे. यावर आता अधिक चर्चा आपणास करता येणार नाही हेही आपण सर्वांनी लक्षात घ्यावे. मी आता या विषयावर बोलण्यासाठी कोणालाही परवानगी देणार नाही. .... मंत्री महोदयांनी आपले निवेदन करताना बऱ्याच गोष्टींचा खुलासा केलेला आहे. तेव्हा आता आपण पुरवणी मागण्यावरील चर्चेला पुढे सुरूवात करू या.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांचा खुलासा तसा समाधानकारक आहे. पण ते लेखी स्वरूपात नसल्यामुळे प्रश्न पडतो....

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सभागहामध्ये स्टेटमेंट करणे म्हणजे ते लेखीच दिल्यासारखे आहे हे मला सांगितले पाहिजे असे नाही.

**तालिका सभापती** : आता यावर अधिक चर्चा नको. यानंतर पुरवणी मागण्यांवरील चर्चेला पुन्हा सुरूवात होईल. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी मी पुरवणी मागण्यांवरील चर्चेतील आपले भाषण सुरू करावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, झुणका-भाकर केंद्रांच्या संबंधातील निवेदन अजून शासनाकडून करण्यात आलेले नाही. ते आज व्हायला पाहिजे. आज सकाळी हा विषय उपस्थित झाला असता संध्याकाळी 6 वाजेपर्यंत शासनाकडून निवेदन करण्यात यावे असे निदेश माननीय उपसभापती यांनी दिले होते.

**तालिका सभापती** : ते शासनाकडून नंतर करण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सन 2007-08 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

( चर्चा पुढे सुरू... )

----

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पृष्ठ क्र.133, बाब क्रमांक 143 या सामाजिक न्याय विभागाच्या पूरक मागणीबाबत मी बोलणार आहे. आश्रमशाळा व मूलोद्योगोत्तर आश्रमशाळा चालविण्याकरिता स्वयंसेवी संस्थांना अतिरिक्त सहायक अनुदान देण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, या आश्रमशाळांच्या बाबतीत मला येथे मुद्दाम उल्लेख करावयाचा आहे. मंजूर झालेल्या आश्रमशाळांपैकी किती चालू आहेत आणि किती बंद आहेत याची माहिती या निमित्ताने सभागृहाला माननीय मंत्र्यांनी दिली तर बरे होईल. कारण ज्या पद्धतीने आश्रमशाळा मंजूर केल्या जातात त्याबाबतीत जो गोंधळ झालेला आहे व होत आहे तो थांबविण्यासाठी आणि या कार्यक्रमाला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला गेला तरच हे जे अनुदान आपण मंजूर करतो ते सत्कारणी लागेल असे मला वाटते.

सभापती महोदय, यानंतर मी गृहनिर्माण विभागाच्या पूरक मागण्यांबाबत बोलणार आहे. ...

**तालिका सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता 7 वाजण्यास पाच मिनिटे बाकी आहेत. आपण सभागृहाची बैठक 7 वाजेपर्यंत सुरू ठेवण्याचे ठरविले होते. त्यासाठी आपण मघाशी एक तास वाढविला होता. आता ती वाढवून घेतलेली वेळ संपण्यास 5 मिनिटे बाकी आहेत. हे मी आपणा सर्वांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहाची बैठक आपण आता स्थगित करावी अशी आमची आपणास विनंती आहे. वाटल्यास आपण उद्या सकाळी लवकर बैठक घेऊन ही चर्चा पूर्ण करू.

( यानंतर श्री. सरफरे ..... 3ओ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, गृह निर्माण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 143 वरील बाब क्रमांक 151 वर केंद्र पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान कार्यक्रमाकरिता निधीची तरतूद करणे याकरिता 287 कोटी 58 लाख 11 हजाराची मागणी करण्यात आली आहे. या मागणीबाबत माझ्या समोर एकच प्रश्न आहे की. इतर सर्व योजना यामध्ये एकत्रित करुन ही योजना प्रत्यक्षात उतरविण्यास सुरुवात केली आहे. राज्यामध्ये शहरनिहाय या योजनेची प्रगती किती झाली? याची माहिती सभागृहाला करुन द्यावी. त्याचप्रमाणे बाब क्र. 152 मध्ये एकात्मिकृत गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांकरिता निधीची तरतूद करणे याकरिता 3 कोटी 76 लक्ष 52 हजाराची मागणी करण्यात आली आहे. याबाबत माझा प्रश्न असा आहे की, झोपडपट्टी विकासाचा कार्यक्रम हा केंद्र पुरस्कृत आहे की राज्य पुरस्कृत आहे? मुंबई शहरामध्ये झोपडया वाढविणे व त्यांचे पुनरुत्थान करणे अशाप्रकारचा कार्यक्रम करण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे काय? या संदर्भात आपण निकष ठरविले आहेत. दिनांक 1.1.1995 ची मर्यादा सन 2000 पर्यंत वाढविली आहे. त्या संदर्भात राज्य सरकारने आणखी फरक केला आहे काय? अशा प्रकारचा कार्यक्रम राबविल्यामुळे मुंबई शहराची परिस्थिती भयानक झाली आहे. त्या संदर्भात राज्य शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

सभापती महोदय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या पृष्ठ क्रमांक 186 वरील बाब क्र. 194 च्या बाबतीत मला विचारावयाचे आहे की, साखरेचा उतारा कमी पडल्यामुळे साखर कारखान्यांना वित्तीय सहाय्य म्हणून 75 कोटींचा निधी देण्यात आला आहे. त्या संदर्भात शासनाचा या साखर कारखान्यांवर वरदहस्त आहे. एखादा साखर कारखाना तोटयात गेल्यावर शासन त्या कारखान्यांना मदत करते. ज्यावेळी त्या साखर कारखान्यांना फायदा होतो त्यावेळी त्या साखर कारखान्याकडून शासनाला किती टक्के लाभांश मिळतो याची मंत्रिमहोदयांनी माहिती दिली तर बरे होईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 195 मध्ये सन 2006-07 करिता, गाळप न झालेल्या ऊसाला वित्तीय सहाय्य म्हणून 48 कोटींची मागणी करण्यात आली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू...

सभापती महोदय, किती शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागल्या ? हा प्रश्न आहे. साखरकारखान्यांची आवड आणि निवड असते. कोणाचा ऊस घ्यावयाचा आणि कोणाचा ऊस घ्यावयाचा नाही] हे सुध्दा साखर कारखान्यानें ठरवत असतात. त्यांच्या बाजूने जे शेतकरी उभे रहातात त्यांचा ऊस घ्यावयाचा आणि त्यांच्या विरुध्दच्या लोकांचा ऊस घ्यावयाचा नाही, असे पाहिले जाते. विरुध्द बाजूच्या लोकांच्या शेतात ऊस उभा असतो, अशाप्रकारचे चित्र आपल्याला दिसते. ज्यांना मदत करावयाची आहे त्यांना जरूर मदत करावी. साखर कारखाना वाढलाच पाहिजे, साखर कारखाना टिकलाच पाहिजे, परंतु आज साखरकारखान्यांमध्ये जो काही घोळ आणि गोंधळ चाललेला आहे, त्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे, असे मला नम्रपणाने सांगावयाचे आहे.

त्यानंतर बाब क्रमांक 196, हुकूमनाम्याच्या रकमेचे प्रदान यासाठी मागणी केलेली आहे. ही धोरणात्मक बाब आहे. मला असे सांगायचे आहे की, एक शेतकरी कोर्टामध्ये गेला की त्यास न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे नुकसानभरपाई दिली जाते. नुकसानभरपाई मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना कोर्टामध्ये जावे लागते, याचा शासनाने विचार केला पाहिजे. हे शासन सगळ्यांना मदत करणारे आहे, मग त्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळविण्याकरता न्यायालयाचा आधार का घ्यावा लागतो ? याचा देखील सहकार विभागाने खोलवर जाऊन विचार करावा आणि सगळ्या शेतकऱ्यांना समान न्याय द्यावा, असे मी नमूद करू इच्छितो.

त्यानंतर बाब क्रमांक 197, सहकारी साखर कारखान्यांना साखर निर्यातीसाठी आर्थिक सहाय्य, यासाठी मागणी केली आहे. साखर निर्यात करण्याची परवानगी मिळालेली आहे. साखरेच्या निर्यातीसाठी देखील शासन मदत करते. यासाठी जवळजवळ 25 कोटी रुपये इतक्या रक्कमेची पूरक मागणी सादर केलेली आहे.

त्यानंतर बाब क्रमांक 198, सहकारी साखर कारखान्यांना भाग भांडवली अंशदान देण्यासाठी 9 कोटी रुपयाची मागणी करून त्यांना मदत देण्याचे ठरविलेले आहे. एकूण यामध्ये सात कारखाने आहेत. या सात कारखान्यांची नावे काय आहेत, हे जाहीर करावे. शासन सहकारी साखर कारखान्यांना भागभांडवलासाठी सहाय्य करते. म्हणून यामध्ये कोणत्या मंत्री महोदयांचा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ KGS/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू....

साखर कारखाना आहे ? यामध्ये कोणकोण आहेत, हे सदनाला कळले तर बरे होईल. कारखाना कशामुळे डबधाईला आला, कशामुळे कारखान्यामध्ये गोंधळ झाला याची माहिती येथे दिली तर ती वृत्तपत्रात येईल आणि लोकांना ते कळते. आम्हाला काही कळत नाही, साखर कारखान्याच्या वाट्याला आम्ही जात नाही, फिरकत नाही. याचा गैरफायदा घेतला जातो. अशाप्रकारे साखर कारखान्यांच्या पाठिशी शासन उभे रहाते, ही चांगली परिस्थिती नाही. हे साखर कारखाने कोणाचे आहेत याची माहिती सदनाला दिली तर आपला मी आभारी राहीन.

त्यानंतर बाब क्रमांक 199, सहकारी सूत गिरण्यांना भाग भांडवली अंशदान. या अगोदरच सहकारी सूत गिरण्यांच्या संबंधात चर्चा झालेली आहे. अनेक लोक आरडाओरडा करतात. सहकारी सूत कारखान्यांना मदत केली जाते त्याकरिता वेगळा प्रयोग केला जातो. कोणाला मदत दिली जाते, कोणाचा त्यासाठी क्रमांक लागतो, कोण किती भांडवल उभे करते आणि शासन किती मॅचिंग ग्रँट देते, याचा विचार करण्यासारखा आहे. सहकारी सूत गिरण्या म्हणजे शासनाने निर्माण केलेली खास कुरणे आहेत असे माझे मत आहे. याबाबतीत शासनाचे काय मत असेल ते त्यांनी जरूर सांगावे

त्यानंतर बाब क्रमांक 201, सहकारी साखर कारखान्यांना शासनाने दिलेल्या हमीच्या पूर्ततेसाठी कर्ज देणे, यासाठी 5 कोटी रुपयाच्या मागणीची तरतूद केलेली आहे. हा जनतेचा पैसा आहे. साखरकारखाना चांगल्या पध्दतीने चालावा, यासाठी आपण मदत देतो. त्यांनी तो चांगल्या पध्दतीने चालवून त्यातून पैसे कमावून ते पैसे शासनाला देण्याची आवश्यकता आहे. परंतु शासन हमीची पूर्तता करण्यासाठी भ्रूर्दंड सहन करते. शासन जामीनदार आहे, म्हणून 5 कोटी रुपयाची रक्कम शासनाला भरावयाची आहे. अशाप्रकारचा हा सहकार खात्याचा कारभार चाललेला आहे, याकडे लक्ष देण्याची नितांत आवयकता आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

सभापती महोदया, यानंतर मला जलसंपदा विभागाच्या एका बाबीचा उल्लेख करावयाचा आहे.

सभापती महोदया, काही सन्माननीय सदस्य बसून बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मला या सदनामध्ये येऊन पाच वर्षे झालेली आहेत आणि हे सहावे वर्ष आहे. या सदनाची कार्यपध्दती पाहिली तर ती फार निराळी आहे. ज्या पध्दतीने या ठिकाणी कामकाज चालते त्यामध्ये वेळेला किंमत नाही, बाकी सर्व गोष्टींना किंमत आहे. कामकाज कसे जास्तीत जास्त लवकर गुंडाळता येईल अशा पध्दतीने कामकाज होते. एक महिन्याचे अधिवेशन यावेळी फक्त 11 दिवस चालविणार आहोत आणि हे अधिवेशन संपवून टाकणार आहोत. म्हणजे 2 ऑगस्टला घरी जाणार. या ठिकाणी आल्यानंतर घरी कधी जातो हा विचार करावयाचा परंतु या ठिकाणी आल्यानंतर या प्रश्नांना न्याय कसा देऊ शकू याचा विचार कोणीच करत नाही. आपण एकूण कामकाजाचे तास काढतो. आपण 9 तास काम करतो. आपण पूर्वीचा इतिहास काढून अधिवेशन किती आठवडे चालावयाचे ते बघावे.

श्री. जयंत पाटील : कामकाज सल्लागार समितीमध्ये हे ठरत असते.

श्री. मधुकर सरपोतदार : कामकाज सल्लागार समितीमध्ये सुध्दा आम्ही बोलतो. माननीय अर्थमंत्री हे कोणत्याही गोष्टीची माहिती करुन घेतल्याशिवाय, अभ्यास केल्याशिवाय बोलत नाहीत याची मला कल्पना आहे.

सभापती महोदया, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 113 बाबत मी बोलू इच्छितो. यामध्ये वैतरणा अतिरिक्त समांतर जलविद्युत कालवा प्रकल्पासाठी निधीची तरतूद करणे या अंतर्गत 60 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली आहे. हा कालवा पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे] अंदाजपत्रकात किती तरतूद केलेली होती आणि प्रत्यक्षात किती खर्च झाला, काम किती झाले ? याची माहिती सदनाला सादर करावी अशी माझी या निमित्ताने विनंती आहे. कारण मुंबईला पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने हा महत्वाचा भाग आहे. एवढ्या बाबी मांडून मी माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, आता 7.00 वाजलेले आहेत. त्यामुळे आता सभागृहाचे कामकाज थांबवावे. आम्ही सकाळी 9.00 वाजल्यापासून आलेलो आहोत. आणखी 10 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे आणि त्यानंतर माननीय मंत्रीमहोदय उत्तरे देतील. त्यामुळे रात्रीचा 1.00 वाजला तरी ही चर्चा संपणार नाही.

**तालिका सभापती ( श्रीमती उषाताई दराडे )** : माझी सभागृहाला विनंती आहे की, उद्या सकाळी 10.00 वाजल्यापासून सभागृहाचे कामकाज सुरु होणार आहे. आजच्या विभागांवरील पुरवणी मागण्यांची चर्चा आणि उद्याच्या विभागांवरील पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उद्या तेवढा वेळ मिळणार नाही. त्यामुळे आज जेवढी चर्चा करता येईल तेवढी करु.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी आपल्या निर्णयाबाबत आक्षेप घेत नाही परंतु ज्या कामकाजाला वेळ पाहिजे त्यापेक्षा वेगळीच चर्चा होते. या ठिकाणी मला जे बोलावयाचे आहे त्याबाबतीत न्याय मिळत नाही. त्याची चर्चा या ठिकाणी करावयाची काय ? आम्ही आज सकाळी 9.00 वाजल्यापासून आलेलो आहोत. आज विधान परिषदेचा वर्धापनदिन होता त्यामुळे सकाळी साडेआठ वाजताच या ठिकाणी आलो. या ठिकाणी किती तास काम करावयाचे ? त्या कामाला क्वालिटी राहात नाही. उत्तर येत नाही. ज्यांना अभ्यास करुन बोलावयाचे नाही ते बंद करा असे म्हणतात. आम्ही ज्याचा अभ्यास करतो त्याबाबत आम्हाला समाधान तरी वाटले पाहिजे. आम्हाला चार पुस्तके वाचून पाच मिनिटात बोलावे लागते. मी फार अनाडी माणूस आहे. माझ्याकडे डिग्री नाही. मला 10 पुस्तके जास्त वाचावी लागतात.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी पुरेसा वेळ दिला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : तालिका सभापती महोदया, येथे वेळेचा प्रश्न नाही तर ज्या पध्दतीचे उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून आम्हाला अपेक्षित असते ते उत्तर आम्हाला मिळत नाही. सायंकाळी 7.00 वाजता आपण सभागृहाचे कामकाज थांबवू असा निर्णय मघाशी दिलेला होता. तेव्हा आता आपण बैठक तहकूब करुन उर्वरित कामकाज उद्या घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : आज विधानपरिषदेचा वर्धापन दिन असल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्य सकाळी 9.00 वाजल्यापासून काम करीत आहेत. आम्ही किती तास काम करायचे हे तरी आपण सांगावे. तालिका सभापती महोदया, नियमाप्रमाणे आणखी एक दिवस आपणाला चर्चेसाठी मिळू शकतो. दोन दिवसामध्ये ही चर्चा गुंडाळली जाते हे योग्य नाही.

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये कामकाज ठरविण्यात आलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : कामकाज सल्लागार समितीचा मुद्दा आपण कृपा करुन उपस्थित करु नये अशी माझी आपणास विनंती आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये मी उपस्थित राहातो आणि तेथेही मी गप्प बसत नाही. तेव्हा कामकाज सल्लागार समितीने ठरविलेल्या कामकाजाच्या संदर्भात काही बदल करावयाचा असेल तर त्यासाठी हे सभागृह सार्वभौम आहे. कामकाज सल्लागार समिती सार्वभौम नाही.

श्रीमती सुधा जोशी : आजचे उर्वरित कामकाज उद्या घ्यावे. आता सभागृहाची बैठक तहकूब करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभागृहाची बैठक आता स्थगित करावी अशा दोन्ही बाजूच्या सनमाननीय सदस्यांच्या भावना आहेत.

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे आज आणि उद्या पुरवणी मागण्यांवर चर्चा आहे. विरोधी पक्षातर्फे येणा-या प्रस्तावावर उद्या चर्चा होणार आहे. आणि त्या चर्चेसाठी जास्त वेळ लागेल. उद्या सभागृहाची बैठक 10.00 वाजता घेण्यात आलेली आहे. तेव्हा माझी सदनाला विनंती आहे की, आपण जेवढे शक्य होईल तेवढे कामकाज आज करु.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य सभागृहाची बैठक आता स्थगित करावी अशी मागणी करतात.)

**तालिका सभापती** : सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार,दिनांक 24 जुलै,2007 रोजी सकाळी 10 ते 12.30 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल व त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक संध्याकाळी 7 वाजून 17 मिनिटांनी मंगळवार,दिनांक 24 जुलै,2007 च्या सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही